पुणे आवृत्ती

बातम्यांचा राजा

# जनप्रवास

मुंबई, पुणे, अ.नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध.

RNI NO. MAHMAR/2013/57952

बुधवार, दि. १७ जून २०२६ | वर्ष : १४ | अंक : ०५४ | पाने ८ | किंमत २ रुपये

www.janpravaslive.in E-mail : dainikjanpravas@gmail.com

आतील पानात...

३ माहिती लपवत असल्याचा माजी आ. रमेश थोरातांचा आरोप

४ लिट्ल एंजल्स स्कूलमध्ये विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत

५ रुग्णांना अधिक चांगल्या व दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्या



पान ८ वर..

# एफडीएची पुणे जिल्ह्यात धडक कारवाई; भेसळयुक्त आंबा, आमरस आणि प्रतिबंधित खाद्यपदार्थ जप्त

- पुरंदरमध्ये ५,७०० किलो निकृष्ट दर्जाचे आंबे नष्ट.
- २,४३१ किलो आंबा पल्प जप्त.
- ७२८ किलो आमरसाचा साठा जप्त.
- वडगाव शेरीतील डेअरीचा परवाना निलंबित.
- शिरूरमध्ये प्रतिबंधित खाद्यपदार्थ जप्त; संबंधिताला अटक.



जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए) पुणे विभागाने गेल्या तीन दिवसांत पुरंदर, वडगाव शेरी आणि शिरूर परिसरात धडक कारवाया करत भेसळयुक्त आंबा, आमरस तसेच प्रतिबंधित खाद्यपदार्थांचा मोठा साठा जप्त केला. या कारवाईत लाखो रुपयांचा माल नष्ट करण्यात आला असून संबंधित आस्थापनांवर कठोर कारवाई करण्यात आली आहे.

राज्याचे अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सुरू केलेल्या सेफ फूड, सेफ ड्रग, सेफ महाराष्ट्र' मोहिमेअंतर्गत ही विशेष मोहीम राबविण्यात आली. पुरंदर तालुक्यातील सोनोरी आणि बोपगाव येथील आंबा प्रक्रिया केंद्रांवर तपासणी करण्यात आली. यावेळी ५,७०० किलो सडलेले व निकृष्ट दर्जाचे आंबे नष्ट करण्यात आले. तसेच भेसळीच्या संशयावरून २,४३१ किलो आंबा पल्प जप्त करण्यात आला. संबंधित आस्थापनाचा अन्न सुरक्षा परवाना निलंबित करण्यात आला आहे.

याशिवाय एका ठिकाणी १८ किलो पॅकबंद आणि ७१० किलो सुटा हापूस आमरस असा सुमारे ७३ हजार रुपयांचा साठा जप्त करण्यात आला. वडगाव शेरी येथील एका डेअरी आणि स्वीट्स दुकानातील खाद्यपदार्थांमुळे ग्राहकांना त्रास झाल्याची तक्रार आल्यानंतर प्रशासनाने तपासणी करून नमुने प्रयोगशाळेत पाठविले. खबरदारीचा उपाय म्हणून दुकानाचा परवाना निलंबित करण्यात आला असून व्यवसाय बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

दरम्यान, शिरूर तालुक्यातील पाबळ येथे प्रतिबंधित खाद्यपदार्थांची विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर छापा टाकण्यात आला. यामध्ये सुमारे १.५३ लाख रुपयांचा साठा जप्त करण्यात आला असून संबंधित व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे.

पुणे विभागाचे सहआयुक्त (अन्न) डी. व्ही. भोगावडे यांनी सर्व अन्न व्यावसायिकांनी वैध परवाना घेऊनच व्यवसाय करावा, असे आवाहन केले आहे. ग्राहकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या आणि नियमबाह्य व्यवसाय करणाऱ्यांविरोधात यापुढेही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचा इशारा त्यांनी दिला.

# अवैध शस्त्रांविरोधात पोलिसांची धडक मोहीम

**१५ दिवसांत १७ जणांना अटक**

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे: शहरातील अवैध गावठी पिस्तूल बाळगणाऱ्यांच्या विरुद्ध पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली आहे. गेल्या १५ दिवसांत शहरातील विविध पोलिस ठाण्यांच्या हद्दीत करण्यात आलेल्या कारवाईत अवैध शस्त्रे बाळगणारे, खरेदी–विक्री करणारे अशा १७ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

या कारवाईदरम्यान १२ अवैध गावठी पिस्तुले आणि १३ जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहेत. संबंधित आरोपींविरोधात शस्त्र अधिनियमांतर्गत १० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १ ते १५ जून २०२६ या कालावधीत कालेपडळ, भारती विद्यापीठ, डेक्कन, मांजरी, नांदेड सिटी, फुरसुंगी, सहकारनगर, येरवडा आणि लोहगाव पोलिस ठाण्यांच्या हद्दीत गुप्त माहितीच्या आधारे तसेच छापेमारी करून ही कारवाई करण्यात आली.

काही प्रकरणांत आरोपींकडून एकापेक्षा अधिक शस्त्रे आणि काडतुसे जप्त करण्यात आली असून, शहरात अवैध शस्त्रांची उपलब्धता अद्यापही कायदा व सुव्यवस्थेसाठी गंभीर आव्हान असल्याचे यातून स्पष्ट झाले आहे. गेल्या १५ दिवसांत समोर आलेल्या १० प्रकरणांमुळे पोलिसांची चिंता वाढली आहे.

तपासात जप्त करण्यात आलेल्या शस्त्रांचा वापर गंभीर गुन्ह्यांसाठी होऊ शकला असता, असे समोर आले आहे. शस्त्रे शहरात कोणत्या मार्गाने पोहोचत होती आणि त्यामागे नेमके कोण सक्रिय आहेत, याचा शोध पोलिस घेत आहेत. दरम्यान, आगामी काळातही ही कारवाई सुरू राहणार आहे.

## संक्षिप्त

### पांढरे पट्टे ओढणाऱ्यांवर गुन्हा दाखल करा; मनसेची मागणी




जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : रस्ते, पदपथ व इमारत परिसरात परवानगीशिवाय पांढरे पट्टे ओढून विद्रुपीकरण करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केली आहे. गिरगाव परिसरातील महापालिका कार्यालये व पोलीस ठाण्यांना तसे पत्र दिले आहे.

गिरगाव, ग्रँट रोड, ताडदेव या परिसरात जैन समाजाकडून मारण्यात आलेल्या पांढऱ्या पट्ट्यांविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे मलबार हिल विभाग अध्यक्ष दिनेश पुंडे यांनी पांढऱ्या पट्ट्या मारणाऱ्या व्यक्तींचा शोध घेऊन त्यांच्यावर सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे आणि समाजात धार्मिक तेढ वाढविल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी केली आहे.

गिरगाव चौपाटीजवळच्या बेने हॉटेलसमोरच्या पदपथावर आणि मंगलवाडी परिसरातील मोकळ्या रस्त्यावर काही व्यक्तींनी पांढरे पट्टे मारून दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. याला गिरगावकर मंडळींनी आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांनी मिळून जोरदार विरोध केल्यानंतर स्थानिक महापालिका कार्यालय आणि पोलिसांनी मिळून लागलीच पांढऱ्या पट्ट्यांवर दुसरे कलर मारून वाद मिटवण्याचा प्रयत्न केला होता.

सदर प्रकरण शांत होत नाही तोच गिरगावात आणखी काही इमारती, चाळी पदपथांवर जाणूनबुजून पांढऱ्या रंगाचे पट्टे मारण्यात आल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने स्थानिक महापालिका कार्यालय आणि सर्व गिरगावसह संपूर्ण परिसरातील पोलीस ठाण्यांना पत्र देऊन रस्ते, पदपथांवर जाणून–बुजून पांढऱ्या पट्ट्या ओढणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. यावर पालिका पोलीस प्रशासन काय कारवाई करते याकडे लक्ष लागून आहे.

# प्रार्थनेतून कर्करोग बरा करण्याचा दावा; धर्मगुरूसह आठ जणांविरोधात गुन्हा

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : प्रार्थनेच्या माध्यमातून कर्करोग, ट्यूमर यांसारखे गंभीर आजार बरे होतात, असा दावा केल्याप्रकरणी कोंढवा पोलिसांनी एका धर्मगुरूसह आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. अंधश्रद्धा निर्मूलन कायद्याअंतर्गत ही कारवाई करण्यात आली असून एका महिलेच्या फिर्यादीवरून हा गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिला या अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीच्या कार्यकर्त्या असून त्या रविवारी (१४ जून) आपल्या मैत्रिणीसह कोंढवा येथील एका प्रार्थनास्थळात गेल्या होत्या. तेथे स्वयंसेवकांनी २० रुपये घेऊन पाण्याची बाटली दिली आणि हे पाणी शरीरावरील आजारग्रस्त भागावर लावल्यास आजार कमी होईल, असे सांगितल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. यानंतर झालेल्या सभेत संबंधित धर्मगुरूंनी उपस्थितांना शरीराच्या ज्या भागात आजार आहे, त्या भागावर हात ठेवण्यास सांगितले. कर्करोग, ट्यूमर किंवा इतर कोणताही विकार असला तरी देवाच्या कृपेने तो बरा होईल, असे वक्तव्य केल्याचा आरोप आहे. दरम्यान, फिर्यादी महिला आणि त्यांच्या मैत्रिणीने या कार्यक्रमाचे चित्रीकरण करण्याचा प्रयत्न केला असता, काही स्वयंसेवकांनी त्यांना विरोध केला. तसेच धक्काबुक्की करून मोबाईलमधील चित्रफीत हटविल्याचा आरोपही फिर्यादीत करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास कोंढवा पोलीस करत आहेत.

# अंमली पदार्थ विक्रीप्रकरणी पुण्यात चौघांना अटक

जनप्रवास । प्रतिनिधी

पिंपरी : निगडी पोलिस आणि अंमली पदार्थविरोधी पथकाने केलेल्या वेगवेगळ्या कारवायांमध्ये अफू आणि गांजा विक्रीप्रकरणी चौघांना अटक करण्यात आली आहे.

निगडी पोलिसांनी ओटास्किम येथून एकाला गांजा बाळगल्याप्रकरणी अटक केली. तर अंमली पदार्थविरोधी पथकाने खेड तालुक्यातील सावरदरी येथे अफू विक्रीसाठी आलेल्या तिघांना अटक केली. या कारवाईमुळे धाबे दणाणले असून पोलिसांची कौतूक होत आहे.

# पुणे विमानतळाचे जुने टर्मिनल २ महिन्यांत सुरू होणार

## दरवर्षी सुमारे १५ लाख प्रवाशांची वाढ होणार




जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : पुणे विमानतळावरील जुन्या टर्मिनलच्या इमारतीच्या पुनर्विकासाचे काम पूर्ण झाले आहे. आवश्यक सुरक्षा यंत्रणा बसविल्यानंतर हे टर्मिनल पुन्हा प्रवाशांसाठी खुले होणार आहे. जुन्या टर्मिनलच्या नूतनीकरणाचे ९५ टक्के काम पूर्ण झाले आहे. ब्युरो ऑफ सिव्हिल एव्हिएशन सिक्युरिटी'कडून अंतिम तपासणी आणि मंजुरी मिळाल्यावर दोन महिन्यांत म्हणजेच साधारणपणे जुलै किंवा ऑगस्टपर्यंत जुने टर्मिनल प्रवाशांसाठी खुले होण्याची शक्यता आहे. विमानतळ प्रशासनाकडून जुन्या टर्मिनलमध्ये डोअर फ्रेम मेटल डिटेक्टर, एक्स्प्लोझिव्ह ट्रेस डिटेक्टर, सीसीटीव्ही आणि इतर सुरक्षा उपकरणे बसविण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. जुन्या टर्मिनलच्या पुनर्वापरामुळे विमानतळाच्या क्षमतेत दरवर्षी सुमारे १५ लाख प्रवाशांची वाढ होणार आहे. विमानतळाची एकूण ताशी प्रवासी हाताळणी क्षमता सुमारे ३ हजार प्रवाशांपर्यंत पोहोचेल, असा अंदाज आहे.

पुणे विमानतळावरील सर्व उड्डाणे नव्या एकात्मिक टर्मिनलमधून सुरू झाल्यानंतर मार्च २०२५ मध्ये जुने टर्मिनल प्रवासी सेवांसाठी बंद करण्यात आले होते. त्यानंतर या इमारतीचे पुनर्बांधणी व आधुनिकीकरण करण्यात आले. जुन्या टर्मिनलचा सुमारे ७ हजार चौरस मीटर भाग विकसित केला असून त्यासाठी सुमारे २४ कोटी रुपयांचा खर्च केला आहे.

नवीन टर्मिनल जुलै २०२४ पासून कार्यरत असून त्याची वार्षिक प्रवासी हाताळणी क्षमता सुमारे ९० लाख प्रवासी इतकी आहे. सुमारे ५२ हजार चौरस मीटर क्षेत्रफळ असलेल्या या टर्मिनलमध्ये ३४ चेक–इन कौंटर, २५ सेल्फ चेक–इन किऑस्क, पाच बॅगेज कॅरोसेल आणि अत्याधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. वाढत्या प्रवासीसंख्येमुळे विमानतळावर दरवर्षी एक कोटींहून अधिक प्रवाशांची ये–जा होत असल्याने अतिरिक्त क्षमतेची गरज निर्माण झाली होती.

# महिला बचत गटांना अडीच एकर जमीन अन् १ लाखाचे अनुदान

## सरकारची नवी योजना




जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. पात्र महिला बचत गट आणि महिला सहकारी संस्थांना अडीच एकर सरकारी जमीन लीज तत्त्वावर उपलब्ध करून देण्याबरोबरच व्यवसाय उभारणीसाठी १ लाख रुपयांचे अनुदान देण्याची घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. या योजनेमुळे ग्रामीण भागातील महिलांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होण्यास मदत होणार असल्याचे सरकारने म्हटले आहे.

या योजनेअंतर्गत महिलांना पाच वर्षांच्या कालावधीसाठी सरकारी जमीन वापरासाठी दिली जाणार आहे. या जमिनीवर चारा लागवड, नेपियर गवत उत्पादन, बांबू शेती, ग्रासलँड डेव्हलपमेंट तसेच इतर पूरक कृषी व्यवसाय करता येणार आहेत. महिलांच्या उत्पन्नात वाढ करण्यासोबतच ग्रामीण भागातील आर्थिक चक्राला गती देणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे.

महिला बचत गटांना व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक भांडवल मिळावे यासाठी सरकारकडून १ लाख रुपयांचे अनुदान दिले जाणार आहे. हे अनुदान जिल्हा नियोजन समिती (डीपीसी) आणि जिल्हा खनिज प्रतिष्ठान (डीएमएफ) निधीतून उपलब्ध करून दिले जाईल. सरकारच्या अंदाजानुसार, योग्य नियोजन आणि आधुनिक शेती पद्धतींचा वापर केल्यास या जमिनींमधून दरवर्षी ४ ते ५ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न मिळविणे शक्य होणार आहे. या योजनेचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे जमिनीवरून मिळणाऱ्या उत्पन्नावर संबंधित महिला बचत गटांचा पूर्ण अधिकार राहणार आहे. सरकार या उत्पन्नात कोणताही हिस्सा घेणार नाही. मात्र, जमीन कायमस्वरूपी मालकी हक्काने न देता लीज पद्धतीने वापरासाठी दिली जाईल. त्यामुळे सरकारी जमिनींचा योग्य वापर होण्याबरोबरच त्यांचे संरक्षणही होणार आहे.

राज्यात महसूल विभागाच्या ताब्यात मोठ्या प्रमाणावर पडीक सरकारी जमिनी आहेत. अनेक ठिकाणी या जमिनींवर अतिक्रमण होण्याचा धोका निर्माण होत असतो. अशा जमिनी महिला बचत गटांच्या वापरासाठी उपलब्ध करून दिल्यास त्यांचा उत्पादक उपयोग होईल आणि अतिक्रमणांनाही आळा बसेल, असा सरकारचा विश्वास आहे. योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कृषी विभागाची मदत घेतली जाणार आहे. कृषी तज्ज्ञांकडून महिलांना लागवड पद्धती, उत्पादन व्यवस्थापन, सिंचन, पीक संरक्षण तसेच बाजारपेठेतील संधींबाबत मार्गदर्शन दिले जाईल. उत्पादित मालाला बाजारपेठ मिळवून देण्यासाठीही प्रशासनाकडून आवश्यक सहकार्य केले जाणार आहे.

# धरणातील घटत्या पाणीसाठ्यामुळे दिवसाआड पाणी

## अनेक भागांत अपुरा पाणीपुरवठा झाल्याची तक्रार



जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : खडकवासला धरणसाखळीतील घटत्या पाणीसाठ्याच्या पार्श्वभूमीवर महापालिकेने सोमवारपासून शहरात सम–विषम तारखेनुसार दिवसाआड पाणीपुरवठ्याची अंमलबजावणी सुरू केली. सोमवारी विषम तारखेला पाणीपुरवठा होणाऱ्या काही भागांत कमी दाबाने, तर काही ठिकाणी अपुरा पुरवठा झाल्याची तक्रार नागरिकांनी केली. याबाबत संबंधित उपअभियंत्यांना फोन केले असता काहींचे फोन लागले नाही, तर काहींचे फोन डायव्हर्ट होते. पहिल्याच दिवशी ही अवस्था असल्याने येणाऱ्या काळात प्रशासनाची पाणीपुरवठा करताना दमछाक होणार आहे.

अल निनोच्या प्रभावामुळे मान्सूनच्या आगमनास विलंब होत असून, अपेक्षित प्रमाणात पाऊस न झाल्याने शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांमधील उपलब्ध साठ्याचा काटकसरीने वापर करण्याच्या सूचना राज्य सरकारने दिल्या आहेत. त्यानुसार महापालिकेने सम–विषम पद्धतीने पाणीपुरवठा करण्यास सुरुवात केली आहे. नव्या नियोजनानुसार सोमवारी विषम तारखांच्या भागांना पाणीपुरवठा करण्यात आला.

मंगळवारी सम तारखांच्या भागांना पाणी सोडण्यात येणार आहे. मात्र, पहिल्या दिवशी काही भागांत पाण्याच्या अडचणी आल्या. जनता वसाहत, दांडेकर पूल, फरशी पूल, दत्तवाडी, पानमळा, राजाराम पूल परिसर, नवश्या मारुती मंदिर, आंबेडकर वसाहत परिसरात काही ठिकाणी पाणी आले. मात्र, ते कमी दाबाने आल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या. तसेच, काही काळ पाणीपुरवठा बंद होता, असेही काहींनी सांगितले. तसेच, हिंगणे, सिंहगड रस्त्याच्या काही भागांत देखील कमी दाबाने पाणीपुरवठा झाला.

उपनगरातील कर्वेनगरमधील काही भाग वगळता उर्वरित कर्वेनगर, वारजे माळवाडी, शिवणे, उत्तमनगर, कोंढवे धावडे आदी भागांत सम तारखेस पाणीपुरवठा होणार आहे. कर्वेनगरमधील श्रमिक वसाहत, वडारवस्ती, एस. बी. आय. कॉलनी या तीन ठिकाणी दुपारच्या ठरावीक वेळेत पाणी आले असून, याच भागातील शेजारील लेनमध्ये पाणी आले नसल्याने नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला असून, किमान होणारा तरी पाणीपुरवठा पुरेशा प्रमाणात करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.



# अग्रलेख : इराण-इस्त्रायल युध्दबंदी खरी की खोटी?

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेतील वाढती बेरोजगारी, महागाई, जनमताचा दबाव व सिनेटमधील वाढता विरोध लक्षात घेऊन युद्धबंदीची घोषणा केली आहे. ही युद्धबंदी खरी मानायची की केवळ राजकीय डावपेच ते काळच ठरवेल. निवडणुकीत विजय मिळवून व्हाईट हाऊसमध्ये पोहोचल्यानंतर युद्धे थांबविण्याचे आश्वासन देणारे ट्रम्प स्वत:च इराणविरोधातील युद्ध मोहिमेत इस्रायलच्या बाजूने उभे राहिले. तीन महिने उलटून गेले तरी संघर्ष पूर्णपणे थांबण्याची चिन्हे दिसत नाहीत. युद्ध सुरू करणे सोपे असते; परंतु ते थांबविणे कठीण असते हेच यावरून दिसून येते म्हणूनच युद्धबंदी ही तारेवरची कसरत असते, असे म्हटले जाते. डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेतील वाढती बेरोजगारी, महागाई, जनमताचा दबाव आणि सिनेटमधील वाढता विरोध लक्षात घेऊन युद्धबंदीची घोषणा केली खरी; परंतु शांतता कराराच्या अंतिम टप्प्याबाबत संभ्रम कायम असल्याने युद्धबंदी खरी की खोटी, असा संशय निर्माण होतो. ट्रम्प यांच्याबद्दल असा आरोप केला जातो की, ते बोलतात एक आणि करतात दुसरेच! त्यातच वारंवार ट्रम्प युद्धबंदीची घोषणा करतात; पण इराण त्याला फारसे महत्त्व देत नाही.

तिकडे इस्रायलही माघार घेण्यास तयार दिसत नाही. त्यातच इराणने करारावर स्वाक्षरी होणार नसल्याचे स्पष्ट केले होते. डोनाल्ड ट्रम्प यांनी काही दिवसांत सामंजस्य करारावर स्वाक्ष-या होऊ शकतात, असे म्हटले होते. इराणचा अणु कार्यक्रम, संबंधित युरेनियमचा साठा, अमेरिकेकडून निर्बंध सवलत आणि होर्मुझ सामुद्रधुनीतील जहाज वाहतुकीची सुरक्षा या प्रमुख मुद्यांबाबत इराणने सावध भूमिका घेतली आहे. इस्लामाबाद सामंजस्य करारातील तपशिलाबाबत तर्कवितर्क टाळण्याचे आवाहन इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची यांनी केले आहे. या संघर्षामुळे जागतिक ऊर्जाबाजार, तेल वाहतूक आणि मध्य पूर्वेतील सुरक्षा व्यवस्थेवर मोठा परिणाम झाला आहे. आखाती संघर्षामुळे कच्च्या तेलाच्या किमतीमध्ये मोठी वाढ झाली. होर्मुझ सामुद्रधुनीतील तणावामुळे जगातील सुमारे २० टक्के तेल पुरवठ्यावर परिणाम झाला.

पुन्हा ट्रम्प यांनी युद्धविरामाची घोषणा करताच शेअरबाजाराने तेजीचा सूर पकडला. ब्रेंट क्रुड तेलाचे दर ८७ डॉलर प्रती बॅरलपर्यंत घसरले. युद्धाच्या तणावात ब्रेंट कच्च्या तेलाचे दर ११० डॉलरपर्यंत वाढले होते. सध्या तेलाच्या दरात दिलासा मिळाला आहे. युद्धकाळात तेलाच्या चढ्या दरामुळे अमेरिका, युरोप, आशिया, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि लॅटिन अमेरिकेतील अर्थव्यवस्थांवर विपरीत परिणाम झाला होता. जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढल्या होत्या तसेच आर्थिक अनिश्चितता वाढली होती. अमेरिका, इराण आणि इस्रायल यांच्यातील संघर्ष कमी होण्याची चिन्हे दिसताच शेअर बाजारात तेजी आली, कच्च्या तेलाच्या किमती काही प्रमाणात घटल्या. अमेरिकन काँग्रेस व संरक्षण विभागाच्या अहवालानुसार युद्धामुळे मोठ्या प्रमाणावर आर्थिक आणि लष्करी नुकसान झाले.

युद्ध जिंकण्याचा दावा करणा-या ट्रम्प प्रशासनाला प्रत्यक्षात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. युद्ध समाप्तीची घोषणा झाली असली तरी युद्धबंदीचा करार नेमका कधी होणार, याबाबत संभ्रम आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील शांतता कराराच्या मसुद्यात अणु कार्यक्रम, तेलबंदी, गोठवलेली मालमत्ता आणि होर्मुझची सामुद्रधुनी या मुद्यांवर एकमत झाल्याचे एका वरिष्ठ इराणी अधिका-याने म्हटले आहे. त्यानुसार इराण अणुशस्त्रे विकसित करणार नाही किंवा इतर कोणत्याही देशाकडून ती घेणार नाही. इराण होर्मुझची सामुद्रधुनी सर्व व्यापारी जहाजांसाठी खुली करणार आहे. त्या बदल्यात अमेरिका इराणी बंदरावरील आपली नौदल नाकेबंदी उठवेल आणि इराणच्या तेल निर्यातीवरील निर्बंधही तात्पुरते शिथिल करेल.

मसुद्यानुसार, अमेरिका इराणची २५ अब्ज डॉलर्स किमतीची जप्त केलेली मालमत्ता परत करेल. अमेरिका आपल्या मित्र राष्ट्रांसोबत इराणच्या पुनर्विकास आणि विकासासाठी एक योजना तयार करण्याचे कामही करेल. अंतिम करार होईपर्यंत इराण आपल्या सध्याच्या अणु कार्यक्रमात कोणतेही मोठे बदल करणार नाही. इराणने कोणत्याही शांतता कराराला लेबनॉनमधील युद्धविरामाशी जोडले आहे. इस्रायलच्या सततच्या लष्करी कारवाया आणि विरोधानंतरही अमेरिकेने मसुद्यात लेबनॉनसह सर्व आघाड्यांवर युद्धविराम करणा-या इराणच्या अटीला सहमती दर्शवली आहे. अमेरिका ३० दिवसांच्या आत नौदल नाकेबंदी पूर्णपणे हटवणार आहे.

अमेरिकेने होर्मुझच्या सामुद्रधुनीवर लादलेली नाकेबंदी पुन्हा खुली केली जाईल. ही सामुद्रधुनी इराणी नियामक चौकटीनुसार कार्यरत राहील आणि त्यातून जाणा-या जहाजांकडून टोलऐवजी सेवा शुल्क आकारण्याची इराणला मुभा असेल. जप्त केलेल्या मालमत्तेच्या परतफेडीसाठी ६० दिवसांचा वाटाघाटीचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. या वाटाघाटीदरम्यान परदेशात गोठवलेली इराणची २४ अब्ज डॉलर्सची मालमत्ता मुक्त केली जाईल. या रकमेपैकी अर्धी रक्कम अंतिम वाटाघाटी सुरू होण्यापूर्वी इराणला परत केली जाऊ शकते. इराणला आपला शांततापूर्ण नागरी अणुऊर्जा कार्यक्रम सुरू ठेवण्याची परवानगी दिली जाईल. कराराच्या तरतुदींची अंमलबजावणी आणि पालनावर देखरेख ठेवण्यासाठी एक समर्पित यंत्रणा स्थापन केली जाईल आणि अंतिम करार संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेच्या ठरावा-द्वारे अधिकृतपणे लागू केला जाईल.

# ठाकरेंचे ५-६ खासदार फुटल्यास अपातेचा बडगा

## राजकारण

### कारवाई टाळण्यासाठी शिंदेंसमोर ‘संवैधानिक मार्ग’

पुन्हा एकदा उबाठा शिवसेनेला धक्का देत ऑपरेशन टायगर अंतर्गत खासदार-आमदारांचा गट शिंदेसेनेत प्रवेश करणार असल्याची चर्चा आहे. ‘ऑपरेशन टायगर’अंतर्गत त्याची व्यूहरचनाही सुरू आहे. परंतु त्यासाठी कायदेशीर अडचणही समोर आली आहे. ठाकरे गटाचे किमान ७ किंवा त्यापेक्षा जास्त खासदार फुटायला हवेत. त्याऐवजी ५ किंवा ६ खासदार फुटले तर ते अपात्र ठरतील, असे महाराष्ट्र विधीमंडळाचे माजी सचिव अनंत कळसे यांनी शिंदे यांना सुचविल्याचे कळते. यसाठी संवैधानिक मार्गाचा अवलंब करून ही प्रक्रिया पार पाडण्याचे सूचविल्याचे समजते.

महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठ्या राजकीय भूकंपाची चर्चा रंगू लागली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून 'ऑपरेशन टायगर' सुरू करण्यात आल्याचा दावा केला जात आहे. या अंतर्गत उद्धव ठाकरे (णववहर्रीं यांच्या शिवसेना गटातील ९ पैकी तब्बल ५ ते ६ खासदार शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश करणार असल्याच्या जोरदार चर्चा आहेत. उद्धव ठाकरे यांनी बोल-ावलेल्या तातडीच्या बैठकीला ९ पैकी केवळ ४ खासदार उपस्थित राहिल्याने या चर्चांना उधाण आलं आहे.

या संपूर्ण पार्श्वभूमीवर, खासदार फुटल्यास नेमकी




कोणती कायदेशीर आणि संवैधानिक प्रक्रिया लागू होते? ते अपात्र ठरणार की त्यांचा स्वतंत्र गट स्थापन होणार? याबाबत महाराष्ट्र विधीमंडळाचे माजी सचिव अनंत कळसे यांनी महत्त्वपूर्ण कायदेशीर आणि तांत्रिक विश्लेषण मांडलं आहे.

**पक्षबदल बंदी कायदा व बहुमताचा नियम**

अनंत कळसे यांनी दिलेल्या माहितीनुसार, जेव्हा खासदार किंवा आमदार पक्ष सोडतात, तेव्हा त्यांच्यावर १० व्या अनुसूचीनुसार म्हणजे पक्षांतर बंदी कायद्यानुसार कारवाई केली जाते. हा कायदा राजीव गांधी पंतप्रधान असताना लागू केला होता.

**विलीनीकरणाचा नियम काय सांगतो?**

जर एखाद्या पक्षाचे लोकप्रतिनिधी फुटून बाहेर पडत असतील आणि त्यांना अपात्रतेची कारवाई टाळायची असेल, तर त्यांच्याकडे मूळ पक्षाच्या एकूण संख्येच्या दोन तृतीयांश (२/३) लोकप्रतिनिधींचे बहुमत असणे बंधनकारक आहे.

**न्यायालयीन दिरंगाईवर चिंता**

अनंत कळसे यांनी स्पष्ट केलं की, बाहेर पडणाऱ्या गटाला आपणच 'मूळ पक्ष' आहोत हे सिद्ध करावे लागते. सन २०२२ मधील शिवसेना आणि त्यानंतरचे राष्ट्रवादी काँग्रेसचे पक्ष फुटीचे खटले सर्वोच्च न्यायालयात अद्याप प्रलंबित आहेत, त्यावर अंतिम निर्णय लागलेला नाही. त्यामुळे नवीन खासदारांचे हे प्रकरण देखील न्यायालयात जाणे निश्चित आहे. वास्तविक पूर्वी शिवसेनेचे ४० आमदार फुटूनही अद्याप कोर्टात कोणतीही अंतिम कारवाई झालेली नाही, यावर कळसे यांनी स्पष्ट मत मांडले. सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड आणि न्यायमूर्ती गवई यांच्या खंडपीठासमोर ही प्रकरणे चालली. मात्र, देशाच्या संविधानाच्या दृष्टीने महत्त्वाची असलेली ही प्रकरणे इतका मोठा काळ प्रलंबित राहणे योग्य नाही, असं मत कळसे यांनी व्यक्त केलं. संविधानाचा नेमका अर्थ लावून न्यायालयाने अशा प्रकरणांवर अत्यंत जलद गतीने निर्णय द्यायला हवेत, जेणेकरून भविष्यात लोकशाही आणि संविधानाचा गैरवापर होणार नाही आणि राजकीय अस्थिरतेचा असा खेळ प्रलंबित राहणार नाही, असं मत अनंत कळसे यांनी व्यक्त केलं.

ठाकरे गटाकडे सध्या ९ खासदार आहेत. त्यामुळे अपात्रतेपासून वाचण्यासाठी आणि कायदेशीर विलीनीकरणासाठी कमीत कमी ७ खासदारांचा गट एकत्र बाहेर पडणे आवश्यक आहे. जर ७ खासदार एकत्र बाहेर पडले आणि त्यांनी दुसऱ्या पक्षात विलीनीकरण केले, तर त्यांच्यावर अपात्रतेची कारवाई होऊ शकत नाही.

**५ किंवा ६ खासदार बाहेर पडल्यास काय?**

जर ९ पैकी केवळ ५ किंवा ६ खासदार बाहेर पडले, तर तो आकडा दोन तृतीयांश होत नाही. अशा परिस्थितीत या ५ किंवा ६ खासदारांवर अपात्रतेची कारवाई होऊ शकते. राजकीय गणितात अनेकदा खासदार किंवा आमदार एकत्र न जाता आधी काही जण आणि नंतर उर्वरित जण जातात. यावर अनंत कळसे यांनी ऐतिहासिक दाखला दिला आहे.

मधुकरराव चौधरी यांच्या काळातील दाखला: विधीमंडळाचे माजी अध्यक्ष मधुकरराव चौधरी यांच्या कार्यकाळात अशीच एक परिस्थिती निर्माण झाली होती. जेव्हा लोकप्रतिनिधी वेगवेगळ्या गटात किंवा वेगवेगळ्या दिवशी फुटतात, तेव्हा त्यांच्या संख्येचा कायदेशीर अर्थ लावण्यात येणं जाणं गरजेचं ठरतं.

## अंतरंग

### काँग्रेस रस्त्यावर उतरणार का ?

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीच्यावतीने मुंबईत दादर येथील टिळक भवन या मुख्यालयात, भारतात येणारी आर्थिक सुत्नामी या विषयावर नुकतेच चर्चा सत्र आयोजित केले होते. या कार्यक्रमास माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ, दिल्लीच्या जेएनयुमधील अर्थशास्त्राचे प्रा. अरूणकुमार, अर्थतज्ञ डॉ. भालचंद्र मुणगेकर, ज्येष्ठ संपादक व माजी खासदार कुमार केतकर, बॅ. विठ्ठलराव गाडगीळ यांचे सुपुत्र व आर्किटेक्ट अनंतराव गाडगीळ, प्रदेश काँग्रेसच्या अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख विश्वास उटगी अशी बुध्दीवादी मंडळी मंचावर उपस्थित होती. प्रमुख भाषण झाले ते माजी केंद्रीयमंत्री यशवंत सिन्हा यांचे प्रदेश काँग्रेसमधील अर्थविषय चर्चासत्राचा अजेंडा अखिल भारतीय काँग्रेसकडून आला असावा. देशाची ढासळलेली अर्थव्यवस्था, महागाईचा उसळलेला डोंब, पेट्रोल, डिझेल व घरगुती ग'सच्या दरात झालेली प्रचंड वाढ, विकास दराचे संशयास्पद आकडे, सुशिक्षित तरूणांमधील महाप्रचंड बेरोजगारी, सामान्य माणसाचे जीवन सुखावह राहीलेले नाही, राज्यकर्ते व जनता यांच्यात फार मोठे अंतर पडलेले आहे. वृत्तपत्रे व टीव्ही वृत्तवाहिन्यांवर वास्तव चित्र मांडले जात नाही. भाजपाचे सरकार केवळ उत्सव व घोषणाबाजीत व्यस्त आहे. माजी केंद्रीय मंत्री यशवंत सिन्हा हे या चर्चासत्राचे आकर्षण होते. ते अगोदर आयएएस अधिकारी होते. नंतर चंद्रशेखर व अटल बिहारी वाजपेयी यांच्या सरकारमधे मंत्री होते. देशाचे अर्थ व परराष्ट्रमंत्री म्हणून त्यांनी काम केले आहे. मोदी सरकारच्या कामगिरीबाबत झालेल्या मतभेदानंतर ते भाजपाचा राजीनामा देऊन बाहेर पडले. वयाची ऐंशी पार केलेले यशवंत सिन्हा हातात काठी घेऊन टिळक भवनचे दोन मजले चढून सभागृहात भाषणासाठी आले.

ज्यांनी अटल बिहारी वाजपेयी किंवा लालकृष्ण अडवाणी यांचा विश्वास प्राप्त केला होता, भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते म्हणून दिल्लीत पत्रकारांना संबोधित करीत असत. त्या यशवंत सिन्हांची ओळख आज मोदी विरोधक म्हणून झाली आहे. कोणाचीही पर्वा न करता सिन्हा आपली भुमिका रोखठोकपणे मांडत असतात. त्यांनी भाजपामधे असताना काँग्रेसने देशासाठी काय केले असे प्रश्न कधी विचारले नाहीत. काँग्रेसच्या माजी पंतप्रधानांवर त्यांनी कधी वैयक्तिक टीका केली नाही. आता ते काँग्रेसच्या व्यासपीठावर येऊन मोदी सरकारवर यथेच्छ टीका करू लागले आहेत, मोदी सरकारच्या विकास दराबाबत शंका व्यक्त करीत आहेत. एवढेच नव्हे तर देश येणाऱ्या आर्थिक सुत्नामीपासून वाचवायचे असेल तर मोदी मस्ट गो असे परखडपणे सांगत आहेत. राहूल गांधींच्या सुरात सूर मिसळून यशवंत सिन्हा मोदी सरकारवर आगपाखड करताना दिसत आहेत. भारत सरकार विकास दराचे आकडे फुगवून सांगत आहे असे आंतरराष्ट्रीय नाणे निधिनेच आपल्या अहवालात म्हटले असल्याचे सांगत सिन्हा यांनी त्या अहवालातील काही परिच्छेद वाचून दाखवले. विकास दर ७. ७ असल्याचा ते दावा करतात पण तो ६. ५ पेक्षा जास्त नसावा असे ते सांगत आहेत. सरकारची विश्वासार्हता संपली आहे. सरकार वारंवार खोटे बोलत आहे असे सिन्हा यांचे आरोप आहेत. देशातील महागाई, बेरोजगारी यांचा अमेरिका- इराण युध्दाशी काहीही संबंध नाही तर मोदी सरकारच्या आर्थिक धोरणांचा तो परिणाम आहे असे सिन्हा ठासून सांगतात. पंडित नेहरूंपासून ते वाजपेयींपर्यंत देशाच्या प्रत्येक पंतप्रधानाने देशावर आलेल्या संकटाशी खंबीरपणे मुकाबला केला, मोदी सरकारमधे संकटाशी मुकाबला करण्याची इच्छाशक्तिच नाही अशीही टीका सिन्हा यांनी केली. भारताने अमेरिकेपुढे शरणागती पत्करली आहे. अमेरिकेचा जो आदेश आहे, त्याचे भारत पालन करीत आहे. त्याचा परिणाम भारताच्या अर्थव्यवस्थेवर होत आहे. भारताला हे शोभादायक नाही, असेही सिन्हा यांनी मतप्रदर्शन केले.

देशाचे भविष्य संकटात आहे. ऑफीससमधे बसून किंवा समाज माध्यमांवर आरोप करून काही साध्य होणार नाही, त्यासाठी आता रस्त्यावर उतरावे लागेल. देशाला स्वातंत्र्य काँग्रेसने मिळवून दिले, आताही देशाला काँग्रेसने वाचवावे अशी अपेक्षा यशवंत सिन्हा यांनी केली. हे याच चर्चासत्राचा समारोप करताना प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांनी काँग्रेसला रस्त्यावर उतरून स्वातंत्र्याची दुसरी लढाई लढावी लागणार आहे असे जाहीर करून टाकले. दिल्लीत इंडिया आघाडीची बैठक आठ जून रोजी झाली. या बैठकीत राहुल गांधी यांनी केलेले भाषण काँग्रेस पक्षाने सविस्तरपणे उपलब्ध करून दिले. त्यात राहुल यांनी सरकारविरोधात आता रस्त्यावर उतरून आंदोलन केल्याशिवाय पर्याय नाही असे स्पष्ट म्हटले आहे. लोकांना वाटते, आपण भाजपाचा पराभव कसा करणार ? पण आपण एकजुटीने उभे राहिलो, तर भाजपाला हरवणे सोपे आहे. आज तरी संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात स्वत:ला झोकून देणाऱ्या तरूणांची फौज नाही. सरकारवर तोफा डागणारे सेनापती बापट, एसएम जोशी, आचार्य अत्रे, कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे, प्रबोधनकार ठाकरे असे कोणी नेते नाहीत. मराठी माणसांची एकजूट करण्यासाठी रस्त्यावर उतरणारे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे नाहीत. इंदिरा गांधी सरकारविरूध्द देशव्यापापी आंदोलन उभारणारे जयप्रकाश नारायण नाहीत. महागाईच्या विरोधात रस्त्यावर उतरणाऱ्या मृणाल गोरे, अहिल्या रांगणेकर किंवा कमल देसाई नाहीत. लोकपालच्या मागणीसाठी जंतरमंतरवर आंदोलन करून साऱ्या देशाचे लक्ष वेधून घेणारे कोणी अण्णा हजारे पुढे आलेले नाहीत. कॉक्रोच जनता पार्टीने केलेल्या आंदोलनाला मिडियातून प्रसिध्दी मिळत नाही. मोदी सरकारच्या विरोधात रस्त्यावर उतरले तर पोलीस किती गुन्हे दाखल करतील याचा कल्पनही नाही. नेत्यांच्या घरी इडी, आयटी किंवा सीबीआयच्या किती नोटीसा येतील हे सांगता येत नाही. तोड फोडीनंतर विरोधी पक्ष अगोदरच कमजोर झाले आहेत. सरकार विरोधात लढायला रस्त्यावर कोण उतरणार ?

**- डॉ. सुकृत खांडेकर**

## पंचांग

विक्रम संवत्- २०८२ निज ज्येष्ठ शके संवत्- १९४८ संवत्सर - पराभवनाम अयन- उत्तरायणारंभ मास- निज ज्येष्ठ ऋतु- सौर ग्रीष्म शुक्ल पक्ष तिथि : तृतीया २१:३८:५४ नक्षत्र : पुनर्वसु १३:३६:४२ योग : ध्रुव २०:५०:३३ करण : तैतिल ११:१२:०४ करण : गर २१:३८:५४ सूर्य : मिथुन चन्द्र : कर्क०८:१३:०१

हिजरी सन् - १४४८ मुस्लिम मास - मोहरम तारीख - १ विशेष महाराणा प्रताप जयंती (तिथीप्रमाणे) गोपाळ गणेश आगरकर पुण्यतिथी राजमाता जिजाऊसाहेब भोंसले पुण्यतिथी (तारेखप्रमाणे) रंभाव्रत झाशीची राणी लक्ष्मीबाई पुण्यतिथी (तारेखप्रमाणे) मुस्लिम नूतन वर्षारंभ हिजरी सन १४४८ प्रारंभ

## राशी भविष्य...

**मेष** - कामकाजात अडचणी आल्यामुळे आपल्याला चिंता लागणार आहे. आर्थिक स्थिती मध्यम राहील. निष्कारण वाद विवाद करू नका. उत्साह राहणार नाही. नवीन संबंधाच्या बाबतीत जागरूकता दाखवा.

**वृषभ** - मुलांच्या संबधातील कामात प्रगती राहील. मान सन्मान यश मिळेल. प्रिय व्यक्तिची भेट होण्याची शक्यता आहे. आपल्या मनासारखे सर्व काही होईल. आळसाला दूर राखा.

**मिथून** - भागीदारी व्यवसायात फायदा होईल. अडचणी दूर होतील. विचारपूर्वक व स्वनिर्णय घेऊन कामे करा. विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

**कर्क** - नोकरीमध्ये आधिकारी नाराज राहतील. खूप प्रयत्न केले तरी कामात थोडेच यश मिळेल. कौटुंबिक चिंतेमुळे मन असमाधानी राहील. आर्थिक स्थिती मध्यम राहील.

**सिंह** - आज आपली कार्यक्षमता वाढणार आहे. वहान सुख मिळेल. कुटुंबातील सद्स्याची काळजी घ्या. व्यापारातील योजना फलदायी होतील. आर्थिक उत्पन्न वाढेल.

**कन्या** - नोकरीमधील कुशलतेमुळे फायदा मिळेल. शत्रुच्या कुटनितीपासून सावध रहा. जमिनीचे व्यवहार आज फायदेशीर राहतील. कौटुंबिक सुख मिळेल. आपल्या कामाची स्तुती होईल.

**तूळ** - व्यापारात प्रगतीचे योग आहेत. कलेविषयातील रूची वाढेल. प्रभावशाली व्यक्तिंच्या भेटी होतील. आर्थिक फायदा मिळण्याचे योग आहेत. संयमाने कामे करा.

**वृश्चिक** - नोकरीत इच्छेप्रमाणे बदली किंवा बढती मिळण्याचे योग आहेत. कुटुंबात आनंदी वातावरण राहील. नवीन लोकांचा संपर्क फायदेशीर असणार आहे. घाईने निर्णय घेऊ नका.

**धनू** - जीवनासाथीशी संबंध सुधारतील. कायद्याचा निकाल आपल्या बाजूने लागेल. कामकाजाचे क्षेत्र वाढणार आहे. नोकरांवर विश्वास दाखवू नका. कौटुंबिक संबंध सुधारतील.

**मकर** - योग्य परिश्रम घेतल्याने आपले काम सुरळीत पार पडणार आहे. कौटुंबिक अडचण दूर होईल. जीवनसाथीची साथ मिळेल. प्रवासात सावधानता बाळगा.

**कुंभ** - कौटुंबिक वाद, मतभेद आपल्या प्रयत्नामुळे संपुष्टात येणार आहे. व्यावसायिक यशामुळे आनंदी रहाल. उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करू नका. कामकाजाची परिस्थिती फायदेशीर राहील.

**मीन** - विनम्र होऊन कार्य केले तर प्रत्येक कामात यश मिळेल. मनासारखा फायदा होईल. मुलांच्या कामामुळे समाजात प्रतिष्ठा वाढेल. वाद विवादापासून दूर रहा.

## पारावरचा फड

विधान परिषद निवडणुकीच्या निमित्तानं जिथं चुरस आहे किंवा मतदान होणार आहे तेथे मात्र आता नेत्यांपेक्षा मतदार नगरसेवक, जि. प. सदस्यांचा उतावळेपणा दिसून येऊ लागला आहे. त्यातल्या त्यात सांगली-सातारा विधान परिषद निवडणूक तर ‘इधर चला मै उधर चला मै’ असं म्हणता म्हणता कुणीच विचारेना असं झाल्याचे चित्र आहे. वास्तविक प्रत्यक्षात संख्याबळानुसार महायुतीतील भाजप उमेदवार साडेसह-ाशेच्या घरात तर महाविकास आघाडीच्या शरद पवार राष्ट्रवादीचे उमेदवार दोनशेच्या घरात मतदान मिळवू शकतो असे सरळ चित्र दिसते. परंतु निवडणुकीला महायुतीतील सातारा जिल्हा परिषद निवडणुकीच्या वादाचे गालबोट लागले आहे. त्यामुळे शिंदेसेना आणि अजित पवार राष्ट्रवादीने ताणून धरल्याने त्यांचे संख्याबळ तब्बल ३२५ च्या वर आहे. ते ज्यांच्या पारड्यात तिकडे विजय हे स्पष्ट आहे. आता दोन दिवस उरल्याने नेत्यांनी काय ना काय निर्णय घ्यावा. जेणेकरून आम्हाला ‘चहापाना’ला तरी बोलावून संपवावे अशी मागणी सुरू आहे. यासंदर्भात पारावरची चर्चा!

**बाबूराव :** इधान परिषद इलेक्शान म्हायुती १६ च्या १६ जागा मारनार आसं बोललं जात हुतं, पन आता तानलंया समदीकडं.

**पांडूनाना :** व्हय, आरं त्या नाशकात गोकुळ गितेनं घाईला आनलं आन् फडनवीसांसकट समद्यांनी इषय मिटवत शिंदेंच्या उमेदवाराला दिलासा दिला.

**बाबूराव :** ते समदं खरं आसलं तरी आजून बी जिवात जीव न्हाय. म्हनून टिरपला नेलंया.

**पांडूनाना :** ह्या इलेक्शान म्हजी मतदाराची खुशमसकरी, गोवा न्हायतर कुटं तर चैनी हावीच की.

**बाबूराव :** ह्यो परगात आगुदरपासनं सुरूच हाय.

**पांडूनाना :** व्हय, सांगली-साताऱ्याची भाजपवाल्यानी वाट बगून बगून आपली गोव्याला नेली म्हनं.

**बाबूराव :** तेनास्नी न्हेन्याची गरज काय? उलट राष्टरवादी आन् शिंदेशेनेच्या साडेतीनशे मतदारास्नी खुश कराय हावं हुतं न्हवं. नेत्यास्नी कळत न्हाय काय?

**पांडूनाना :** आरं पर शंभुराजं आन् मकरंदआबानी तानून धरल्यानं आडलंया.

**बाबूराव :** आरं म्हाईकास आगाडीवालं कुटं इचाराय लागल्याती. तेबी गप्प हायती की त्येंच्या लोकांस्नी.

**पांडूनाना :** त्येंचं काय गाजराची पुंगीच हाय. वाजली तर वाजली शिंदेशेना आन् आजितदादा गटाच्या जिवावं.

**बाबूराव :** पर समद्यास्नी दोनीकडचं पावनं उपाशी आसं व्हायची येळ आलीया.

**पांडूनाना :** आता सदस्यच नेत्यांच्या मागं लागल्याती एकदाचं काय तर मिटवा आन् आमचा इषय सपवा म्हनून.

**बाबूराव :** व्हय, एकच दिस न्हायलाया. न्हायतर उपाशीच न्हायची येळ याची!

**पांडूनाना :** कायतर पदरात पडंल! **- अमृत चौगुले**

## उपदेश कथा

**संगीत**

एके दिवशी बादशहा अकबर संगीतसम्राट तानसेनला म्हणाले, ‘आपण संगीतातले जणू शिखर आहात. आपल्याला हे संगीत शिकवलं कुणी? तुझ्या गुरूचं गाणं ऐकायचं आहे.’ तानसेन म्हणाले, ‘त्याचं गाणं ऐकायला तर बादशहा आपल्याला तिथंवर जावं लागेल.’ तानसेन व अकबर यमुना तीरावरच्या एका झोपडीपाशी रात्रीच्या अंधारात पोहोचले. पहाटे तानसेनांचे गुरू स्वामी हरिदास गाऊ लागले. त्यांचं गाणंकेवळ दिव्य होतं. दोघ नि:शब्द होऊन महालात परतले. बादशहा म्हणाले, ‘असं संगीत तुझ्या गळ्यातून का येत नाही’ त्यावर तानसेन उद्‌गारले ‘मी काही मिळविण्यासाठी गातो’ तर गुरुजींनी आधीच काही मिळविलेले आहे. गाणं हे माझ्याबाबतीत साधन आहे. त्यात ते पूर्ण भरून गेले आहेत आणितेच दिव्य संगीताच्या रुपानं ओसंडून वाहत आहे. मला प्रसिध्दी, प्रतिष्ठा, संपत्ती हवी आहे. पण मलादेखील जेव्हा साध्य लाभेल तेव्हा मी सुध्दा हे साधन सोडेन.’’

**कथा उपदेश : काही मिळविण्याची आकांक्षा नसेल तर विशुध्द कर्माचे फूल कारणाशिवाय उमलते. अंतर्यामातून वाहणाऱ्या स्वामी हरिदासांच्या दिव्य संगीतासारखे.**

## दिनविशेष...

**आंतरराष्ट्रीय**

१८८५ - स्टॅच्यु ऑफ लिबर्टीचे न्यूयॉर्क हॉर्बरवर आगमन झाले.

१९४४ - आयलँड प्रजासत्ताक देश बनला.

२००७ - अमेरिकेत नियंत्रण गमावल्यानंतर रेस कार प्रेक्षकांमध्ये घुसल्याने चार ठार व १५ जण जखमी झाले.

२००७ - पाकिस्तानच्या पश्चिमोत्तर भागात मुसळधार पावसामुळे आलेल्या पुरात २२ जणांचा मृत्यू झाला.

२००७ - अफगाणिस्तानमध्ये तालिबानी बंडखोरांच्या हल्ल्यात ४५ जण ठार झाले.

**राष्ट्रीय**

२००७ - महाराष्ट्र कृषी औद्योगिक विकास महामंडळ लिमिटेडच्या नोगा कंपनीस दिल्ली येथे नॅशनल प्रॉडक्टीव्हिटी कौन्सिलच्यावतीने राष्ट्रीय उत्पादकता पुरस्कार व विशेष प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

२००८ - रेल्वे पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने मुंबईतील चेंबूर नाका येथून साडे चौदा कोटी रूपयांचे ब्राऊन शुगर जप्त केले.

### मातृभाषेतून शिक्षण ही नैसर्गिक पध्दत

शिक्षणाची भाषा कोणती असावी यावर आपल्याकडे गेली अनेक वर्ष विचारमंथन सुरू आहे. केवळ समाजातच नव्हे तर घराघरांत यावर चर्चा सुरू आहे. चर्चा कसली वाद विवादच म्हणा कारण आईवडील, नातेवाईक, शेजारीपाजारी या सर्वांमध्ये याबाबत मतभिन्नता आढळते. शिक्षणासाठी कोणते माध्यम वापरावे याबाबत तर्कशास्त्र वापरले जात नसल्याने मध्यमवर्गीय आणि निम्नमध्यमवर्गीयांचा गोंधळ उडतो. विशेषतः इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या झगमगाटाला भुलून सर्वसामान्य माणूसही आपल्या पाल्याला इंग्रजी माध्यमांच्या शाळेत दाखल करू लागला. पूर्वी शहरी भागापूरते असणारे हे लोण आता ग्रामीण भागातही पसरले आहे. ग्रामीण तसेच शहरी भागातील गरीब, कष्टकरी पालक कर्ज काढून उधार उसनवारी करून लाखो रुपयांच्या देणग्या भरून आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमांच्या शाळेत दाखल करीत आहेत. मुळात इंग्रजी शिकणे आणि इंग्रजी माध्यम शिक्षण म्हणून निवडणे यात पालकांची गल्लत होते. इंग्रजी शिकण्यासाठी इंग्रजी माध्यम निवडणे खरेच गरजेचे आहे का? मातृभाषेतून शिक्षण घेऊनही चांगले इंग्रजी शिकता येते हेच पालक विसरत आहते. मातृभाषेतून शिक्षण हीच शिकण्याची नैसर्गिक पध्दत आहे. मातृभाषा ही खऱ्या अर्थाने ज्ञानभाषा आहे.

**-शाम ठाणेदार, पुणे**

## जन की बात...

### भारतातही मुलांना ‘सोशल मीडिया’ वापरावर बंदी हवी..!

नुकतीच ब्रिटन सरकारने सोळा



वर्षांखालील मुलांना सोशल मीडिया वापरण्यावर बंदी घालण्याची घोषणा केली आहे. आज सोशल मीडिया हे मुलांच्या बौध्दिक आणि मानसिक विकासासाठी एक मोठे आव्हान बनले असून सायबर बुलिंग (ऑनलाइन मानसिक छळ), अश्लील मजकूर, नैराश्य आणि आभासी जगाच्या अतिरेकामुळे लहान मुलांचे भविष्य धोक्यात आले आहे.

यामुळे लहान मुलांचे भावविश्व कोलमडून पडत आहे. हीच गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन आता जगभरातील अनेक देश यावर कडक पावले उचलत आहेत. सर्व प्रथम ऑस्ट्रेलियाने डिसेंबर २०२५ मध्ये १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडियावर पूर्णपणे बंदी घालणारा ऐतिहासिक कायदा लागू केल्यानंतर ब्राझील, इंडोनेशिया आणि मलेशिया या देशांनी अशाच प्रकारचे कडक कायदे अंमलात आणून लहान मुलांना या जाळ्यातून बाहेर काढण्यास सुरुवात केली. आता ब्रिटनसह कॅनडा, ऑस्ट्रिया, डेन्मार्क, फ्रान्स, जर्मनी, ग्रीस, पोलंड, स्लोव्हेनिया, स्पेन, तुर्की इत्यादी देशही अशा प्रकरचे डिजिटल सुरक्षा विधेयक आणून १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडिया बंदी अंमलात आणणार आहेत. या पार्श्वभूमीवर आपल्या देशातील अल्पवयीन मुलेही समाज माध्यमांचा मोठ्या प्रमाणावर वापर करत असून त्यावर नियंत्रण आणण्यासाठी अशा कठोर कायद्याची गरज आहे. कारण आपल्या देशातील १६ वर्षांखालील लोकसंख्या अंदाजे ३६ ते ३७ कोटी इतकी असून ती देशाच्या एकूण लोकसंख्येच्या सुमारे २४ टक्के ते २५ टक्के इतकी आहे. देशाचे भविष्य असलेल्या या मुलांचे बालपण आणि भविष्य त्यामुळे अधिक सुरक्षित होईल.

**- प्रदीप अनुसया शंकर मोरे, मुंबई**

### जीवनावश्यक वस्तूंचे दर कमी होतील?

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डॉनल्ड ट्रम्प यांनी ‘ट्रुथ सोशल’ या सामाजिक माध्यमाद्वारे अमेरिका आणि इराण यांच्यात १४ सूत्री शांतता करार झाल्याची घोषणा केली. त्यामुळे अमेरिका आणि इराण यांच्यात गेल्या १०७ दिवसांपासून चालू असलेले युध्द संपणार असल्याचे अंततः स्पष्ट झाले. १९ जूनला स्विझर्लंडमधील जिनिव्हा शहरात ट्रम्प यांच्या उपस्थितीत या शांतता करारावर स्वाक्षरी करण्यात येणार आहे. त्यानंतर संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषद यावर अंतिम मोहोर उमटवेल आणि त्यानंतर या युध्दाची अधिकृत समाप्ती होईल. युध्दामुळे अपरिमित जीवित आणि वित्त हानी तर होतेच शिवाय युध्दाचे दूरगामी परिणाम पुढे येणाऱ्या अनेक पिढ्यांना भोगावे लागतात. मागील साडेतीन महिन्यांहून अधिक काळ सुरु असलेल्या युध्दात भारताचा प्रत्यक्ष सहभाग नसला तरी युध्दाचे पडसाद भारतातही मोठ्या प्रमाणात उमटले आहेत. महागाईने जनता होरपळली आहे. इंधनाच्या दरात आठ्वडा आठवड्याने वाढ होत गेली . घरगुती गॅस सिलेंडरच्या पुरवठ्यावर कमालीचे निर्बंध आणण्यात आले ज्याचा सर्वात मोठा फटका हॉटेल व्यावसायिकांना बसला आहे. महागाईने सामान्य जनतेचे अक्षरश: कंबरडे मोडले. इंधनाचे दर वाढल्यावर त्याचा परिणाम सर्वच वस्तूंच्या दरावर होतो. ज्यामुळे सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक गणित पूर्णतः कोलमडून गेले आहे. अशा परिस्थिती झालेली युद्धबंदी समस्त जगाला दिलासा देणारी आहे, त्यामुळे आतातरी इंधनासह जीवनावश्यक वस्तूंचे दर कमी होणार का ? हा प्रश्न पडतो आहे.

**- मोक्षदा घाणेकर, सांगली**

# भीमा-पाटस साखर कारखान्याचा कारभार संशयाच्या भोवऱ्यात

## माहिती लपवत असल्याचा माजी आ. रमेश थोरातांचा आरोप

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पाटस :** पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील 'भीमा-पाटस सहकारी साखर कारखान्या'चा कारभार सध्या चांगलाच वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. कारखान्याचे सभासद आणि माजी आमदार रमेश थोरात यांनी कारखान्याकडे अत्यंत गंभीर आरोप करत, व्यवस्थापनावर कारखान्याची महत्त्वाची कागदपत्रे व पुस्तके जाणीवपूर्वक दडवून ठेवल्याचा आरोप केला आहे. या प्रकारामुळे कारखान्यात काहीतरी 'मोठं' दडवलं जात असल्याची चर्चा आता परिसरात रंगू लागली आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, रमेश थोरात यांनी १४ जुलै २०२५ रोजी 'महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०' चे कलम ३२(२) नुसार कारखान्याकडे विविध कागदपत्रांची अधिकृत मागणी केली होती. यामध्ये कारखान्याच्या दुरुस्तीसह उपविधी, व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची यादी, मागील काही वर्षांतील सर्व साधारण सभा व संचालक मंडळाच्या सभांचे इतिवृत्त, कारखान्याच्या भाडेतत्त्वावरील कराराच्या प्रती आणि लेखापरीक्षण अहवाल यांचा समावेश होता. हा अर्ज करून चार महिन्यांपेक्षा जास्त कालावधी उलटला तरीही कारखान्याच्या कार्यकारी संचालकांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली. थोरात यांनी वारंवार पाठपुरावा करूनही त्यांना केवळ 'पाहतो' अशी उत्तरे मिळाली. अखेर त्यांनी प्रादेशिक सहसंचालक (साखर), पुणे यांच्याकडे धाव घेतली. या प्रकरणी प्रादेशिक सहसंचालक कार्यालयाने नोटीस बजावून कारखान्याला कागदपत्रे देण्याचे निर्देश दिले होते. मात्र, त्यानंतरही कारखान्याकडून कोणतीही कार्यवाही झाली नाही. कारखान्याने सहकार विभागाच्या सूचनेकडेही दुर्लक्ष केल्याचे समोर आले आहे. माजी आ. रमेश थोरात यांनी ३० डिसेंबर २०२५ रोजी पुन्हा पत्र लिहून व्यवस्थापनाला कागदपत्रांची मागणी केली होती. कारखान्यातील महत्त्वाचे दस्तऐवज दडवून ते नष्ट करण्याचा किंवा फेरफार करण्याचा प्रयत्न केला जात असल्याची भीती त्यांनी व्यक्त केली आहे. माहिती नाकारून कारखान्याचे आणि सभासदांचे न भरून निघणारे नुकसान केले जात असून, हे सहकार कायद्याचे उल्लंघन असल्याचे त्यांनी म्हटले आहे. एका जबाबदार सहकारी कारखान्याने सभासदांना कायद्याने मिळालेला माहितीचा अधिकार नाकारणे, हे या कारखान्याच्या पारदर्शकतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे. आता सहकार विभाग यावर काय ठोस कारवाई करतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# भूक व भीकमुक्त महाराष्ट्राकरिता पुण्याने दिशादर्शक काम करावे : महेश ढवळे

■ जनप्रवास प्रतिनिधी



**पुणे :** राज्यातील प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळाला पाहिजे. त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने त्यांना सकस, स्वच्छ आणि दर्जेदार अन्न मिळाले पाहिजे. यामधून महाराष्ट्र राज्यातील नागरिक भीकमुक्त, भूकमुक्त आणि कुपोषणमुक्त झाला पाहिजे. एकही नागरिक उपाशी राहणार नाही, या दृष्टीने राज्य अन्न आयोग कार्य करीत आहे. पुणे जिल्ह्याने राज्याला दिशादर्शक असे काम करावे, असे निर्देश राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे यांनी दिले.

जिल्ह्यातील पुरवठा विषयक कामकाजाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी राज्य अन्न आयोगाचे सदस्य रणजीत निंबाळकर, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग राज्यस्तरीय सल्लागार समिती सदस्य प्रकाश पोरवाल, अपर जिल्हाधिकारी सतीश राऊत, जिल्हा पुरवठा अधिकारी महेश सुधळकर, महिला व बालविकास आयुक्तालयाचे सह आयुक्त दिलीप खिराळे, विभागीय उपायुक्त सुरेश टेळे, माध्यमिक शिक्षणाधिकारी भाऊसाहेब कारेकर, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी रोहिणी ढवळे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी आनंद खंडागळे यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी व विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

श्री. ढवळे म्हणाले, राज्यातील तृतीयपंथीय, देहविक्री करणारे तसेच भीक मागणाऱ्या नागरिकांचे ठिकाणनिहाय सर्वेक्षण करावे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून नागरिकांना त्यांचा लाभ मिळवून द्यावा व त्यांना सन्मानाने जगण्याचा अधिकार प्राप्त करून द्यावा. शिधापत्रिकेसंबंधित प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढून पात्र नागरिकांना शिधापत्रिका उपलब्ध करून द्याव्यात. त्यांना हक्काची घरे उपलब्ध करून देण्यासाठी कार्यवाही करावी. त्यांच्या मुलांना शिक्षणाची सोय करून दिल्यास त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडू शकतो. एकही नागरिक किंवा बालक शिक्षण, आरोग्य व अन्नापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी.

# मंचर बस स्थानकावर प्रवाशांचे दागिने चोरणाऱ्या चोरट्यांना अटक

■ जनप्रवास प्रतिनिधी

**निरगुडसर :** मंचर बसस्थानक परिसरात गर्दीचा फायदा घेत प्रवाशांच्या दागिन्यांवर डल्ला मारणाऱ्या सराईत चोरट्यांच्या टोळीचा मंचर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. पोलिसांनी चार आरोपींना अटक करत तब्बल ६ लाख ९२ हजार ४८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, आरोपींकडून तीन चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, मंचर येथील बसस्थानकात प्रवासी बसमध्ये चढत असताना किंवा गर्दीत उभे असताना त्यांच्या अंगावरील दागिने व मौल्यवान वस्तू चोरण्याच्या घटना सातत्याने घडत होत्या. १८ जून २०२६ रोजी सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास मंचर एसटी स्थानकात नाशिक-पुणे बसमध्ये चढत असलेल्या शकुंतला मनोहर थिटे (वय ६१, रा. मुकुंदवाडी रोड, मंचर) यांच्या हातातील सोन्याचे बांगड्या अज्ञात चोरट्यांनी गर्दीचा फायदा घेत लंपास केले. याप्रकरणी मंचर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास सुरू असताना मंचर पोलीस स्टेशन व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तांत्रिक आणि गोपनीय माहितीच्या आधारे संशयितांचा शोध सुरू केला. दरम्यान, मंचर पोलिसांचे पथक रात्री गस्त घालत असताना आंबेगाव तालुक्यातील एकलहरे गाव परिसरात एचपी पेट्रोल पंपाजवळ बंद पडलेल्या मंगल कार्यालयाशेजारी संशयास्पदरीत्या उभी असलेली चक-४६-थ-३१८४ क्रमांकाची एर्टिगा कार आढळली. कारमध्ये चार जण संशयास्पद हालचाली करत असल्याचे दिसून आल्याने पोलिसांनी त्यांची चौकशी केली. चौकशीत त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिल्याने पोलिसांचा संशय अधिक बळावला. त्यानंतर त्यांना ताब्यात घेऊन सखोल चौकशी केली असता चोरीच्या गुन्ह्यांची कबुली मिळाली. अमोल सुरेश टिंडंगे (वय ४०), कपिल सुरेश टिंडंगे (वय ३८), दीपक वतन आभंगे (वय ४८), राजेश दीपक गांगंगे (वय ५८) हे सर्व आरोपी सुभाषवाडी, चांद्रपाडा, अंबरनाथ, जि. ठाणे येथील रहिवासी असून सराईत गुन्हेगार असल्याचे तपासात समोर आले आहे.




अटक आरोपींवर यापूर्वी कल्याण परिसरात एकूण १५ चोरीचे गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले असून मंचर व खेड पोलीस ठाण्यातील तीन गुन्हे उघड झाले आहेत. अटक आरोपींकडून पोलिसांनी ईरटीका कार सह एकूण ६ लाख ९२ हजार ४८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पुढील तपास मंचर पोलीस करत आहेत.

# नैसर्गिक तेजासाठी त्वचेला आवश्यक असलेले ६ पोषक घटक

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** कोणत्याही सौंदर्य विभागातून फिरताना तुम्हाला इन्स्टंट ग्लोचे आश्वासन देणारे सिरम्स, फेस मास्क्स आणि ओव्हरनाईट क्रीम्स यांची भरमार दिसते. मात्र, कोणताही क्लिनिकल न्यूट्रिशनिस्ट सांगेल की त्वचा ही केवळ शरीरात आत काय घडते याचे प्रतिबिंब असते.

खराब आहाराला केवळ स्किनकेअरने संतुलित करता येत नाही. जेव्हा शरीराला आवश्यक सूक्ष्म पोषक घटकांची कमतरता भासते, तेव्हा त्याचे परिणाम थेट चेहऱ्यावर दिसतात निस्तेजपणा, कोरडेपणा किंवा लवकर येणाऱ्या सूक्ष्म सुरकुत्यांच्या स्वरूपात.

रात्री चेहरा धुतल्यावरही नाहीशी न होणारी, नैसर्गिक आणि चिरकाल टिकणारी त्वचा-कांती मिळवण्यात तुम्हाला मदत करण्यासाठी, 'मॅक्स हेल्थकेअर'च्या आहारशास्त्र विभागाच्या प्रादेशिक प्रमुख रितिका समाद्दार अशा सहा मूलभूत पोषक घटकांची माहिती देत आहेत, जे तुमच्या त्वचेला अगदी पेशींच्या पातळीपासून पोषण देतात. रितिका समद्दार यांच्या मते, दिलासादायक बाब अशी आहे की यासाठी आहारात कोणताही मोठा बदल करण्याची आवश्यकता नाही. हे सहा पोषक घटक संतुलित आणि बहुतांश प्रमाणात वनस्पती-आधारित आहारातून सहज उपलब्ध होतात, जो भारतीय स्वयंपाकघरांमध्ये आधीपासूनच मोठ्या प्रमाणात आढळतो. लोक ज्या तेजासाठी सौंदर्य उत्पादनांवर हजारो रुपये खर्च करतात, ते अनेकदा त्यांच्या ताटातच आधीपासूनच उपलब्ध असते.

# दिवसा आठ तास वीजपुरवठ्याच्या मागणीसाठी शेतकऱ्यांचे ठिय्या आंदोलन

■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहुरी :** राहुरी तालुक्यातील देवळाली प्रवरा महावितरण कार्यालयात शेतकऱ्यांनी ठिय्या आंदोलन करत दिवसा सलग आठ तास वीज पुरवठ्याची मागणी लावून धरली. रात्रीच्या वेळेत शेतीला पाणी देताना साप, बिबट्या आणि चोरट्यांची भीती असल्याने शेतकऱ्यांचे जीव धोक्यात येत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला.



जोपर्यंत आमचा प्रश्न मार्गी लागत नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नाही. असा आक्रमक पवित्रा शेतकऱ्यांनी घेतल्याने परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. देवळाली प्रवरा महावितरण कार्यालया समोर शेकडो शेतकरी एकत्र येत ठिय्या आंदोलनाला बसले. दिवसा किमान आठ तास नियमित वीज पुरवठा मिळावा, ही आंदोलकांची प्रमुख मागणी होती.

रात्रीच्या अंधारात शेतीला पाणी देण्यासाठी जावे लागत असल्याने साप, बिबट्या आणि चोरट्यांचा धोका वाढत असून शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, असे आंदोलकांनी सांगितले. महावितरण प्रशासनाने तातडीने दिवसा वीज पुरवठ्याचे नियोजन करावे, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही शेतकऱ्यांनी दिला.

सुमारे दोन तास सुरू असलेल्या आंदोलनानंतर महावितरण अधिकाऱ्यांनी मध्यस्थी करत शेतकऱ्यांशी चर्चा केली. त्यानंतर तात्पुरत्या स्वरूपात आंदोलन मागे घेण्यात आले. या आंदोलनात शेतकरी सेनेचे नेते रवींद्र मोरे, जिल्हाध्यक्ष राजेंद्र लोंढे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रकाश देठे यांच्यासह शेकडो शेतकरी सहभागी झाले होते.

# देवगावातील १५ वर्षांचा रस्त्याचा वाद अखेर मिटला

## सहायक पोलीस निरीक्षक सचिन कांडगे यांनी संयमाने सोडवला प्रश्न; शेतकऱ्यांनी मानले आभार

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पाटस :** प्रतिनिधी - निरगुडसर

देवगाव (ता. आंबेगाव) येथे गेल्या १४ ते १५ वर्षांपासून रस्त्याच्या वापरावरून सुरू असलेला वाद अखेर सामोपचाराने निकाली निघाला असून पारगाव पोलीस ठाण्याचे साहेब पोलीस निरीक्षक सचिन कांडगे यांच्या पुढाकाराने हा प्रश्न मार्गी लागल्याने शेतकरी व ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

देवगाव येथे रस्त्याच्या वादा संदर्भात अनेक वर्षांपासून महसूल विभागासह विविध शासकीय अधिकाऱ्यांनी भेटी देऊन तोडगा काढण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, कोणताही कायमस्वरूपी मार्ग निघत नव्हता. आठ दिवसांपूर्वी पुन्हा एकदा रस्त्याच्या कारणावरून दोन गटांमध्ये वाद निर्माण झाला. यानंतर संबंधित शेतकऱ्यांनी पारगाव कारखाना पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सचिन कांडगे यांच्याकडे तक्रार केली. तक्रारीची गंभीर दखल घेत श्री. कांडगे यांनी गावातील प्रमुख नागरिक व संबंधित शेतकऱ्यांची दोन वेळा पोलीस स्टेशनमध्ये बैठक घेतली. त्यानंतर प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन प्रत्येकाच्या शेताची पाहणी केली तसेच सर्व संबंधितांची बाजू शांतपणे ऐकून घेतली. यावेळी त्यांनी वस्तीवरील तीनही रस्त्यांबाबत कायदेशीर बाबी आणि प्रत्यक्ष वापराच्या दृष्टीने सविस्तर मार्गदर्शन केले. सर्व शेतकऱ्यांना समजेल अशा सोप्या भाषेत विषय स्पष्ट केल्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला रस्त्याचा प्रश्न सामोपचाराने मार्गी लागला. याशिवाय, भविष्यात संबंधित रस्त्याबाबत कोणतीही कायदेशीर अडचण निर्माण झाल्यास वरिष्ठ कार्यालयाकडे पाठपुरावा करून आवश्यक ती मदत करण्याचे आश्वासनही सचिन कांडगे यांनी दिले. या निर्णयामुळे संबंधित शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त करत श्री. कांडगे यांचे मनापासून आभार मानले. "अशा पद्धतीने दोन्ही बाजू समजून घेऊन संयमाने प्रश्न सोडवणारा पोलीस अधिकारी आम्ही आजपर्यंत पाहिला नाही," अशा शब्दांत ग्रामस्थांनी त्यांचे कौतुक केले. दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या वादावर संवाद, समन्वय आणि प्रत्यक्ष पाहणीच्या माध्यमातून तोडगा काढण्यात आल्याने देवगाव परिसरातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.



# आरोग्य समिती आढावा बैठकीत राष्ट्रवादीचे नगरसेवक इम्तियाज अत्तार यांच्या विविध सूचना

■ जनप्रवास तालुका प्रतिनिधी

**कोपरगाव :** आगामी पावसाळ्याच्या धर्तीवर आणि शहरातील आरोग्य व्यवस्था अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने सोमवार (दि.१५) रोजी पार पडलेल्या कोपरगाव नगरपरिषदेच्या सभागृहात आरोग्य समितीच्या आढावा बैठकीत आ.आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नगरसेवक इम्तियाज अत्तार यांनी विविध सूचना मांडल्या.

येत्या काही दिवसात पावसाळा सुरु होत असल्यामुळे शहरात डासांमुळे पसरणाऱ्या डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया यांसारख्या साथीच्या आजारांचा प्रादुर्भाव वाढण्याची दाट शक्यता आहे. यामुळे शहरातील सर्वच प्रभागांमधील कचरा वेळेवर उचलून प्रभाग स्वच्छ ठेवून शहरात नियमितपणे डास प्रतिबंधक औषध फवारणी तसेच धूर फवारणी करावी. शहरातील स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यानाचे उद्घाटन होवून बराच कालावधी उलटला आहे तरी हि हे उद्यान नागरिकांसाठी खुले करण्यात आलेले नाही.



तरी तातडीने हे उद्यान नागरिकांसाठी खुले करण्यात यावे. तसेच संपूर्ण शहरात अनेक जुनी झाडे असून उन्हाची दाहकता वाढत असल्याने लांबलेल्या पावसाची वाट न पाहता या झाडांना नियमित पाणी देण्याची सोय करणे अत्यंत गरजेचे आहे.

शहरातील सार्वजनिक शौचालयांची परिस्थिती अत्यंत बिकट झाली असून अनेक शौचालयांमध्ये पाणी नाही तर काही शौचालयांची दारे तुटलेल्या स्थितीत असल्याने नागरिकांची विशेष करून महिलांची गैरसोय होत आहे. यामुळे शहरातील सर्व शौचालयांची दुरुस्ती आणि पाण्याची सुविधा करून नियमित स्वच्छ करण्यासाठी विशेष यंत्रणा तयार करावी. जेणेकरून नागरिकांची गैरसोय होणार नाही. पालिका सत्ताधारी आणि प्रशासनाकडून नागरिकांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही.

यामुळे सुचवलेल्या आणि ठरलेल्या सर्व उपाययोजनांची तातडीने अंमलबजावणी सुरू करावी. अशा विविध प्रकारच्या नागरिकांच्या हिताच्या सूचना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नगरसेवक इम्तियाज अत्तार यांनी आरोग्य समितीच्या आढावा बैठकीत मांडल्या.

# देशाचा खरा विकासदर ७.७ नव्हे, तर केवळ २.७ टक्केच; सरकारी आकडेवारी खोटी : माजी अर्थमंत्री यशवंत सिन्हा

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** देशाची खरी आर्थिक आकडेवारी समोर आल्याशिवाय अर्थव्यवस्थेचे योग्य विश्लेषण आणि अचूक धोरणनिर्मिती करणे शक्य नाही. सद्यस्थितीत केंद्र सरकारकडून जनतेसमोर सादर केली जाणारी आकडेवारी दिशाभूल करणारी असून, देशाचा वास्तविक विकासदर ७.७ टक्के नसून केवळ २.७ टक्क्यांच्या आसपास आहे, असा खळबळजनक दावा भारताचे माजी अर्थमंत्री यशवंत सिन्हा यांनी केला आहे. पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने पत्रकार भवन, नवी पेठ, पुणे येथे आयोजित "आजची भारतीय अर्थव्यवस्था" या विषयावरील विशेष चर्चासत्रात मुख्य वक्ते म्हणून ते बोलत होते.

यावेळी प्रारंभी काँग्रेस शहराध्यक्ष (पश्चिम विभाग) दीप्ती चवधरी यांनी यशवंत सिन्हा यांचे स्मृतीचिन्ह देऊन स्वागत केले. त्यांनी आपल्या स्वागतपर भाषणात वाढत्या महागाईवर चिंता व्यक्त केली. आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाचे भाव वाढल्याने इंधन आणि गॅस महाग झाले असून गरीब व श्रीमंत यांच्यातील दरी रुंदावत आहे, असे त्या म्हणल्या.

या चर्चासत्राला महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण अध्यक्षस्थानी होते.

**चुकीच्या आकडेवारीमुळे देशाची जागतिक नाचक्की :**

आपल्या भाषणात यशवंत सिन्हा यांनी देशाच्या आर्थिक आकडेवारीच्या विश्वासार्हतेवर तीव्र चिंता व्यक्त केली. ते म्हणाले, "नोव्हेंबर २०२५ मध्ये जागतिक नाणेनिधीने भारताच्या आर्थिक आकडेवारी गोळा करण्याच्या पद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त करत भारताला 'सी' ग्रेड दिली आहे. ही देशासाठी अत्यंत लज्जास्पद बाब आहे. वास्तविक परिस्थिती आणि सरकारी आकडेवारीमध्ये तब्बल ४ ते ५ टक्क्यांची मोठी तफावत आहे. जर मूळ आकडेवारीच चुकीची असेल, तर देशाची धोरणे कधीही योग्य प्रकारे तयार होऊ शकत नाहीत आणि त्यांची अंमलबजावणीही कोलमडते. हे सरकार कामाऐवजी केवळ प्रसिद्धी आणि प्रचारावर चालत असून, जनतेला खरी माहिती मिळणार नाही याची काळजी घेत आहे."

## संक्षीप्त वृत्त


### ‘इसुझू मोटर्स इंडिया’च्या वतीने देशभरात ‘इसुझू आय-केअर प्री-मान्सून सर्व्हिस कॅम्प’च्या आयोजनाची घोषणा

■ जनप्रवास : प्रतिनिधी

**पुणे :** सर्वोत्तम सेवा तसेच मालकीचा अनुभव देण्याच्या इसुझू’च्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार करण्याच्या सातत्यपूर्ण प्रयत्नात, इसुझू मोटर्स इंडिया आपल्या इसुझू डी-मॅक्स पिक-अप्स आणि एसयूव्हीच्या श्रेणीसाठी देशव्यापी ‘इसुझू आय-केअर प्री-मान्सून कॅम्प’ आयोजित करणार आहे. या सेवा शिबिराचा उद्देश ग्राहकांना देशभरात सर्व मोसमात त्रास-मुक्त वाहन चालविण्याच्या अनुभवासाठी रोमांचक लाभ तसेच प्रतिबंधात्मक देखभाल तपासणी उपलब्ध करून देणे हा आहे. ‘इसुझू केअर’च्या पुढाकाराने, दिनांक १८ ते २४ जून २०२६ (दोन्ही दिवस समाविष्ट) दरम्यान सर्व इसूझू अधिकृत विक्रेता सेवा केंद्रांवर मान्सूनपूर्व शिबिराचे आयोजन केले जाईल. या कालावधीत, ग्राहक त्यांच्या वाहनांसाठी विशेष ऑफर आणि लाभ देखील मिळवू शकतात.

शिबिराला भेट देणाऱ्या ग्राहकांना अनेक आकर्षक लाभांचा लाभ घेता येणार आहे. यामध्ये मोफत ३७-पॉइंट सर्वसमावेशक वाहन तपासणी, मजुरीवर १०% सवलत, सुट्ट्या भागांवर ५% सवलत तसेच ल्यूब्रिकंट्स आणि फ्लुइड्सवर ५% सवलत यांचा समावेश आहे. याशिवाय, रिटेल रोडसाइड असिस्टन्स (आरएसए) वर २०% सवलत, प्रोकेअरवर ५% सवलत आणि विस्तारित वॉरंटीवर २०% सवलत देण्यात येणार आहे. सर्व ऑफर्सवर नियम व अटी लागू असून त्या केवळ बीएस६ वाहनांसाठी वैध आहेत. प्रोकेअरवरील सवलत फक्त बीएस६ एस-कॅब, एस-कॅब झेड आणि डी-मॅक्स रेग्युलर कॅब मॉडेल्ससाठी लागू आहे. विस्तारित वॉरंटीवरील सवलत १ ऑक्टोबर २०२५ नंतर खरेदी करण्यात आलेल्या बीएस६ एस-कॅब, एस-कॅब झेड आणि डी-मॅक्स रेग्युलर कॅब मॉडेल्ससाठीच उपलब्ध असून ही ऑफर २४ जून २०२६ पर्यंत वैध राहील.

### छाया शिंदे यांचे निधन



■ जनप्रवास : प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** शहरातील कल्याण महामार्गावरील शिवाजीनगर परिसरातील रहिवासी व जिल्हा रुग्णालयातील वरिष्ठ परिचारिका छाया कैलास शिंदे (वय ४३) त्यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यामागे पती, सासू, मुली कादंबरी व काव्यांजली असा परिवार आहे. जिल्हा शासकीय रूग्णालयातील न्याय वैद्यकीय प्रकरण (एमएलसी) विभाग प्रमुख कैलास काशिनाथ शिंदे यांच्या त्या पत्नी होत.

### अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण जातीय जनगणनेनंतरच करावे : उपमहापौर परशुराम वाडेकर

■ जनप्रवास : प्रतिनिधी

**पुणे :** अनुसूचित जातींमध्ये उपवर्गीकरण करणे हे समाजात अंतर्गत फूट निर्माण करणारे ठरू शकते. त्यामुळे पक्षाचा त्याला प्राथमिक विरोध आहे. मात्र, उपवर्गीकरण करायचेच असल्यास ते लोकसंख्येच्या अचूक प्रमाणावर आधारित असावे आणि राष्ट्रीय जातीय जनगणना पूर्ण झाल्यानंतरच त्याची अंमलबजावणी करावी, अशी मागणी पुण्याचे उपमहापौर तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)चे नेते परशुराम वाडेकर यांनी पत्रकार परिषदेत केली. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या मार्गदर्शनानुसार ही भूमिका मांडण्यात आली. यावेळी पुणे शहराध्यक्ष संजय सोनवणे, प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, नगरसेवक निलेश अल्हाट, महिपाल वाघमारे, श्याम सदाफुले, बसवराज गायकवाड, गोविंद साठे आदी उपस्थित होते. वाडेकर म्हणाले की, अनुसूचित जातींतील विविध घटक सामाजिक हक्कांसाठी अनेक वर्षांपासून एकत्रितपणे संघर्ष करत आहेत. अशा परिस्थितीत घाईघाईने घेतलेल्या निर्णयामुळे समाजातील ऐक्याला तडा जाण्याची शक्यता आहे. जनगणनेतून प्रत्येक जातीची अचूक लोकसंख्या समोर आल्यानंतरच कोणतेही धोरणात्मक निर्णय घेतल्यास सर्व घटकांना न्याय मिळू शकेल.

राज्यातील उर्वरित ५८ अनुसूचित समाजघटकांनाही शिक्षण व नोकरीच्या क्षेत्रात समान संधी मिळाव्यात, अशी पक्षाची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच २०२७ च्या जनगणनेनंतर लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षणाचा पुनर्विचार करण्याची मागणीही त्यांनी केली. शहराध्यक्ष संजय सोनवणे यांनी काही व्यक्तींनी रामदास आठवले यांच्या वक्तव्याचा संदर्भविरहित विपर्यास करून समाजमाध्यमांवर प्रसारित केल्याचा आरोप केला. त्यामुळे अनुसूचित समाजघटकांमध्ये अविश्वास आणि संघर्ष निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याची टीका त्यांनी केली. जबाबदार लोकप्रतिनिधींनी तथ्यांचा विपर्यास करून समाजाची दिशाभूल करणे खेदजनक असल्याचेही ते म्हणाले. प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव यांनी सांगितले की, अनुसूचित जातींमध्ये एकूण ५९ जाती असून उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावर दोन समाजांमध्ये तणावाचे वातावरण निर्माण होत आहे. हा तणाव कमी करण्यासाठी रिपब्लिकन पक्षाच्या वतीने राज्यभर ‘सलोखा परिषदांचे’ आयोजन करण्यात येणार आहे.

### महिलांच्या कायदेनिर्मितीतील योगदानाचा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचला पाहिजे : डॉ. नीलम गोऱ्हे

■ जनप्रवास : प्रतिनिधी

**पुणे :** महिलांच्या सक्षमीकरणासाठी अनेक कायद्यांमध्ये बदल झाले असले, तरी त्यांची प्रभावी अंमलबजावणी आणि महिलांपर्यंत कायद्यांची माहिती पोहोचविणे ही आजची मोठी गरज आहे. तसेच महिलांच्या कायदेनिर्मितीतील आणि समाजपरिवर्तनातील योगदानाचा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचला पाहिजे, असे प्रतिपादन शिवसेना नेत्या व मा. विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केले.

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांच्या वतीने आयोजित शं. ना. जोशी पुरस्कार ‘कायदा निर्मितीमध्ये महिलांचे योगदान’ या पुस्तकाच्या लेखिका विद्या देवधर यांना सोमवारी प्रदान करण्यात आला. डॉ. गोऱ्हे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण, प्रमुख कार्यवाह डॉ. स्वाती महाळंक, स्थानिक कार्यवाह सुनेत्रा मंकणी, अॅड. प्रार्थना सदावर्ते, लेखिका मंगला गोडबोले, अंजली कुलकर्णी यांच्यासह साहित्य, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर यांच्या नेतृत्वाखाली अल्पवयीन मुलीचा आठ दिवसांत शोध

## ‘ऑपरेशन मुस्कान’ अंतर्गत बेलवंडी पोलिसांची यशस्वी कारवाई; परभणी येथून मुलीला ताब्यात घेऊन पालकांच्या स्वाधीन

■ जनप्रवास प्रतिनिधी

**श्रीगोंदा :** बेलवंडी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी ‘ऑपरेशन मुस्कान’ अभियानांतर्गत उल्लेखनीय कामगिरी करत सुरेगाव येथील बेपत्ता झालेल्या अल्पवयीन मुलीचा अवघ्या आठ दिवसांत शोध लावला. परभणी येथून मुलीला सुखरूप ताब्यात घेऊन आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर तिच्या पालकांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, श्रीगोंदा तालुक्यातील सुरेगाव येथील एक अल्पवयीन मुलगी ४ जून २०२६ रोजी सकाळी सुमारे ११ वाजता घरातून कोणालाही न सांगता निघून गेली होती. कुटुंबीयांनी परिसरात शोध घेऊनही तिचा ठावठिकाणा न लागल्याने बेलवंडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार गुन्हा रजिस्टर क्रमांक २१५/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम १३७(२) अंतर्गत अपहरणाचा गुन्हा ६ जून रोजी दाखल करण्यात आला.

प्रकरणाची गंभीरता लक्षात घेऊन सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर यांनी तपास पथकाला आवश्यक सूचना देत शोधमोहीम अधिक प्रभावीपणे राबविण्याचे नियोजन केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तांत्रिक माहिती, मोबाईल लोकेशनचे विश्लेषण तसेच गोपनीय बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे विविध ठिकाणी तपासाची व्याप्ती वाढविली.

‘ऑपरेशन मुस्कान’ मोहिमेअंतर्गत सुरू असलेल्या या शोधकार्यात अखेर १४ जून रोजी यश मिळाले. पोलिसांनी संबंधित अल्पवयीन मुलीचा परभणी येथे शोध घेत तिला सुखरूप ताब्यात घेतले. त्यानंतर सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून मुलीला तिच्या पालकांच्या स्वाधीन करण्यात आले. अल्पवयीन मुलीचा कमी कालावधीत शोध लागल्याने कुटुंबीयांनी समाधान व्यक्त केले असून बेलवंडी पोलिसांच्या तत्परतेचे कौतुक केले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येत असल्याची माहिती पोलिसांनी दिली. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक मोहन गाजरे, पोलीस हवालदार रवींद्र औटी, महिला पोलीस हवालदार अविंदा जाधव, पोलीस नाईक यश ठोंबरे आणि पोलीस कॉन्स्टेबल मच्छिंद्र बर्डे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

## रामपुरवाडीत विविध उपक्रमांनी मंत्री राधाकृष्ण विखे यांचा वाढदिवस साजरा




पुणतांबा – मंत्री राधाकृष्ण विखे यांच्या वाढदिवसानिमित्त रामपुरवाडी येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्याची वाटप करण्यात आले. (छाया –श्रीरंग गोऱ्हे)

■ जनप्रवास वार्ताहर

**पुणतांबा :** राहता तालुक्यातील रामपूर वाडी येथे राज्याचे जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त ज्ञानामृत माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांना शालेय वस्तूची वाटप करून विविध उपक्रमांनी वाढदिवस साजरा करण्यात आला,

जनसेवा मंडळाच्या वतीने वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले यावेळी जनसेवा मंडळाचे लक्ष्मण भुसाळ माजी, सरपंच शिवाजीराव जगताप, माजी उपसरपंच रवी सांबारे, रमेश सांबारे, पांडुरंग वडणे, माधव वडणे, संजय घोडेकर, गणेश आग्रे, राजेंद्र जाधव, वाल्मिक जगताप, बबनराव बाबरे,योगेश सांबारे तंटामुक्ती अध्यक्ष प्रकाश शेळके,माजी उपसरपंच अरुण बोंबले, बाबुराव तरकसे ज्ञानदेव सांबारे,शिवाजी सांबारे, दौलत शिंदे योगेश सांबारे, सुरेखा जगताप मुख्याध्यापक शिक्षक वृंद विद्यार्थी तसेच ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

## गोदामाईच्या वतीने विविध उपक्रमांनी मंत्री विखे यांचा वाढदिवस साजरा



■ जनप्रवास वार्ताहार

**पुणतांबा :** गोदामाई प्रतिष्ठान, जनसेवा मंडळ, , भाजपा व किसान सेल यांच्या माध्यमातुन जलसंपदा व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांचा वाढदिवस कृतिशील उपक्रमातुन साजरा करण्यात आला.

वयोवृद्ध, माताभगिनी व विद्यार्थी या सर्वांना सुदृढ आरोग्याकरीता फळांच्या वाटपाबरोबरच विद्यार्थ्यांना शिक्षणाकरता आवश्यक शालेय साहित्याचे वाटप ग्रामीण रुग्णालय तसेच योगिराज चांगदेव महाराज विद्यालय, जि.प.शाळा, पुणतांबा व चांगदेवनगर १८वाडी येथे करण्यात आले.

या प्रसंगी ज्येष्ठ नेते भागवतराव धनवटे, अजिज ईनामदार, गोदामाई प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय धनवटे, भाजपा किसान सेलचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब भोरकडे, शिवस्मारक समितीचे दत्ता धनवटे, जगदीश वहाडणे, जनसेवा मंडळाचे, रमेश सांगळे, माजी उपसरपंच संगिता भोरकडे, विशाल चव्हाण, सुभाष सांगळे, संदीप धनवटे, वसंत धनवटे, जेजुरकर, अविनाश शिंदे, जालिंदर इंगळे, प्रविण सांबारे, संतोष जोगदंड, पप्पु पगारे, संदेश धनवटे, चंदु पगारे, चांगदेव शुगर मिलचे व्यवस्थापक बी एस पाटील सुधाकर जाधव, शिवाजी वाघमारे, जगन्नाथ खोसे, शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक तसेच ग्रामीण रुग्णालयाच्या डॉ. शेलार, डॉ.बांगर सर उपस्थित होते.

## लिट्ल एंजल्स स्कूलमध्ये विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत




■ जनप्रवास वार्ताहार

**पुणतांबा :** नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभानिमित्त लिट्ल एंजल्स स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण स्वागत करत प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात व आनंदमय वातावरणात करण्यात आले,

आकर्षक सजावट, स्वागत कमान, रांगोळी, फुलांची सजावट आणि विद्यार्थ्यांच्या आनंदी सहभागामुळे संपूर्ण विद्यालय परिसर चैतन्यमय झाला होता. कार्यक्रमाची सुरुवात ज्ञानदेवता माता सरस्वती यांच्या पूजनाने व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी सरस्वतीमातेच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून नवीन शैक्षणिक वर्ष विद्यार्थ्यांसाठी ज्ञान, संस्कार, प्रगती आणि यश घेऊन येवो, अशी प्रार्थना केली.

विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. धनंजय धनवटे यांच्या संकल्पनेतून विद्यालयास ६८ औषधी वनस्पती भेट देण्यात आल्या.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष दीपक धनवटे, उपाध्यक्ष दीपक नाईक, विश्वस्त डॉ. धनश्री धनवटे, मनोज धनवटे, राहुल धनवटे, संचालिका वैजयंती धनवटे, शैलेश धनवटे, श्याम माळी, अनिल नळे, भूषण वाघ, राजेंद्र थोरात उपस्थित होते

यावेळी. डॉ. धनवटे यांनी विद्यार्थ्यांनी गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच संस्कार, शिस्त, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक बांधिलकी यांचे महत्त्व समजून घेऊन सर्वांगीण विकास साधावा, असे प्रतिपादन केले.

तसेच नवीन शैक्षणिक वर्ष विद्यार्थ्यांसाठी ज्ञान, प्रगती आणि यशाचे नवे क्षितिज घेऊन यावो अशी शुभेच्छा दिल्या. उपमुख्याध्यापक श्री. सुरेश पटारे यांनी कार्यक्रमाचे प्रास्तावक केले

## अहिल्यानगर शहरात जमीन व्यवहारात डॉक्टरची १४ कोटींची फसवणूक

■ जनप्रवास : प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** जमीन खरेदी-विक्रीच्या व्यवहारात सावेडी येथील डॉक्टरची तब्बल १४ कोटी ६६ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी मुख्य संशयित आरोपीला येथील आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक केली. अमोल बबन जाधव (वय ४०, रा. मोरगव्हाण, ता. नेवासा) असे त्याचे नाव आहे. त्याला सोमवारी (१५ जून) येथील प्रथम वर्ग न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने पाच दिवसांची (२० जूनपर्यंत) पोलीस कोठडी सुनावली आहे.

**डॉक्टरची फसवणूक**

डॉ. अनिल सूर्यभान आठरे (वय ७३, रा. झोपडी कॅन्टीन, सावेडी) असे फसवणूक झालेल्या डॉक्टरचे नाव आहे. त्यांनी ८ नोव्हेंबर २०२५ रोजी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून ३० जणांच्या टोळीविरोधात कटकारस्थान रचून फसवणूक केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदरचा गुन्हा तपासकामी आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला आहे.

**एमआयडीसीतून अटक :** या गुन्ह्यातील मुख्य संशयित अमोल जाधव हा गुन्हा दाखल झाल्यापासून पसार होता. तो एमआयडीसी परिसरात असल्याची माहिती आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांच्या पथकाने जाधव याला एमआयडीसी परिसरातून ताब्यात घेतले. त्याला अटक करण्यात आली असून त्याच्याकडे चौकशी सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

**बनावट कागदपत्रांचा वापर**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुख्य संशयित आरोपी भाजपाचा माजी नगरसेवक स्वप्नील रोहीदास शिंदे, अमोल जाधव आणि त्यांच्या इतर साथीदारांनी संगनमत करून कट रचला. संशयित आरोपींनी डॉ. आठरे यांच्या जमीन खरेदी-विक्रीच्या वेगवेगळ्या व्यवहारांमध्ये सुरुवातीला त्यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर आरोपींनी बनावट कागदपत्रे, बनावट मिळकती दाखवल्या.

इतकेच नाही, तर बनावट मालक उभे करून, त्यांच्या बनावट सह्या करून डॉ. आठरे यांना दस्त हस्तांतरित केले. या खोट्या कागदपत्रांच्या आधारे आरोपींनी डॉ. आठरे यांच्याकडून वेळोवेळी पैसे उकळले. त्यांची एकूण १४ कोटी ६६ लाख ५१ हजार रुपयांची फसवणूक केल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे.

## नगर-कल्याण रोडवर लक्ष्या काळेचा खून; शहरात खळबळ



■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** नगर-कल्याण रोडवरील जाधव मळा उड्डाणपुलाजवळ आज झालेल्या खुनाने संपूर्ण शहर हादरले आहे. लक्ष्मण उर्फ लक्ष्या मार्तंड काळे (वय ३०) याचा अज्ञात हल्लेखोरांनी निर्घृण खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.

घटनेची माहिती मिळताच कोतवाली पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिसर सील केला. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या लक्ष्या काळेचा मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. नगर शहरात पुन्हा एकदा गुन्हेगारांनी डोके वर काढल्याचे चित्र समोर आले असून, भरदिवसा झालेल्या या खुनामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. खुनामागील कारण आणि आरोपींचा शोध घेण्यासाठी कोतवाली पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत.

# रयतसेवेसाठी हक्काचा आमदार म्हणून प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्नशील : आ. विवेक कोल्हे

■ जनप्रवास वार्ताहार

**पुणतांबा :** शिक्षण क्षेत्रात वाढत्या बदलाच्या पार्श्वभूमीवर कर्मवीर भाऊराव पाटील यांनी घालून दिलेल्या मूल्यांवर आधारित रयत शिक्षण संस्था समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शिक्षणाची ज्ञानगंगा पोहोचविण्याचे कार्य करत आहे. एस एस जी एम महाविद्यालयाशी माझा आगळा वेगळा ऋणानुबंध आहे.प्रत्येक क्षेत्रातील व्यक्ती हा शिक्षकांचा विद्यार्थी असतो त्यामुळे जनसेवेचे सामाजिक कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांचा आमदार झाल्यानंतर होणारा हा सन्मान माझ्यासाठी विशेष असल्याचे प्रतिपादन आमदार विवेक कोल्हे यांनी केले. रयत शिक्षण संस्थेच्या श्री सद्गुरू गंगागीर महाराज सायन्स, गौतम आर्ट्स अँड संजीवनी कॉमर्स कॉलेज, आ. कोल्हे यांचा सत्कार आयोजित करण्यात आला होता.

रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य संदीप वर्पे, सदस्य सुरेश बोळीज, माजी जिल्हा परिषद सदस्य महेंद्र काले, अश्वमेधचे प्रमुख ज्ञानेश्वर वाकचौरे, शुक्राचार्य महाराज मंदिर ट्रस्ट अध्यक्ष बाळासाहेब आव्हाड, प्राचार्य डॉ.माधव सरोदे उपस्थित होते.



आ. कोल्हे म्हणाले कोणत्याही क्षेत्रात कार्यरत असलेली व्यक्ती ही शिक्षकांचीच विद्यार्थिनी किंवा विद्यार्थी असते. त्यामुळे शिक्षकांच्या हस्ते होणारा सन्मान हा माझ्यासाठी विशेष अभिमानाचा क्षण आहे. एस.एस.जी.एम. कॉलेजशी माझे जुने ऋणानुबंध असून रयत शिक्षण संस्थेतील माझ्या प्रवासाची सुरुवात याच महाविद्यालयातून झाली असल्याचे त्यांनी सांगितले.रयत शिक्षण संस्थेचे मार्गदर्शक शरद पवार यांची अलीकडेच भेट घेतल्याचा उल्लेख करताना त्यांनी संस्थेविषयी असलेली त्यांची तळमळ अधोरेखित केली. स्व शंकरराव कोल्हे व स्व शंकरराव काळे यांनी संस्थेच्या विकासाला सर्वोच्च प्राधान्य दिल्याचेही त्यांनी नमूद केले. शिक्षकांच्या समोर बदलत्या युगात अनेक आव्हाने आणि संधी आहेत त्या दृष्टीने काम करण्याची आवश्यकता आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मार्गदर्शन लाभत असल्याने त्यांच्या सहकार्याने रयत शिक्षण संस्थेच्या कोणत्याही शाखेसमोरील प्रश्न सोडविण्यासाठी एक रयत सेवक म्हणून मी सदैव कटिबद्ध राहणार आहे, असे आमदार कोल्हे यांनी सांगितले,

अॅड. संदीप वर्पे यांनी एक हक्काचा आमदार आपल्याला लाभला आहे.सामाजिक प्रश्न सोडवण्यासाठी महत्वाचे नेतृत्व म्हणून आ. कोल्हे यांची मदत होणार आहे.स्व कोल्हे, तसेच संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे यांचा माझ्या राजकीय जडणघडणीत मोठा वाटा आहे. शरदचंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेत राजकीय जोडे बाजूला ठेवत काम करण्याची सूचना आहे.

# रुग्णांना अधिक चांगल्या व दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करुन द्या : आमदार आशुतोष काळे

## कोपरगाव उपजिल्हा रुग्णालयाचे काम लवकरच पूर्ण होणार : आमदार आशुतोष काळे

■ जनप्रवास तालुका प्रतिनिधी

**कोपरगाव :** कोपरगाव सनियंत्र सल्लागार समितीची बैठक नुकतीच आमदार आशुतोष काळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.या बैठकीत रुग्णालयातील आरोग्य सेवा, उपलब्ध सुविधा तसेच रुग्णांना मिळणाऱ्या उपचारांच्या गुणवत्तेबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला.यावेळी आमदार आशुतोष काळे यांनी रुग्णालय प्रशासनाला रुग्णांना अधिक चांगल्या व दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिल्या.

रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत, आवश्यक औषधे व वैद्यकीय सुविधा उपलब्ध असाव्यात तसेच रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश त्यांनी दिले.तसेच रुग्णालयातील स्वच्छता, वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती, रुग्णसेवेचा दर्जा उंचावण्यासाठी आवश्यक उपाय योजना तातडीने राबविण्याच्या सूचना केल्या.

सर्वसामान्य नागरिकांना शासकीय आरोग्य सेवांचा अधिकाधिक लाभ मिळावा यासाठी प्रशासनाने संवेदनशीलतेने काम करण्याचे आवाहन त्यांनी केले.



यावेळी आमदार आशुतोष काळे यांनी रुग्णालय सनियंत्र सल्लागार समितीच्या सदस्यांसमवेत २८.८४ कोटी निधीतून सुरु असलेल्या १०० बेडच्या उपजिल्हा रुग्णालयाच्या कामाची पाहणी करून कामकाजाचा आढावा घेतला. उपजिल्हा रुग्णालयाच्या कामासाठी अधिकच्या निधीची गरज पडल्यास निधी मिळवून देणार असल्याचे सांगत लवकरच हे काम पूर्ण होऊन सुसज्ज उपजिल्हा रुग्णालय रुग्णांच्या सेवेत दाखल होईल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी तहसीलदार महेश सावंत, गट विकास अधिकारी संदीप दळवी, आरोग्य अधिकारी डॉ. गिरीश गुट्टे, डॉ.कृष्णा फुलसुंदर, डॉ.उंबरकर, रुग्ण कल्याण समितीचे सदस्य डॉ.अजय गर्जे, सार्वजनिक बांधकाम उपभियांता वर्षराज शिंदे, पशु संवर्धन अधिकारी श्रीमती काटे, नगरसेवक इम्तियाज अत्तार, सौ. कविता नाईकवाडे, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे संचालक सुधाकर रोहोम, जिनिंग व प्रेसिंग सोसायटीचे चेअरमन गोरक्षनाथ जामदार, डॉ. आतिश काळे, डॉ. तुषार गलांडे, नगरसेवक मंदार पहाडे, राजेंद्र वाकचौरे, हाजीमेहमूद सय्यद, विजय त्रिभुवन, वाल्मिक लहिरे, शैलेश साबळे, सोमेश आढाव, बाळासाहेब रुईकर, माजी नगरसेवक विरेन बोरावके, रमेश गवळी, बाळासाहेब आढाव, अजीज शेख, फकीर कुरेशी, दिनकर खरे, सचिन ठोळे, नवाज कुरेशी, शुभम काळे, मनोज नरोडे, धनंजय कहार, सागर फडे, मुकुंद भूतडा, नितेश बोरुडे, सागर आहेर, संतोष मरसाळे, अशोक आव्हाटे, सचिन परदेशी, मुकुंद इंगळे, जावेद शेख, भाऊसाहेब भाबड, चंद्रकांत धोत्रे, राजेंद्र आभाळे, राजेंद्र खैरनार, संतोष दळवी, विकी चांदर, तन्मय साबळे, वैभव कानडे, हारुन शेख, फैय्याज, मयुरेश शिंदे, मयुर राऊत, बाबासाहेब शिंदे आदी उपस्थित होते.

## दर्जेदार शिक्षणामुळे जिल्हा परिषद शाळेकडे पालकांचा ओढा : रामदास फुले

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** नगर तालुक्यातील नेप्ती येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी नवागत विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. शाळेत पहिल्यांदाच प्रवेश घेणाऱ्या चिमुकल्यांचे पहिले पाऊल ,औक्षण करून, गुलाबपुष्प देत आणि टाळ्यांच्या गजरात स्वागत करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांमध्ये पाठ्यपुस्तके, शालेय गणवेश तसेच खाऊचे वाटप करण्यात आले.

शाळेचा परिसर आकर्षक सजावटीने नटला होता. नवागत



विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि पालकांच्या डोळ्यांतील समाधानामुळे संपूर्ण वातावरण आनंदमय झाले होते. शिक्षणाच्या प्रवासाला सुरुवात करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा दिवस संस्मरणीय ठरला. यावेळी तालुका कृषी अधिकारी उस्मान शेख मुख्याध्यापिका आशा ढोले ,बाळासाहेब कापसे, बाळू नवले, सविता गोरे ,नूतन पाटोळे, माजी सरपंच दिलीप होळकर, उपसरपंच एकनाथ जपकर सामाजिक कार्यकर्ते रामदास फुले, अमोल चौगुले, हनुमंत साळवे, माजी चेअरमन विलास जपकर, नितीन कदम, मारुती चौगुले यांच्यासह ग्रामस्थ, पालक व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शोरूममध्ये महिला कर्मचाऱ्यावर हल्ला; कपडे फाडून विनयभंग केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** केडगाव औद्योगिक परिसरातील वासन टोयोटा शोरूममध्ये कार्यरत असलेल्या महिला एचआर मॅनेजरवर शोरूममध्ये घुसून शिवीगाळ, मारहाण तसेच कपडे फाडून विनयभंग केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, प्राची उदयकुमार जामगावकर (सासरचे नाव प्राची हेमंत देवळालीकर, वय ३७) या केडगाव औद्योगिक क्षेत्रातील वासन टोयोटा शोरूममध्ये मागील सहा वर्षांपासून एचआर मॅनेजर म्हणून कार्यरत आहेत. सन २०२४ मध्ये शोरूममध्ये कार्यरत असलेल्या वर्षा अभय चुतर यांना कामातील त्रुटींमुळे सेवेतून कमी करण्यात आले होते. त्यानंतर त्या वारंवार प्राची जामगावकर व शोरूम व्यवस्थापनाविरोधात शिवीगाळ करत असल्याची तक्रार यापूर्वीही देण्यात आली होती.

फिर्यादीनुसार, दि. १५ जून २०२६ रोजी दुपारी सुमारे ४ वाजण्याच्या सुमारास वर्षा चुतर या वासन टोयोटा शोरूममध्ये आल्या. त्यांनी प्राची जामगावकर यांना अश्लील व अपमानास्पद शब्दांत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. यावेळी त्यांनी शोरूममधील कर्मचाऱ्यांसमोर बदनामीकारक वक्तव्ये केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

घटनेची माहिती मिळताच प्राची यांनी आपल्या पती उदयकुमार देवळालीकर यांना शोरूममध्ये बोलावून घेतले. त्यांनी जाब विचारल्यानंतर आरोपी महिलेने त्यांचे कपडे फाडून शिवीगाळ केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.


तसेच मध्यस्थी करण्यासाठी गेलेल्या प्राची यांनाही हाताने मारहाण करण्यात आली. त्यानंतर आरोपीने त्यांचा परिधान केलेला टॉप फाडून सार्वजनिक ठिकाणी त्यांचा विनयभंग केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

## कोळेवाडीत आईसह दीड वर्षाच्या चिमुकल्याचा मृत्यू; राहुरी तालुक्यात हळहळ

■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहुरी :** राहुरी तालुक्यातील कोळेवाडी येथे हृदय पिळवणारी घटना समोर आली. एका ३१ वर्षीय विवाहितेने आपल्या दिड वर्षाच्या मुलाला फासावर लटकवून नंतर स्वतः फाशी घेतल्याची दुदैवी घटना दि. १६ जून रोजी सकाळी उघडकीस आली.

आशा सुर्यभान आंबेकर, वय ३१ वर्षे व शिवांश सुर्यभान आंबेडकर, वय दिड वर्षे, रा. चोपडे वस्ती, कोळेवाडी, ता. राहुरी, असे मृतांची नावे आहेत. या घटने बाबत मिळालेली माहिती अशी कि, आशा सुर्यभान आंबेकर यांचा सुमारे तीन वर्षापूर्वी विवाह झाला होता. घरगुती कारणाच्या वादातून आशा आंबेकर या गेल्या एक वर्षांपासून माहेरी संगमनेर येथे राहत होत्या. चार पाच दिवसापूर्वीच त्या सासरी कोळेवाडी येथे आल्या. दि. १५ जून रोजी रात्री आशा आंबेकर ह्या आपल्या दिड वर्षाच्या मुलासह दाराला आतून कडी लावून झोपल्या होत्या. मध्यरात्रीच्या सुमारास आशा आंबेकर यांनी आपल्या राहत्या घरात अगोदर त्यांच्या दिड वर्षाच्या मुलाला दोरीच्या सहाय्याने फाशी दिली. त्यानंतर स्वतः फाशी घेऊन आपली जीवन यात्रा संपवली. सुर्यभान आंबेकर हे दि. १६ जून २०२६



मयत- आशा आंबेकर.



मयत- शिवांश आंबेकर

रोजी सकाळी झोपेतून उठले. तेव्हा त्यांनी घराच्या खिडकीतून आत डोकावले असता त्यांची पत्नी व दिड वर्षाचा चिमूकला मुलगा फासावर लटकल्याचे त्यांना दिसले. घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख, पोलिस कॉन्स्टेबल रामनाथ सानप यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. आणि स्थानिक तरुणांच्या मदतीने घराचा दरवाजा तोडून मृतदेह फासावरून खाली उतरवले. रुग्णवाहिका चालक रविंद्र देवगीरे यांनी आई व मुलाचा मृतदेह राहुरी येथील ग्रामीण रुग्णालयात नेला. शवविच्छेदन केल्या नंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले.

आशा आंबेकर यांनी पोटच्या मुलाला फाशी देऊन स्वतः फाशी का घेतली? याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. मात्र हृदय पिळवणाऱ्या या घटनेमुळे संपूर्ण तालुक्यात हळहळ व्यक्त केली जात आहे. या घटने बाबत राहुरी पोलीस ठाण्यात सध्या आकस्मात गुन्ह्याची नोंद करण्यात आली. पुढिल तपास पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनात सुरु आहे.

## नामदार विखे साहेबांचा वाढदिवस शैक्षणिक साहित्याचे वाटप करून साजरा

■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहाता :** ना.डॉ. राधाकृष्ण विखे पाटील साहेब जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री अहिल्यानगर यांचा ६७ वा वाढदिवस हा शैक्षणिक साहित्याचे वाटप करून साजरा करण्यात आला . जिल्हा परिषद प्राथमिक शाळा राहाता मुले या शाळेत सुरुवातीला नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले . त्यानंतर सौ . अर्चनाताई भीमराज निकाळे नगरसेविका राहाता नगरपरिषद राहाता आणि निकाळे परिवारातर्फे शालेय विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक उपयोगी साहित्याचे वाटप राहाता पंचायत समितीचे बी .डी.ओ . विवेक गुंड साहेब, सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र निकाळे सर, नगरसेविका अर्चनाताई भीमराज निकाळे,



माजी नगरसेवक भिमराज निकाळे यांच्या शुभहस्ते विविध शैक्षणिक उपयोगी साहित्य व शासकीय योजनेचे मोफत पाठ्यपुस्तके व गणवेश वाटप करण्यात आले . यावेळी सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र निकाळे सर यांनी मनोगत व्यक्त केले . या उपक्रमासाठी राहाता शहरातील प्रमुख ग्रामस्थ रावसाहेब निकाळे, आबा निकाळे, विलास पाळंदे, विरेश सोनवणे, सुधाकर निकाळे, अरविंद पाळंदे, राहुल बनसोडे, हर्षल तोरणे, कृष्णा गाडेकर, अंकुश निकाळे, दिपक गाडेकर, शुभम गाडेकर, तन्वीर तांबोळी मोठ्या संख्येने पालक वर्ग व शिक्षक-शिक्षिका उपस्थित होते . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दर्शने सर यांनी केले तर आभार प्रदर्शन राहुल पुरी सर यांनी केले .

## अण्णा हजारे यांच्या हस्ते अवयवदान जनजागृती पुस्तिकेचे प्रकाशन

### समाजातील गैरसमज दूर करण्यासाठी फिनिक्स फाऊंडेशनची जनजागृती मोहीम

**नागरिकांनी अवयवदानबाबत सकारात्मक दृष्टिकोन स्वीकारून या चळवळीत सहभागी व्हावे : अण्णा हजारे**

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** समाजामध्ये अवयवदान, नेत्रदान आणि देहदानाबाबत जागरूकता निर्माण करून त्यासंदर्भातील गैरसमज दूर करण्याच्या उद्देशाने फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने अवयवदान जनजागृतीवर आधारित माहितीपूर्ण पुस्तिका तयार करण्यात आली आहे. या पुस्तिकेचे प्रकाशन ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या हस्ते राळेगणसिद्धी येथे संपन्न झाले. या उपक्रमामुळे समाजात अवयवदानाविषयी सकारात्मक विचार निर्माण होण्यास आणि अधिकाधिक नागरिक या चळवळीत सहभागी होण्यास प्रोत्साहन मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी



राळेगणसिद्धी येथे जाऊन अण्णा हजारे यांची भेट घेतली.

यावेळी फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे, तुलसीराम पालीवाल, संजय सांवत, माजी सैनिक रामसिंग रायजी, नाना पठारे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## धारदार कोयता बाळगणाऱ्यावर भिंगार कॅम्प पोलिसांची कारवाई

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** भिंगार शहरातील गौतम बुद्ध जॉगिंग पार्क परिसरात धारदार कोयता घेऊन संशयास्पदरीत्या फिरणाऱ्या एका युवकाविरुद्ध भिंगार कॅम्प पोलिसांनी कारवाई करत त्याला ताब्यात घेतले. ही कारवाई १४ मे २०२६ रोजी करण्यात आली.

भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली होती की, गौतम बुद्ध




जॉगिंग पार्कजवळ एक इसम हातात धारदार कोयता घेऊन फिरत आहे. माहितीची खात्री पटताच त्यांनी तातडीने तपास पथकाला संबंधित ठिकाणी जाऊन कारवाई करण्याचे आदेश दिले.

पोलीस पथकाने घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता, पार्कजवळील एका लिंबाच्या झाडाखाली एक युवक हातात धारदार कोयता घेऊन संशयास्पदरीत्या उभा असल्याचे आढळून आले.

पोलिसांची चाहूल लागताच तो पळून जाण्याच्या तयारीत असताना पथकाने त्याला ताब्यात घेतले. त्याच्या ताब्यातील धारदार कोयता जप्त करण्यात आला.

## मैत्रीचा गैरफायदा घेत सोन्याचा अपहार करणारी टोळी जेरबंद; ९.१५ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** मैत्री करून विश्वास संपादन करत लग्नासाठी दागिने हवे असल्याचे सांगून महिलांकडील सोन्याचे दागिने घेऊन अपहार करणाऱ्या चौघांच्या टोळीला एमआयडीसी पोलिसांनी अटक केली असून त्यांच्याकडून ९ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, अनिता गणेश नजन हिने वनिता परसराम नवले (रा. पितळे कॉलनी, नागापूर) आणि अंजुम रफिक तांबोळी (रा. प्रेमभारतीनगर, बोल्हेगाव) यांच्याशी मैत्री करून त्यांचा




विश्वास संपादन केला. लग्नात घालण्यासाठी दागिने हवे असल्याचे सांगून तिने वनिता नवले यांचे साडेतीन तोळे आणि अंजुम तांबोळी यांचे अडीच तोळे सोन्याचे दागिने घेतले व त्यांचा अपहार करून फरार झाली. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३६३/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३१६ (२) अन्वये २४ मे २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचा तपास करण्यासाठी प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक नेमण्यात आले. तांत्रिक विश्लेषण आणि व्यापक शोधमोहीम राबवून पोलिसांनी अनिता गणेश नजन, वैष्णवी गणेश नजन, गणेश परसराम नजन आणि त्यांचा साथीदार बन्यामीन योसेफ बोरुडे यांना अटक केली.

आरोपींनी गुन्ह्यानंतर मोबाईल व विविध सिमकार्डचा वापर करून पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, तपास पथकाने अथक प्रयत्न व तांत्रिक तपासाच्या आधारे त्यांचा शोध घेतला. आरोपींकडून ८ लाख ४० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने तसेच ७५ हजार रुपये किमतीचे पाच मोबाईल फोन आणि सिमकार्ड असा एकूण ९ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

## दादा पाटील महाविद्यालयातील पाच विद्यार्थ्यांची विविध शासकीय पदांवर नियुक्ती

■ जनप्रवास प्रतिनिधी

**कर्जत :** दादा पाटील महाविद्यालयातील ५ विद्यार्थ्यांची विविध शासकीय पदांवर निवड झाली असून, महाविद्यालयाच्या यशस्वी परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.

नुकत्याच जाहीर झालेल्या विविध शासकीय भरती प्रक्रियेत महाविद्यालयातील कु. ऋतुजा अनिल काळदाते हिची पोलीस शिपाई पदासाठी, सुधीर भाऊसाहेब घालमे व कोमल शिवाजी बळे यांची ॲकवीजन बायोसायन्स, पुणे येथील कंपनीत असोसिएट पदी, प्रशांत सुभाष कदम या विद्यार्थ्याची जे.जे.शासकीय रुग्णालय, मुंबई येथे लॅब सर्व्हंट पदावर



तर कु. निशिगंधा गोरख भोसले हिची बृहन्मुंबई येथे कार्यकारी सहाय्यक पदावर निवड झाली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम, जिद्द आणि सातत्यपूर्ण अभ्यास केला तर यश निश्चित मिळते.

त्यासाठी विद्यार्थ्यांना सातत्याने गुणवत्तापूर्ण शिक्षण, विविध स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन, भरतीपूर्व प्रशिक्षण देण्याचे कार्य ’रयत स्पर्धा परीक्षा अकॅडमी व रयत डिफेन्स अकॅडमी’च्या माध्यमातून केले जाते. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही स्पर्धा परीक्षा व सरळ सेवा भरती परीक्षेकडे वळण्याची प्रेरणा मिळणार असल्याचा विश्वास प्राचार्य डॉ. संजय नगरकर यांनी व्यक्त केला. अधिकारीपदी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा नुकताच सत्कार करून त्यांचा गौरव करण्यात आला.

# आजही माणसाच्या मनाची विचार करण्याची धारणा बदललेली नाही

विज्ञानाच्या प्रगतीने जग फार पुढे गेले तरी आजही माणसाच्या मनाची विचार करण्याची धारणा बदललेली नाही. भारतीय समाजात स्त्रीचे स्थान आज कोणते आहे हे समजणे कठीण. ग्रामीण भागातील आणि शहरी भागातील स्त्रियांचा विचार करता ग्रामीण भागातील अशिक्षित स्त्रियांना आजही घरातीलच कामात गाडले जाते. तर शिक्षित स्त्रीया जग बदलते त्याप्रमाणे बदलून पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून जीवनमान जगताना दिसतात. हे जरी खरे तरी जन्माच्या बाबतीत आजही मुलाचाच आग्रह केला जातो. मुलगी नको ही भावना वाढीस लागलेली आहे. जरी कायद्याने गर्भलिंग चाचणी घेण्यास बंदी केली असली तरी चोरुन गर्भलिंग चाचणी केली जाते हे सर्वज्ञात आहे. तरी देखील शासनाने इतके उपाय करुन काही उपयोगाचे नाही. केवळ मानसिकता बदलणेच गरजेचे आहे. मग मुलगी असो किंवा मुलगा हा भेदभाव करुच नये. कारण मुलगा आणि मुलगी याच्यामध्ये फरक करणे म्हणजे एकप्रकारे



आपण हत्याच करण्यासारखे आहे. मुलीला एक वेगळी वागणूक आणि मुलाला एक वेगळी वागणूक अशा प्रकारच्या मानसिकतेचा समाजावर अनिष्ट परिणाम घडून येईल. तेव्हा मुलगा असो वा मुलगी भेदभाव नको. भारत आर्थिक महासत्ता बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे अथवा नाही हा वादाचा मुद्दा होऊ शकतो. मात्र, देशाने जी प्रगती साधलेली आहे त्यात स्त्रियांचं योगदान नि:संशय फार मोठं आहे. स्त्रियांचं कर्तृत्व प्रत्येक क्षेत्रात दिसून येत आहे; पण वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमने भारतात महिलांना नीटपणे वागवलं जात नाही, त्यांना बरोबरीची नव्हे, तर कनिष्ठ दर्जाची वागणूक मिळते असा निष्कर्ष एका अहवालात प्रसिद्ध केलेला आहे. अशाच प्रकारचा निष्कर्ष युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फंडने प्रसिद्ध केलेल्या अहवालातही व्यक्त करण्यात आला आहे. जागतिक लिंगभेद अहवालाप्रमाणे १३० देशांच्या यादीत भारताचा क्रमांक खूप खाली म्हणजे ११३ असा आहे. लिंगभेद दूर करण्यासाठी भारतासारख्या देशाने अधिक संवेदनशील आणि सांस्कृतिक दृष्टीकोन ठेवत त्याप्रमाणे अंमलबजावणी करायला हवी, असे युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फंडने म्हटलेलं आहे. लिंगभेद दूर करण्यासाठी आखलेली सकारात्मक धोरणं, संसदेत स्त्रियांना राखीव जागा देण्यासाठीचे प्रयत्न हे उपाय पुरेसे प्रभावी ठरत नसल्याचं वरील दोन अहवालांनी सिद्ध झालेलं आहे. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमप्रमाणे स्त्री-पुरुष लिंगभेदाची दरी जास्त असणाऱ्या वीस देशांच्या यादीत भारताचाही समावेश आहे. स्त्री-पुरुष आर्थिक असमतोलच्या बाबतीत भारत सहाव्या स्थानावर आहे. राजकीय सक्षमीकरणाच्या बाबतीत पंचविसाव्या, तर शालेय उपस्थितीच्या बाबतीत १२८ व्या स्थानावर आहे. आर्थिक सहभाग आणि संधी, शालेय उपस्थिती, राजकीय सक्षमीकरण आरोग्य या क्षेत्रातल्या भरीव कामगिरीमुळे नॉर्वे हा देश अव्वल स्थानवर आहे. डब्ल्यू ई एफमच्या यादीत फिनलँड, स्वीडन, आयर्लंड, न्यूझीलंड, फिलिपाईन्स, डेन्मार्क, नेदरलॅण्डस आणि लॅटव्हिया हे टॉपटेन देश आहेत. चीन ५६ व्या स्थानावर आहे. भारतातील स्त्री-पुरुष लिंगभेदाच्या प्रश्नाला सांस्कृतिक पैलू आहेत. उदाहरणार्थ वंध्यत्व, अशक्तपणा, रक्तदोष, योनीदोष आणि विचार,संसर्ग, नैराश्य आणि दुबळी संतती याबाबतीत भारतीय स्त्रिया आजही भीती, लाज किंवा रीती-रिवाजाच्या दडपणामुळे स्पष्टपणे बोलत नाहीत. स्त्रीचं गर्भाशय आणि मासिक पाळीतला रक्तस्त्राव यावर गर्भाचा दर्जा अवलंबून असतो आणि स्त्रियांमधील वंध्यत्वामुळेच तिला मुलगा होत नाही असे अनेक गैरसमज आजही भारतीय समाजात प्रचलित आहेत. अर्थात, स्त्री-पुरुष लिंगभेदाबाबतीत परिस्थिती बदलत आहे. यामुळे दृष्टीकोन आणि प्रयत्न यात बदल होत आहे. परिस्थिती एकदम बदलणारी नसली, तरी नोंद घेण्यासारखी प्रगती आहे, असं या अहवालात म्हटलेलं आहे.

# बैठकीची खोली घरातील महत्वाची जागा असते

बैठकीची खोली घरातील महत्त्वाची जागा असते. येथे लोकांचे येणे जाणे सुरूच असते व लोक तुमच्या स्वभावाचा अंदाज या खोलीला पाहून करतात.





या खोलीतील दारे, खिडक्या चमकदार करण्यासाठी त्यावर लिंबू लावून एखाद्या बारीक कपड्याने स्वच्छ पुसून काढाव्यात.

टी टेबल काचेचे असेल तर त्यावर थोडंसं पाणी टाकून वर्तमानपत्राने रगडून काढावे. सर्व डाग दूर होतील.

फुलदाणीला चमकदार बनविण्यासाठी त्यावर लिंबू रगडून काही वेळ तसेच सोडून द्यावे. क्रिस्टलला चमकदार बनविण्यासाठी सरसोची (मोहरी) पावडर आणि वनस्पती तेलाच्या पेस्टने स्वच्छ करावे.


ड्रॉइंग रूम किंवा पूजेत ठेवलेल्या चांदीच्या भांड्यांना चमकदार बनविण्यासाठी बेसनात लिंबाचा रस मिसळून लावला पाहिजे. लाकडाच्या फर्निचरवर ओरखडे उमटले असतील तर कॉड लिव्हर ऑइल लावून ठेवावे व दुसऱ्या दिवशी त्या जागेला स्वच्छ केले पाहिजे.

बैठकीच्या खोलीतील कारपेट खराब झालं असेल किंवा त्यावर डाग पडले असतील तर त्या भागावर बटाटा रगडावा. नंतर गरम पाण्याने भजलेल्या कापडाने पुसून काढावे. भिंतीवर खिळा ठोकण्याअगोदर त्याला गरम पाण्यात बुडवून ठेवले पाहिजे व नंतर त्याला ठोकले पाहिजे त्यामुळे भिंतीचे प्लॅस्टर पडत नाही. फ्रेम चांगली लावता येते.तुमच्या कॉम्प्युटरच्या की-बोर्ड किंवा माऊसवर डाग पडले असतील तर त्यावर नेलपेंटचे रिम्हूवर लावून कापसाने पुसून काढावे.

# बरेच लोक मानसिक तणावाला बळी पडतात

आजच्या धावत्या आधुनिक युगात प्रत्येक व्यक्ती हा मानसिक ताणात वावरत असतो. काही लोक त्यातून तरुण जातात. परंतु बरेच लोक त्यात अडकून मानसिक रोगाचे बळी होतात. खरे तर घडणारी प्रत्येक गोष्ट ही घडणारच असते, असा जर विचार केला आणि घडलेल्या घटनेचा व सत्य परिस्थितीचा स्वीकार केला तर या त्रासातून तरून जाणे फार सोपे आहे. परंतु आपण त्याचा स्वीकार करण्यास अयशस्वी होतो, प्रत्येक घटना सकारात्मक दृष्टीने बघणे गरजेचे असते, मनाला ज्या वेळेस या गोष्टीचा स्वीकार होत नाही, त्यावेळेस मानसिक ताण तयार होतो आणि मग हळूहळू मनोविकारची सुरुवात होते.

आपल्या ताण-तणावाची कारणे आपल्याच आत असतात आणि आपण ते शोधले पाहिजे, ती एक मनाची दुर्बलता असते ज्यामुळे आपण सत्य परिस्थिती स्वीकारण्यास असमर्थ ठरतो. मनाच्या दुर्बलतेमुळे सत्य गोष्टीची जाणीव आपल्याला होत नाही, त्यामुळे सत्यता आणि आपल्या अपेक्षा याची जाणीव व त्याचा समतोल ठेवणे कठीण होते. मनाच्या दुर्बलतेमुळे हे सर्व घडत असते, ही दुर्बलता सर्व मनोविकारचे मूळ असते. या मुळे मनात आणखी ताण-तणाव निर्माण होतात, हे जर वारंवार होत राहिले तर त्याचा वाईट परिणाम आपल्या मानसिक आणि शारीरिक प्रकृतीवर होतो.




परिणामी नैराश्य, अनेक मनोविकार, शारीरिक व्याधी उदा: हृदयविकार, मधुमेह, ककरोग, पोटाचे विकार, त्वचेचे विकार, होतात. जीवन नकोसे वाटते आत्महत्या करण्याचे विचार येतात. मनाला वारंवार निराश वाटणे, जीवनात आनंद न वाटणे, तहान कमी जास्त होणे, भूक न लागणे किंवा अती भूक लागणे, झोप न येणे किंवा अती झोप असणे,विनाकारण काळजी चिंता वाटणे, श्वास घेण्यास त्रास होणे, छातीत धडधड होणे, खूप घाम येणे, कुठल्याही कामात किंवा अभ्यासात रस न राहणे, मानसिक व शारीरिक कमजोरी जाणवणे, स्मरणशक्ती कमी होणे, नकारात्मक विचार येणे, जीवन संपून टाकावे आत्महत्याचे विचार येणे...इत्यादी आनेक लक्षणे मनोविकारत मनाच्या दुर्बलपणामुळे निर्माण होतात. करावे लागतील, भूतकाळचा विचार न करता झालेल्या गोष्टी सोडून द्याव्यात भविष्याची काळजी करू नयेत, तरच आपण वर्तमानकाळात आनंदी राहू शकतो. खुठल्याही घडणा-या घटनेबद्दल खेद न बाळगता घडलेली बरी-वाईट घटना किंवा परिस्थितीचा स्वीकार करणे. रस्त्याने चालत असताना रस्ता जसा आहे तसेच चालावे लागते रस्ता जर नागमोडी वळणाचा असेल तर आपल्याला त्याप्रमाणे वळण घेतच चालावे लागते आपण जर ठरवलं नाही मी सरळच चालेल तर ते शक्य नाही. आपण जन्माला येताना काही आणलेले नसते आणि मृत्यू नंतर काही बरोबर घेऊन जात नाही. उदा:- एक राजा असतो त्याला झोपेत स्वप्न पडते की त्याला दुस-या राजाने कैद केले आणि आता त्याला फासावरती देणार, आणि तो खूप घाबरतो रडू लागतो आता माझ कसं होणार माझ्यामागे माझ्या राज्याचे काय होणार बायका-मुले, आई-वडील यांचं कस होईल. हे स्वप्न पडत असताना त्याची अचानक झोप मोडते बघतोतर तो खुठे फासावर नसून महालात बिछान्यावर असतो हे जाणवल्यावर त्याला खूप आनंद होतो कारण सत्यपरिस्थिती त्याला समजलेली असते ती एक मनाची स्वप्न अवस्था होती. मनाची दुर्बलता ही एक अशीच अवस्था असते ज्यामध्ये सत्य परिस्थितीची जाणीव होऊन त्यातून बाहेर पडणे कठीण होत आणि तो स्वप्नातल्या राज्याप्रमाणे त्याच त्या विचारात गुरफटत जातो आणि मनोविकारचा शिकार होतो.

# विवाह संस्था ही एक गरजेची बाब

विवाहबंधनाच्या बंधात अटकणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला हे जीवन नकोसे वाटत असते. पर्यायाने जरी हे नको असेल तरीसुद्धा शारिरीक पातळीवर आणि मानसिक पातळीवर परिणाम घडून येऊ नयेत याकरिता प्रत्येक व्यक्तीला विवाह गरजेचा असतोच. जरी विवाहबंधनात अटकून न राहणाऱ्या व्यक्ती मानसिक पातळीवर योग्य असतील याची साशंकता बाळगण्याचे कारणच नाही. वैवाहिक सुख हे मानसिक पातळीवरुन शारीरिक पातळीवर परिणाम करत असते. आणि शारीरिक पातळीवरुन मानसिक पातळीला समाधान मिळते. यातच साऱ्या जीवनाचे सुख लपलेले जरी असले तरी यथासांग आयुष्य जगत असताना प्रत्येक स्त्री-पुरुषाला शरीरसुखाची आवश्यकता असतेच.

आणि स्वच्छंदी व्यक्ती आपल्या मानसिकतेचा भाग म्हणून इतरत्र आधार शोधतात. हे त्यांच्यादृष्टीने योग्य असेल पण सामाजिक मुल्यांचा विचार करता असे स्वच्छंदी जीवन जगणे पूर्णपणे चुकीचे असते. म्हणूनच



पुरातन काळपासून ते आजपर्यंत विवाहसंस्था ही एक गरजेची बाब असून त्याचा सर्वांनाच फायदा होतो. अविवाहित व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे बंधन आपल्यावरती नको असते. त्यामुळेच ते विवाहासारखा प्रकार टाळत असतात. मात्र, वैवाहिक सौख्य हेच खरे सौख्य असते. विवाहपूर्व जीवन हे एक मुक्त संचार करणारे असते. मात्र, विवाहानंतर त्यावरती अनेक बंधने येऊ लागतात आणि अशा प्रकारच्या बंधनांना कोणीच झुगारु शकत नाही. जर झुगारलेच तर त्यामध्ये मिळणारे सुख आणि समाधान आपण एक प्रकारे धुडकावून लावत आहोत हे वास्तव सत्य कोणीही नाकारु शकत नाही. मात्र,

जरी अविवाहित मंडळी आपल्या स्वच्छंदी जीवनाला सुखी समजत असले तरी खरा सौख्याचा खजिना विवाहित मंडळीकडेच असतो. एका संशोधनात आढळलले आहे की, जरी कमी-जास्त प्रमाणात असले तरी लग्नानंतर माणसाचे समाधान वाढते. हे समाधान काही वर्षांपूरते असते की दीर्घकालीनयाविषयी संशोधकात एकमत नाही.

लग्नाला दोन वर्षे होताच बऱ्याच जणांना त्यांचे अविवाहित जीवन यापेक्षा चांगले होते असे वाटते. याविषयी जाणकार म्हणतात, ही सुद्धा माणूस समाधान हळूहळू आत्मसात करीत असल्याची एक प्रक्रिया असते. संशोधक असेही म्हणतात की, लग्नानंतर जास्त आनंद मिळाल्याने माणूस त्यात संतुलन राखू शकत नसतो व त्यामुळे त्याला तो आनंद खटकत असतो. मानसशास्त्रज्ञ याकडे जर एखादा माणूस अचानक श्रीमंत झाला तर काही दिवसानंतर त्याच्या आनंदाची, सुखाची पातळी कमी होणे यादृष्टीने पाहतात.

याप्रमाणेच एखाद्याबाबत एखादी दु:खद घटना झाली तर तो जास्त दिवस दु:खी राहात नाही व लवकरच सामान्य स्थितीत परततो. संशोधक मानतात की, माणसात एक नैसर्गिक चक्र असते जे त्याला आनंदाच्या सरासरी पातळीकडे राखून ठेवते. ज्या व्यक्ती लग्नानंतर दोन वर्षानंतर त्यांचे अविवाहित जीवन यापेक्षा उत्तम होते, असे मानतात त्याचे एक कारण असत. अर्थातच ते आनंदी, सुखी होतात; पण हळूहळू त्यांना त्या सुखाची, आनंदाची सवय होते. लग्नानंतर समाधानाची पातळी घसरण्याची इतरही अनेक कारणे असू शकतात.

# तुम्हाला अशक्तपणाचा सामना करावा लागत असेल तर...



गरजेपेक्षा शरीर मोठे असेल तर त्रास होतो, शरीर अशक्त असल्यांनतही त्रास होतो.


शरीराची काळजी घेतली नाही तर, आजाराचा सामना करावा लागतो. क्षमतेपेक्षा जास्त काम करणे, अवेळी जेवण करणे, पूर्ण झोप न घेणे यासारख्या सवयींचा वाईट परिणाम शरीराच्या कार्यक्षमतेवर पडतो. यामुळे सतत अशक्तपणा जाणवतो.

अशा वेळी खाण्या-पिण्याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे असते. तुम्हालाही अशक्तपणाचा सामना करावा लागत असेल, थकवा जाणवत असेल किंवा आजारी पडण्याची भिती असेल तर करा हे साधे-सोपे उपाय. अशक्तपणा आला असेल तर दूध, तूप, यासाख्या पदार्थांचा आहारामध्ये मोठ्याप्रमाणात वापर करावा.

शरीरासाठी भरपूर झोप घेणे आवश्यक आहे. गव्हाची चपाती, मुग किंवा हरभरा डाळ, पालक, पपई, मेथी, पत्तागोबी,

फूलगोबीचा आहारात मोठ्या प्रमाणात वापर करावा. याशिवाय प्रत्येक दिवशी, सेफ, अंगुर, मोसंबी या फळांबरोबरच अंजीर, बदाम, पिस्ता, काजूचा वापर करावा.

# प्रेमात हवी असते एकमेकांबद्दल विश्वासाची दृढ इच्छा



प्रेमात हवी असते एकमेकांबद्दल विश्वासाची एक दृढ इच्छा. त्या इच्छेपोटीच आपण हजारो मैलाचे अंतर कापून जाणारे पक्षी पाहिलेत. पण विज्ञानाच्या प्रगतीमुळे आपण एका सेंकदाच्या आत लाखो कि.मी. दूर असून सुद्धा विचारांनी एकत्रित येतो. मात्र, या विज्ञानाच्या प्रगतीने आपण शब्दाने सावरु शकतो आपले नाते. मात्र, याचा देखील वापर जपून करणे गरजेचेच असते. प्रेमापोटी याचा वापर आपण टाळलाच तर समोरच्या व्यक्तीच्या मनात आपल्याबद्दल काय घालमेल चालू असते हे विचार न केलेलेच बरे. प्रत्येकाच्या ठायी प्रेमाला स्थान असते हे स्थान ढासळू नये यासाठी एकमेकांनी काही गोष्टी समजून घेणे गरजेचे असते.

जेव्हा एखादी व्यक्ती जिंकत नाही तेव्हा एखादी व्यक्ती जिंकते, तेव्हाच दुसऱ्याला जिंकण्याचे समाधान मिळते. एखाद्याच्या कामगिरीवर तो किती प्रमाणात इतरांचे आकर्षण बनतो, हे अवलंबून असते. अशी कामगिरी मनापासून आवडत नसली तरी अनेकांना त्यासाठी प्रयत्न करावे लागतात, ही आजकाल समाजा रुढ झालेली बाब आहे. तरुण यासाठी सर्वच बाबतीत पुढे राहण्याचा प्रयत्न करतो. स्त्रिया संपूर्णपणे मुक्त नसतात. लहान मुलगी आधी आपल्या आईशी स्पर्धा आणि त्यानंतर चढाओढ करते. त्यानंतर ती शाळेतील आपली कामगिरी उत्कृष्ट करण्याचा प्रयत्न असतो. तिला चांगल्या गुणांनी उत्तीर्ण व्हायचे असते किंवा पहिला क्रमांक पटकावायचा असतो. त्यासाठी ती स्पर्धा करते. ती ज्या माणसाशी लग्न करते, त्याच्याशी स्पर्धा करू पाहते. तिला निश्चित होण्यासाठी आपल्या पतीवर भरपूर प्रेम करावेसे वाटते. ज्या माणसाला काही महत्त्व आहे, काही मान आहे. ज्याच्याकडे चांगली स्थिती आणि पैसा आहे. अशा माणसाशी तिचा विवाह करणे इष्ट वाटते. तिला चांगले लग्न करायचे असते.

पालक आपल्या मुलांच्या स्पर्धात्मक भावनेला खतपाणी घालतात आणि त्यामुळेच घरातील संबंधामध्येही स्पर्धात्मक भावना निर्माण होते. पालकांची मुलांच्या प्रेमासाठी आणि बहीण-भावंडांची पालकांच्या प्रेमासाठी स्पर्धा लागते. शाळेत, मैदानावर स्पर्धेला उत्तेजन दिले जाते. मानासाठी आणि काही गोष्टींच्या प्राप्तीसाठीही आजकाल प्रचंड स्पर्धा करावी लागते. आपल्या सर्वच गोष्टी स्पर्धेशी आणि सामर्थ्याशी जोडल्या गेल्या आहेत. यामागे केवळ इतिहास, परंपरा किंवा धार्मिक गोष्टी नाहीत, तर त्यामागे श्रीमंती, समृद्धीसुद्धा आहे. आपण भरपूर संपत्ती मिळविण्यासाठी आणि आपला मान वाढविण्यासाठी विविध प्रशिक्षणे घेतो, पण प्रेमाच्या क्षमतेसाठी कुठलीही प्रशिक्षण संस्था नाही. कुठल्याही मोठ्या श्रीमंत माणसाला प्रेमाची शाळा काढण्याची इच्छा होत नाही. आपल्या जीवनात भौतिक वस्तूचे व इतर गोष्टींचे महत्त्व वाढले असतानाही आजही प्रत्येकाला जीवनात प्रेम ही मुख्य महत्त्वाची गोष्ट आहे.

आपण भौतिक गोष्टी प्राप्त केल्यानंतर त्यापासून आपल्याला सन्मान मिळतो. थोडेफार समाधानही मिळते. पण हे समाधान परस्परांची आवश्यकता आणि त्यात मिळणारे समाधान देऊ शकत नाही.



# गर्भवती महिलेचा आहार कसा असावा

गर्भवतींच्या त्या काळातील परिस्थितीचा, विचाराचा व वातावरणाचा परिणाम तिच्या पोटी असलेल्या संततीवर होत असतो. याचे भान गर्भवतीच्या कुटुंबियांना असायला हवे; विशेषत: तिच्या पतीला.

गर्भवती महिलेला प्रोटीन व लोह पदार्थांनी परिपूर्ण पौष्टिक आहाराचीही गरज असते. यासाठी दूध, लोणी व हिरव्या पालेभाज्या तिच्या आहारात असायला हव्यात. मुळा, गाजर, टोमॅटो, गाजर यासारके कार्बोहायड्रेट्स, प्रोटिन्स व व्हिटॅमिनयुक्त अन्नही द्यायला हवे

गर्भवती महिला जर मांसाहारी असेल तर वळोवेळी मटण, मासे व अंडीही देऊ शकता. परंतु अंडी व मटण जास्त प्रमाणात देऊ नये ते तिच्या व तिच्या बाळाच्या आरोग्याला हानीकारक असते.

या आवश्यक खाद्य पदार्थांशिवाय गर्भवती महिलेला रात्री झोपण्यापूर्वी सफरचंद, संत्री, मोसंबी, पपई, द्राक्षे अशी प्रोटीनेयुक्त फळे मोसमानुसार खाण्यास द्यावीत. जेणेकरुन खाद्यपदार्थांव्दारे ज्या पौष्टि घटकांची पूर्तता होत नसेल ती फळाव्दारे करता येऊ शकते.

# सुगरणीचा सल्ला

○ आपण नेहमी कांदा, बटाटा, केळी, मिरची यांची भजी करतो. गुलबक्षीच्या कोवळ्या पानांची भजी करून बघा. ज्यांना डाळीचे पीठ सोसत नाही, पोटात वात धरतो, त्यांनी गुलबक्षीच्या कोवळ्या पानांची भजी करावी. ही अजिबात बाधत नाही. वृद्ध माणसांना तर फारच चांगली. ही भजी फारच चांगली फुगतात व कुरकुरीत होतात. पाने भाज्यासकट चावून खावीत म्हणजे डाळीचे पीठ बाधत नाही. ही पाने औषधी आहेत.

○ दर वेळेस विकतची चॉकलेट आणण्याऐवजी हे सोपं चॉकलेट घरी बनवून बघा. पाव किलो टोमॅटोचा मिक्सरवर रस काढून गाळून घ्यावा. रसापेक्षा थोडी कमी साखर घालून मंद गॅसवर आटवावे. खवा असल्यास थोडा खवा अथवा आटत आल्यावर थोडीशी पिठीसाखर घालून चॉकलेट-गोळ्यांचे आकार द्यावेत. टोमॅटोच्या रंगामुळे अगदी चॉकलेटसारखी दिसणारी व किंचित आंबटगोड चॉकलेटं तयार होतात. पाव किलो टोमॅटोची पंधरा-वीस चॉकलेटं होतात. कुठला कृत्रिम रंग वा स्वाद लागत नाही.

○ नेहमीप्रमाणे इडलीचे पीठ करून ठेवावे. इडली फ्राय सर्वांनाच खूप आवडतात. पण त्याला तेल खूपच लागते. त्यासाठी पर्याय म्हणून कढईत अर्धा ते पाऊण चमचा तेल घालावे. त्यात सातआठ मोहरीचे दाणे घालावेत. ते तडतडल्यावर इडलीचे पीठ १ डावभर घालावे व झाकून ठेवावे. चारपाच मिनिटांनी खालून खरपूस लाल झाल्यावर परतावे व २ ते ३ मिनिटांनी काढावे. एकदम खमंग इडली फ्राय होतात. सुरवातीला जरा वेळ लागतो. पण एकदा कढई तापली की भराभर सुटून येतात. अजिबात चिकटत नाहीत. 'निर्लेप' कढई असेल तर अगदी थोडे तेल लागते. मोहरीचा स्वादही फायदा होतो.

○ चार चांगले पिकलेले टोमॅटो, २ वाट्या डाळीचे पीठ, एक वाटी तांदळाचे पीठ, तिखट, धनेपूड, जिरेपूड, कोथिंबीर, मीठ, तेल हे सर्व साहित्य मिसळून घ्यावे. हे मिश्रण सरसरीत भिजवावे व तासभर झाकून ठेवावे. नंतर विस्तवावर पसरट तवा ठेवून ते मिश्रण पळीने नीट तव्यावर टाकावे व पातळ पसरावे. दोन मिनिटे झाकून ठेवावे. वाफ आल्यावर उतरवावे. तिखट चटणीबरोबर गरम रूचकर लागते.

○ केकच्या मिश्रणात अंड्यातील पिवळा व पांढरा भाग एकत्र न घालता पांढरा भाग शेवटी घालावा व हे मिश्रण निर्लेप सॉस पॅनमध्ये घालून गॅसवर ठेवावे. पॅनखाली पोळीचा सपाट तवा ठेवावा. गॅस मंद ठेवा. एक तासाने केक छान फुलून येतो. निर्लेप पॅनमुळे केक चिकटत नाही. शिवाय भांड्याला तूपही फारसे लावावे लागत नाही.

○ बहुतेक प्रकारच्या चकल्या करताना तांदूळ वापरला जातो. सर्व धान्ये धुतली नाहीत तरी तांदूळ धुऊन वाळवावेतव नंतर सर्व धान्ये एकत्र दळावी. तांदूळ धुऊन एक तास पाण्यात भिजत ठेवावेत व या पाण्यात तुरटी फिरवावी. नंतर तांदूळ निथळून वाळवून दळावेत. अशा प्रकारे केलेली चकली अतिशय हलकी होते.

○ केकसाठी आयसिंग करताना जर आयसिंग जास्त पातळ झाले, तर नक्षी चांगली येत नाही. त्यासाठी आयसिंगमध्ये थोडे कॉर्नफ्लोअर मिसळावे किंवा घरच्या घरी आयसिंग शुगर तयार करावी. ती अगदी कमी वेळात व अल्प किमतीत तयार होते. पाव किलो पिठीसाखरेत, (पिठीसाखर घरी मिक्सरमध्ये) करावी. बाजारच्या पिठीसारखेत खूप कचरा असतो). साधारण एक ते सव्वा टेबलस्पून कॉर्नफ्लोअर घालून पिठीच्या चाळणीने ३ ते ४ वेळा चाळावे म्हणजे मिश्रण चांगले एकजीव होते.

# अपार प्रेम असूनही, ‘या’ चुका नात्यात ब्रेकअप करू शकतात

## वेळीच सुधारा दोष दूर करा



प्रेमाचं नातं म्हटलं की जोडीदारांमध्ये छोटे-मोठे वाद आलेच, कधी-कधी एकमेकांबद्दलच्या अपेक्षची पूर्तता न झाल्याने वाद होतात, तर जोडीदाराच्या काही गोष्टी पटत नाही तेव्हा देखील वाद होण्याची शक्यता असते. त्यामुळे कोणत्याही व्यक्तीसोबत रिलेशनशिपमध्ये राहणं हे जितकं आनंदाचं असतं. तितकंच आव्हानात्नकही आहेत. हे दोष वेळीच दूर केले नाहीत तर ते नातं फार काळ टिकत नाही. अशात, जर तुम्हाला छोट्या चुकांमुळे ब्रेकअपला सामोरं जावे लागणार नसेल, तर जाणून घेऊया अशा चुका ज्या ब्रेकअपचे कारण बनतात.

**ब्रेकअप होण्याचे सर्वात मोठे कारण** : ब्रेकअप करणे सोपे नाही. प्रेमाचं नातं संपुष्टात येणं ही सर्वात कठीण गोष्ट असते, तर या परिस्थितीतून जाणाऱ्या जोडप्यांसाठी हा खूप कठीण अनुभव असतो. ब्रेकअप होण्यामागे अनेक कारणे असली तरी सर्वात मोठे कारण म्हणजे एकमेकांवरचा विश्वास नसणे आणि एकमेकांना नीट समजून न घेणे. काही प्रकरणांमध्ये ब्रेकअप हाच एकमेव मार्ग असतो, परंतु परस्पर समन्वयाच्या अभावामुळे आणि अविश्वासामुळे ब्रेकअप होत असेल तर तो टाळता देखील येतो. जाणून घेऊया अशा गोष्टींबद्दल ज्या कोणत्याही नात्याला ब्रेकअपच्या उंबरठ्यावर आणू शकतात.

**एकमेकांना बदलण्याची इच्छा** : आपल्या जोडीदारात त्याच्या आवडीचे सर्व गुण असावेत असे या व्यक्तीला वाटते जे अगदी स्वाभाविक आहे. पण खऱ्या आयुष्यात हे शक्य नाही. समोरच्या व्यक्तीमध्ये अशी काही सवय असू शकते जी तुम्हाला आवडत नाही. पण याचा अर्थ असा नाही की तुम्ही त्यांना बदलण्याचा प्रयत्न करू लागलात. यामुळे त्यांना नात्यात नकोसा दबाव जाणवू लागेल. म्हणून, त्यांना बदलण्याचा प्रयत्न करण्याऐवजी, तुमचा मुद्दा त्यांच्यासमोर प्रेमाने मांडा, जेणेकरून त्यांना तुमचा मुद्दा समजेल.

**दोषाचा खेळ** : प्रत्येक व्यक्ती चुका करतो. पण भूतकाळातील चुकांची सतत आठवण करून दिल्याने कोणत्याही नात्याचा पाया कमकुवत होऊ शकतो. चूक झाली असेल तर माफी मागून वाद संपवा. स्वतःचा बचाव करण्यासाठी, तुमच्या जोडीदाराच्या भूतकाळातील चुका मोजू नका किंवा तुमच्या चुकीसाठी त्याला दोष देण्याचा प्रयत्न करू नका.

**एकमेकांना वेळ** : आपल्या आयुष्यात काही जबाबदाऱ्या असोत, किंवा काही गोष्टींमुळे तुम्ही एकमेकांना कमी वेळ देता. हे करणे टाळा. एकमेकांशी बोलण्यासाठी वेळ काढण्याचा प्रयत्न करा. फिरायला जा आणि एकमेकांसोबत वेळ घालवा. एकमेकांना वेळ न दिल्याने नातं कमकुवत होऊ लागते.

**वाद थांबवा** : एखाद्या गोष्टीवरून जोडीदाराशी वाद होणे स्वाभाविक आहे. हे प्रत्येक नात्यात घडते. पण ही लढाई दीर्घकाळ सुरू राहिल्यास तुमचं नातं कमकुवत होऊ शकते. यामुळे तुमची एकमेकांबद्दलची नाराजी वाढेल. त्यामुळे हा वाद लवकरात लवकर सोडवण्याचा प्रयत्न करा.

# वारंवार तहान लागत असेल तर करा हे घरगुती उपाय ...



बऱ्याच वेळा आपल्याला पाणी प्यायल्यानंतर ही तहान शमत नाही. वारंवार तहान लागत असेल तर हे घरगुती उपाय करून पहा....

* पाण्यात मध टाकून गुळण्या कराव्यात तसेच लवंग चघळल्याने वारंवार तहान लागत नाही.

* अननसावरील साल चाकूने काढून त्यातील गराचे बारीक बारीक तुकडे करा. ते साखरेच्या पाकात शिजवून तयार झालेला मुरंबा उन्हाळ्यात खाल्याने शरीरातील पाणी कमी होत नाही व तहानही वारंवार लागत नाही. तसेच हृदयरोगावरही अननसाचा मुरंबा लाभदायी आहे.

* गायीच्या दूधाचे दही १२५ ग्रॅम, साखर ६० ग्रॅम, तुप ५ ग्रॅम, मध ३ ग्रॅम व मिरे-इलायची पेस्ट ५-५ ग्रॅम घ्यावे. दह्याला चांगले फेटून घ्या. त्यानंतर त्यात इतर सामुग्री टाकून स्टीलच्या भांड्यात ठेऊन द्या. दिवसभरातून दोन ते तीन वेळा थोडे-थोडे दही सेवन केल्याने वारंवार लागणारी तहान शमते.

* भात शिजवलेल्या पाण्यात मध टाकून ते पाणी दिवसातून दोन वेळा प्याल्याने तहान कमी लागते व ऊनही लागत नाही.

# या सवयींमुळे बनवा तुमचे नाते अतुट



प्रत्येकाला स्वत:च असं हक्काच नातं हवं असतं. हक्काचा आपला माणूस हवा असतो. नातं अनेक गोष्टींवर अवलंबून असतं त्यातील एकही गोष्ट कमी झाली तरी नात्याला तडा जावू शकतो. जर तुम्हाला तुमचे नाते अतुट करायचे असेल तर प्रेरणादायी वक्ते संदीप माहेश्वरी आणि डॉक्टर शीखा यांनी एका मुलाखती दरम्यान काही टिप्स दिल्या आहेत.

आपल्यावर कोणीतरी भरभरुन प्रेम करावा असं प्रत्येकाला वाटत असतं. पण फक्त असं वाटून नातं घट्ट होत नाही त्यासाठी नात्याला वेळ द्यावा लागतो.नातं अनेक गोष्टींवर अवलंबून असतं त्यातील एकही गोष्ट कमी झाली तरी नात्याला तडा जावू शकतो.

जर तुम्हाला तुमचे नाते अतुट करायचे असेल तर मोटिवेशनल स्पीकर संदीप माहेश्वरी आणि डॉक्टर शिखा यांनी एका मुलाखती दरम्यान काही टिप्स दिल्या आहेत. या ५ गोष्टींचा अवलंब तुम्ही तुमच्या नात्यांमध्ये नवसंजीवनी आणू शकता. चला तर मग जाणून घेऊयात कोणत्या आहेत त्या ५ गोष्टी ज्यामुळे तुमचे नाते पुन्हा एकदा बहरुन जाईल.

**चित्रपटाच्या दुनियेतून बाहेर या**

अनेक जोडपी चित्रपटांमध्ये ज्या प्रकारे गोष्टी दाखवल्या जातात त्या प्रकारे अपेक्षा ठेवतात. पण अशात नात्याबद्दल आणि प्रणयाबद्दल वास्तववादी अपेक्षा ठेवा. या जगात कोणत्याचा गोष्टी परफेक्ट नाही ही गोष्ट तुम्हाला माहित असणे असणे आवश्यक आहे. चित्रपटाच्या दुनियेतून बाहेर या वास्तवात जगण्याचा प्रयत्न करा.

**तुलना करु नका**

जर तुम्ही कोणत्या व्यक्तीवर प्रेम करत असाल तर त्या व्यक्तीच्या चांगल्या वाईट अशा सर्वाच गोष्टी स्विकारा. तुमच्यावर प्रेम करणारा व्यक्ती नेहमीच तुमच्या मनाप्रमाणे वागेल असे होणार नाही. या जगात कोणीही परफेक्ट नाही आहे.

# पावसाळ्यातील प्रत्येक आजारावर एकच उपाय ‘हळद’, या ५ प्रकारे हळद वापरल्यास प्रतिकारशक्ती होईल मजबूत



पावसाळा सुरू असून या ऋतूत रोगराई आणि संसर्गाचा सर्वाधिक धोका असतो. खरं तर, पावसाळ्यात रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत झाल्यामुळे रोगांचा धोका वाढतो. यामुळेच या काळात रोगप्रतिकारशक्ती वाढविण्यावर तज्ञ भर देतात जेणेकरून शरीराला रोगांशी लढण्याची ताकद मिळू शकेल. जर तुम्ही आजूबाजूला नजर टाकली आणि पाहिलं, तर तुम्हाला दिसून येईल की आजकाल बाजारात दिसणारी पावडर, पेये आणि इतर अनेक गोष्टींचा भरणा आहे. जरी हे सर्व रोग प्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी प्रभावी असले, तरी त्यांचे अनेक दुष्परिणाम देखील होऊ शकतात. कोणत्याही दुष्परिणामांशिवाय रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासोबतच तुम्हाला रोग आणि संसर्ग टाळायचे असतील तर तुम्ही हळदीचाही वापर करू शकता.

हळदीमध्ये प्रक्षोभक आणि अँटी-बॅक्टेरियल प्रभाव असल्याचे ओळखले जाते, जे सर्दी, फ्लू आणि इतर मौसमी आजारांपासून बचाव करते. डिटॉक्सप्रीच्या प्रमुख आणि आहारतज्ञ प्रियांशी भटनागर यांच्या मते, याचा पुरेपूर फायदा घेण्यासाठी तुम्ही अनेक प्रकारे हळदीचा वापर करू शकता.

**तुळशी-हळदीचा काढा** : विविध घटकांचा वापर करून काढा बनवता येतो. तुमची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यासाठी तुम्ही तुळस आणि हळदीच्या मिश्रणाने काढा बनवू शकता. या दोन्ही गोष्टी औषधी गुणधर्मांचा खजिना आहेत.

**हळदीचा चहा** : हळद किती गुणकारी आहे हे तुम्हा सर्वांना माहीतच आहे. त्याचा जास्तीत जास्त फायदा घेण्यासाठी तुम्ही चहामध्ये हळद वापरू शकता. चहा बनवण्यासाठी तुम्हाला आले, मिरपूड, मध आणि अर्थातच हळद आवश्यक आहे.


**हळदीचे दूध** : बदलत्या ऋतूमध्ये रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यासाठी हळदीचे दूध रोज घ्यावे. हळदीचे दूध जे प्रक्षोभक आणि अँटी-बॅक्टेरियल गुणधर्मांनी समृद्ध आहे, ते प्यायल्याने तुम्हाला चांगल्या झोपेसोबत अनेक फायदे मिळतील.

**पुदिना आणि हळदीची चटणी** : जर तुम्हाला आरोग्यासोबतच चवही हवी असेल तर तुम्ही हळद आणि पुदिन्याच्या चटणीचा तुमच्या जेवणात समाविष्ट करा. सर्वात चांगली गोष्ट म्हणजे ते बनवायला तितकेच सोपे आहे. तुम्ही ते रोटी, पराठे किंवा फक्त एक वाटी भातासोबत खाऊ शकता.

**हळद लिंबू चहा** : हळद लिंबू चहा हा चहा प्रेमींसाठी एक चांगला आणि वेगळा पर्याय आहे. यातून तुम्हाला चवीसोबतच आरोग्यही देईल. हे बनवायला सोपे आहे आणि अनेक रोगांवर हा एक उत्तम आणि स्वस्त उपचार आहे.

**टीप** : हा लेख फक्त सामान्य माहितीसाठी आहे. हा कोणत्याही प्रकारे कोणत्याही औषधाचा किंवा उपचारांचा पर्याय असू शकत नाही. अधिक तपशीलांसाठी नेहमी आपल्या डॉक्टरांशी संपर्क साधा.

# मध, गूळाच्या सेवनाने ब्लड शुगर होईल कमी?



अनेक जणांना गोड पदार्थ खूप आवडतात. मात्र, वजन वाढेल किंवा शरीरातील साखरेचं प्रमाण वाढेल या भीतीनं काही जण गोड पदार्थ खाण्याचं टाळतात. परंतु, साखरेला पर्याय म्हणून गूळ किंवा मध यांच्याकडे पाहिलं जातं. पदार्थाची गोडी वाढविणाऱ्या या पदार्थांचे काही गुणकारी फायदेदेखील आहेत. त्यातच मधाविषयी जाणून घ्यायचं झालं, तर मध हा अत्यंत गुणकारी आहे. अगदी भूक वाढविण्यापासून ते पचनशक्ती सुधारण्यापर्यंत मधामुळे अनेक शारीरिक फायदे होतात. दुसरीकडे गूळ खाण्याचेही अनेक आरोग्यदायी फायदे आहेत. पण मध, गूळ हे पदार्थ रक्तातील साखर नियंत्रणासाठी चांगले आहेत का? याच विषयावर मॅक्स हेल्थकेअरमधील डॉ. मिथल यांनी माहिती दिल्याचे दिले आहे. त्याबाबत आपण जाणून घेऊ

आजकालच्या धकाधकीच्या आणि अस्वस्थ जीवनशैलीमुळे बहुतेक लोक मधुमेहाच्या समस्येने त्रस्त आहेत. मधुमेही रुग्णांना आहाराची विशेष काळजी घेण्याचा सल्ला डॉक्टर देतात. मधुमेह ही एक अशी आरोग्य समस्या आहे, ज्यामध्ये माणसाला अनेक बंधनांना सामोरे जावे लागते. मधुमेहाच्या रुग्णाने कमी ग्लायसेमिक इंडेक्स असलेले अन्न सेवन करावे आणि मिठाई पूर्णपणे टाळावी; अन्यथा त्यांच्या शरीरातील साखरेची पातळी वाढण्यास वेळ लागत नाही.

मध हा सोनेरी रंगाचा एक द्रव पदार्थ आहे. मध पारंपरिकपणे गोड पदार्थ म्हणून, तसेच घसा खवखवणे, खोकला नियंत्रित करणे व ॲलर्जी कमी करणे यासाठी वापरला जातो.

# लठ्ठपणा कमी करण्यावरील उपाय



लठ्ठपणा तेव्हाच येतो जेव्हा शरीराचा चयापचय हळू अर्थात कॅलरीज कमी जळत असतील. पण लक्षात ठेवा लठ्ठपणा कमी करण्यापेक्षा अधिक आवश्यक आहे आपल्या शरीरातून घाण बाहेर काढणे. कारण यामुळेच चयापचय कमकुवत होतं. म्हणून आपल्याला वजन कमी करायचं असेल आणि चयापचय क्रिया वाढवायची असेल तर आपल्या हे ड्रिंक प्यावे लागणार. या ड्रिंकची विशेषता आहे की याने शरीरातील सर्व फॅट्स गळून जातील.

पाहू हे तयार करण्याची कृती...

साहित्य :

८ कप शुद्ध पाणी
१ चमचा किसलेलं आलं
१ बारीक चिरलेली काकडी
१ लिंबाचा रस
१२ पुदिन्याची पाने
४ दिवसात फॅट्स गाळेल हे ड्रिंक

**कृती** : एका काचेच्या जगामध्ये हे सर्व साहित्य भरून रात्रभर असेच राहू द्या. सकाळी त्यामधून आलं आणि पुदिन्याचे पाने काढून टाका. आता हे ड्रिंक एका ग्लासात टाकून प्या. आपण हे ड्रिंक फ्रीजमधून ठेवून दोन दिवसापर्यंतही वापरू शकता.

या ड्रिंकमध्ये घातलेलं सर्व साहित्य हेल्दी आहे जे शरीराला शुद्ध करण्याचं काम करतो.

काकडी- अत्यंत कमी कॅलरीज असलेली काकडी वजन कमी करण्यासाठी उत्तम असते.

आलं- याने पोट भरल्यासारखं वाटतं, ज्यामुळे खूप वेळापर्यंत आपल्याला भूक लागत नाही.

लिंबू- यात आढळणारे पेक्टिन फायबर अन्नाची तल्लफ कमी करतं. हे विषारी घटक काढून शरीराला स्वच्छ करतं. पुदिना- याने ड्रिंकला स्वाद तर येतोच आणि याने भूकेवर नियंत्रण ठेवण्यास मदत मिळते. ■■■

**उपविभागीय अधिकारी दौंड तथा उपविभागीय दंडाधिकारी दौंड यांचे कार्यालय**

अर्ज क्र.जन्म/मृत्यु/एस.आर/२५१/२०२५
दिनांक – १८/०५/२०२६

**जाहिर प्रसिध्दीकरण**

१) अर्जदार श्री.नवनाथ बाळासो गडधे — अर्जदार
रा.धायगुडेवाडी ता.दौंड
विरुध्द
ग्रामसेवक ग्रामपंचायत केडगांव — सामनेवाला

विषय :– जन्म – मृत्यु नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ कलम १३ (२) (३) प्रमाणे अर्ज

ज्याअर्थी, यातील अर्जदार आई मालन बाळु गडधे हे वर नमुद पत्यावरील कायम रहिवासी आहे. अर्जदार यांची मृत्यु दिनांक २१/०५/१९९८ रोजी गांव हंडाळवाडी केडगांव ता.दौंड जि.पुणे येथील राहत्या घरी झालेला आहे. अर्जदार यांची कार्यालयात जन्म / मृत्युचे रजिस्टरला नोंद नसलेमुळे त्यांनी जन्म– मृत्यु नोंदणी ( दुरुस्ती ) अधिनियम २०२३ कलम १३ (२) (३) प्रमाणे नोंद होवुन मिळणेवावत या कार्यालयात दिनांक ०६/११/२०२५ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी सदर अर्जाकामी अर्जदार जन्म / मृत्यु दाखला मिळणेकामी कोणाची कांही हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवासाच्या आत किंवा उपविभागीय अधिकारी दौंड तथा उपविभागीय दंडाधिकारी दौंड यांचे कार्यालयात स्वत: अथवा आपल्या वकिला मार्फत हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. कोणाचाही कांही हरकत अथवा म्हणणे मुदतीत न आल्यास कोणाचाही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधित दाखला देण्यात येईल.

सदरचे जाहिर प्रसिध्दीकरण आज दिनांक १८/०५/२०२६ रोजी आमचे सहीने व शिक्क्याने प्रसिध्द केले असे.

ठिकाण– दौंड
दिनांक – १८/०५/२०२६

शिक्का

सही/–
(रेवणनाथ लबडे )
उपविभागीय अधिकारी दौंड तथा
उपविभागीय दंडाधिकारी दौंड



# घरात झुरळांनी वैतागले आहात? करून बघा ‘हे’ सोपे उपाय

किचनमध्ये झुरळ आढळणे ही चांगली गोष्ट नाही कारण ते ड्रेनेजपासून जेवणापर्यंत सगळीकडे फिरत असतात. यामुळेत घरात आजारपण येतात. जर तुमच्या घरात झुरळं असतील तर तुम्ही सावधान व्हायला हवे. तुम्हाला चिंतीत होण्याची गरज नाही. कारण या बातमीत आम्ही तुम्हाला असे काही घरगुती उपाय सांगणार आहोत जे तुम्ही सहज करू शकतात आणि झुरळांच्या त्रासापासून मुक्ती मिळवू शकतात.

**रॉकेलने घालवू शकतात झुरळं** : झुरळं पळवण्यासाठी रॉकेलचा वापर उपयुक्त ठरतो. घरात जिथे झुरळं सगळ्यात जास्त दिसतात त्या जागा शोधा. तिथे रॉकेलचा स्प्रे मारा. त्या वासाने झुरळं पळून जातील. हा स्प्रे करताना त्वचा झाकलेली असावी.

**बेकींग सोड्याचाही फार उपयोग** : झुरळं घालवण्यासाठी बेकींग सोडा फार उपयुक्त आहे. त्यात साखर मिक्स करून त्याचे मिश्रण बनवा. जिथे झुरळं जास्त येतात तिथे हे मिश्रण टाकावे. साखरेने झुरळं तिथे आकर्षित होतील आणि बेकींग सोड्यासोबतचे त्याचे मिश्रण झुरळांसाठी विष ठरेल आणि झुरळं मरून जातील.

**जाहीर नोटीस**
**दौंड येथील मे. उपविभागीय अधिकारी सो. दौंड यांचे कोर्टात**
**पिठासन अधिकारी श्री. रेवणनाथ लबडे सो.**

जा. क्र. फौज/कावि/४२९/२०२६

१. श्री. वाल्मिक आनंदराव जगताप
रा.कडेठाण,ता.दौंड,जि.पुणे ..... अर्जदार
विरुद्ध...
१. मा. ग्रामसेवक
ग्रामपंचायत कडेठाण
(जन्म/मृत्यू नोंदणी विभाग)
कडेठाण, ता. दौंड जि. पुणे .....जाब देणार

जाहीर नोटीसीद्वारे तमाम लोकांस कळविण्यात येते की, श्री. वाल्मिक आनंदराव जगताप यांचा दि. ०१/०१/१९५० रोजी गाव मौजे कडेठाण, ता.दौंड, जि.पुणे येथे राहत्या घरी जन्म झालेला आहे. उपरोक्त अर्जदार यांनी या न्यायालयात अर्ज दाखल करून स्वतःचा जन्म दाखला मिळणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

तरी या जाहीरनाम्यामध्ये तमाम लोकांना कळविण्यात येते की, ज्या कोणास सदरहू अर्जासंबंधी हरकत घ्यावयाची असेल त्यांनी जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वतः अगर वकीलामार्फत लेखी हरकत न्यायालयात नोंदवावी. मुदतीत कोणाची हरकत न आल्यास सदरहू जन्माचे प्रमाणपत्र अर्जदार यांना देण्यात येईल याची नोंद यावी.

हा जाहीरनामा आज दि.१७/०६/२०२६ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला असे.

सही/–
हुकुमावरून
उपविभागीय अधिकारी,
उपविभाग दौंड

**जाहिर नोटीस**
**दौंड येथील मे.उपविभागीय अधिकारी, दौंड यांचे कोर्टात**
**पिठासन अधिकारी श्री रेवन्नाथ लबडे सो..**

अर्ज.क्र.जन्म/मृत्यु/एस/आर/७७/२०२४
दि.०४/०६/२०२६

श्री.भारत नारायण वायभासे — अर्जदार
रा.दापोडी ता.दौंड, जि.पुणे

नगरपालिका
ग्रामसेवक ग्रामपंचायत दापोडी
ता.दौंड जि.पुणे — जाबदेणार

या जाहीर नोटीशीव्दारे तमाम लोकांस कळविण्यात येते की,अर्जदार श्री.भारत नारायण वायभासे यांची आई कै. ताराबाई नारायण वायभासे रा.दापोडी ता.दौंड, जि.पुणे यांचा मृत्यू दि.२४/०७/२०२० रोजी राहत्या घरी दापोडी ता.दौंड, जि.पुणे येथे झालेला आहे त्यांची मृत्यूची नोंद दौंड नगरपरीषद दौंड येथे, जन्म/मृत्यु दप्तरी नसल्याने सदर मृत्यूची नोंद होणेबाबत परवानगी मिळणेकामी व तसा मृत्यू दाखला मिळणेबाबत अर्जदार यांनी किरकोळ अर्ज मे. प्रांत कार्यालय दौंड येथे दाखल केलेला आहे. तसेच अर्जदार यांचा सदर मृत्युचा दाखला मिळणेचा आदेश होणेवाबत मागणी केलेली आहे.

तरी या जाहिर नोटीशी द्वारे तमाम लोकांना कळविण्यात येते की, ज्या कोणास सदर अर्जासंबंधी हरकत घ्यावयाची असेल त्यांनी पुढील १५ दिवसांत जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून स्वतः अगर वकिलांमार्फत लेखी हरकत उपविभागीय अधिकारी, दौंड यांच्याकडे किंवा मा. मंडळ अधिकारी, दौंड यांच्या कार्यालयात नोंदवावी. मुदतीत हरकत न आल्यास सदर अर्जदार श्री.भारत नारायण वायभासे यांची आई कै. ताराबाई नारायण वायभासे यांना त्यांच्या मृत्यूचा दाखला देण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस असे.

उपविभागीय दंडाधिकारी दौंड
उपविभाग दौंड

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग,**
**पुणे– ४११ ००१.**
**दुरध्वनी क्रमांक ०२०/२६१२१७६५**
Web- www.mahapwd.gov.in & e-mail- integratedpune.eemahapwd.gov.in

**ई–निविदा सूचना क्रमांक ०७ सन २०२६–२०२७**

कार्यकारी अभियंता, पुणे सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग, पुणे मध्यवर्ती इमारत आवार पुणे १. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत असलेल्या कंत्राटदारांकडून बी–१ नमुन्यातील निविदा ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत.

वरील निविदा सुचनेची संपुर्ण माहिती खालिल संकेत स्थळांवर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग, पुणे १ यांनी राखून ठेवलेला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

1.web-www.mahapwd.gov.in (फक्त निविदा सुचना)
2.http://mahatenders.gov.in (निविदासुचना व निविदासंच)

सही/–
(अनुराधा रा. भंडारे)
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग,
पुणे– ४११ ००१.

विमाका/पुणे/जाहि/४५/२०२६–२०२७

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या नवीन शर्तींची ( इनाम वर्ग ६ब ची ) मिळकत ही श्री.निलेश दिपक कदम, श्री.रुपेश दिपक कदम, सौ. संगिता दिपक कदम, रूपाली किरण शिंदे, माया राजाराम कदम, सागर राजाराम कदम, विजयश्री सचीन कदम, शितल राजाराम कदम. रा.बेलसर यांचे मालकी व ताबे वहिवाटीची असून सदर मिळकत त्यांनी श्री.भाऊसाहेब मारुती जाधव, हिरालाल हरनामदास करमचंदानी, लाखी हरिरण पंजाबी, विनय दिपक करमचंदानी रा.पुणे यांना कायम खुष खरेदी देण्याचे मान्य व कबूल केलेले आहे. त्यानुसार त्यांनी बोलणी चालू केलेली आहे. सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध व निजोखमी असल्याचा भरवसा दिलेला आहे. सदर मिळकतीवर कोणाचाही बक्षीस, गहाण, दान, लीन, लीज, पोटगी, चोळीबांगडी, खरेदी, साठेखत, करार–मदार, कुळ वहिवाट, विसार पावती इ. कोणत्याही स्वरूपाचा हक्कसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत जिल्हाधिकारी/तहसिल कार्यालय, पुरंदर यांचे कार्यालयात मुळ कागदपत्रांनिशी खात्री पटवून दयावी. अन्यथा सदर मिळकतीत असे कोणाचेही हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिलेले आहेत असे समजून सदरचा व्यवहार पूर्ण करणेत येईल व नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. जमीन विक्रीकामी जमीनीचे मालक श्री. निलेश दिपक कदम, श्री. रूपेश दिपक कदम, सौ. संगिता दिपक कदम, रूपाली किरण शिंदे, माया राजाराम कदम, सागर राजाराम कदम, विजयश्री सचीन कदम, शितल राजाराम कदम यांनी मा. जिल्हाधिकारी यांचेकडे विक्री परवानगी मागितलेली आहे. सदरची जमीन ते श्री. भाऊसाहेब मारुती जाधव, हिरालाल हरनामदास करमचंदानी, लाखी हरिरण पंजाबी, विनय दिपक करमचंदानी यांना रक्कम रूपये ६०,००,०००/– रूपयांस विक्री करणार आहेत. शासन, परिपत्रक नंबर डब्ल्यू टीएन १०९९/सीआर/२२९/ल–४, दिनांक १०/३/२००० मधील मुंबई गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम १९५८ मधील दिलेल्या सूचनेनुसार गावाच्या ५ कि.मी. परिसरातील इतर वतनदार प्रश्नाधिन जमीन उक्त नमूद किंमतीस खरेदी घेणेस इच्छुक असल्यास लेखी स्वरूपात १५ दिवसांच्या आत तहसिल कार्यालय/जिल्हाधिकारी कार्यालय यांना कळवावे.

**परिशिष्ट**

मौजे बेलसर ता.पुरंदर, जिल्हा पुणे येथील गट नंबर २७५ क्षेत्र १ हे. ५४ आर पो.ख. ०० हे. ०९ आर, आकार ०१ रू. ६२ पैसे यांसी चतुः सिमा पुर्वेस –२७६, पश्चिमेस – रस्ता, दक्षिणेस–गट नंबर २७४, उत्तरेस– रस्ता यापैकी देय क्षेत्र आठ आणे हिस्सा उत्तरेकडील ०० हे. ७७ आर, पो.ख. ०० हे. ०४.५० आर तसेच गट नंबर २७८ क्षेत्र १ हे.४४ आर पो.ख.०० हे. ०७ आर, आकार ०१ रू.८७ पैसे यांसी चतु:सिमा पुर्वेस – २७९, पश्चिमेस रस्ता, दक्षिणेस–गट नंबर २७६, उत्तरेस– रस्ता यापैकी देय क्षेत्र आठ आणे हिस्सा दक्षिणेकडील ०० हे.७२ आर, पो.ख. ०० हे. ०३.५० आर.

ही जाहीर नोटीस असे.

सासवड :
दिनांक : १६/०६/२०२६

सही/–
ॲड. अशोक संपतराव देशमुख
रा.जुने पोस्ट ऑफिसजवळ,
सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे
मो. नं. ९४२२०७९९८९

**NO.1**
**Motor Accident Claims Tribunal,Mumbai**
**IN THE COURT OF Gauri Kawdikar**
**H.H.Member,Mumbai,Mumbai,**
**NOTICE/SUMMONS IN MOTOR ACCIDENT CAIM PETITION** — **MACP/93/2025**
**Soham Sanika Daundkar Vs Hansa Vahan India Pvt Ltd And Tata AiG Gen.Ins.Co.Ltd.**
**17-07-2026**

To,
**Hansa Vahan India Pvt Ltd And Tata AiG Gen.Ins.Co. Ltd.**
**Flat no 1001 Uday Hiltop Residency PC Wing A NR PCMC Water Tank Pimperi Chinchwad Pune 412101.**

Whereas has instituted a Motor Accident Claim Petition implesding you as one of the respondents, which case has been directed to be listed before this Tribunal/Court for hearing at 10.00 am.on **17-07-2026.**

Now therefore you are given notice to appear in this Tribunal/Court in person or by a pleader duly instructedd (and able to answer all material question relating to tha suit, or who shall be accompanied by some person,able to answer all such question), on the **17-07-2026 at 11:00 o’clock in the forenoon,** to answer tha claim;and further you are hereby directed to file on that day a written statement of your defence and to produce on the said day all documents in your possession or power upon hich you base your defence,and where you rely on any other document whether in your possession or power or not, as evidence in support of your defence,you shall enter such documents in a list to be annexed to the written statement.

Take notice that, in default of your apperance on the day before mentioned, the suit will be heard and determined in your absence.

Given under my hand and seal of the court, this **11-03-2026**
**H.H.Member**

**ग्रामपंचायत वाखारी, ता.दौंड,जि.पुणे**
**B1 नोटीस क्रमांक–१ सन २०२६/२०२७**

ग्रामपंचायत वाखारी, ता.दौंड,जि.पुणे यांचेकडुन खालील नमूद केलेल्या कामांची निविदा B-1 निविदा पद्धतीने (दोन सीलबंद लिफाफा पद्धतीने जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निवेदेचा नमुना ग्रामपंचायत वाखारी ता.दौंड जि.पुणे यांच्याकडुन दि.१७/०६/२०२६ ते दि.२४/०६/२०२६ या कालावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यंत देण्यात येतील व दिनांक दि.१७/०६/२०२६ ते दि.२४/०६/२०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत पोस्टाने/समक्ष ग्रामपंचायत मध्ये स्वीकारले जातील. सदर सीलबंद निविदा मासिक सभे दिवशी/ग्रामपंचायत सोईनुसार उपडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निवीदा विक्री करण्याचा कालावधी | निवीदा फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | शांताराम गोरगल घर ते अंजना जगताप घर बंदिस्त गटर करणे. | ९९१७९/– | दिनांक १७/०६/२०२६ ते दिनांक २४/०६/२०२६ | २३६/– | ९९२/– |
| २ | कुंभार वस्ती बंदिस्त गटर करणे. | ९९२११/– | | २३६/– | ९९२/– |
| ३ | वाखारी गावात बंदिस्त गटर करणे. | १९९११०/– | | २३६/– | १९९१/– |
| ४ | गावांतर्गत बंदिस्त गटर करणे. | ९९२४२/– | | २३६/– | ९९२/– |
| ५ | अनुसूचित जाती वस्ती पाणीपुरवठा योजना करणे. | ८४९६०/ | | २३६/– | ८५०/– |
| ६ | गावठाण येथे बहुउद्देशीय सभागृह बांधणे. | ४०००००/– | | ५९०/– | ४०००/– |
| ७ | जि.प.शाळा येथे दुरुस्ती करणे. | ७००००/– | | २३६/– | ७००/– |
| ८ | बायडाबाई गोरगल घर ते गणेश मंदिर मुरमीकरण करणे. | २०००००/– | | २३६/– | २०००/– |
| ९ | मारुती मंदिर ते बोरीशिव कुंभारवस्ती मुरमीकरण करणे. | ३०००००/– | | २३६/– | ३०००/– |
| १० | जि.प.शाळा ते पोपट चव्हाण घर गावठाण सिमेंट रस्ता करणे. | ३३४९५७/– | | ५९०/– | ३३५०/– |
| ११ | केंजळेवस्ती येथे सिमेंट रस्ता करणे. | ५०००००/– | | ५९०/– | ५०००/– |

निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे. १) कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे चा अधिकार ग्रामपंचायतीने राखुन ठेवला आहे. २) कोऱ्या निविदा फी ग्रामपंचायत वाखारी PDCC बँक शाखा केडगाव खाते क्र.०२२००२५००००००३४ वर किंवा ग्रा.प. कार्यालयात रोख भरल्या नंतर उपलब्ध होतील. तसेच निविदा भरणे कामी आवश्यक अटी व शर्ती सोबत दिल्या जातील. ३) या पूर्वी केलेल्या कामांचे काम पूर्णत्वाचे दाखले जोडावेत. ४) इसारा रक्कम ग्रामपंचायत वाखारी ग्रामनिधी खाते पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा केडगाव खाते क्र.०२२००२५००००००३४ च्या खाती भरल्याची पावती जोडण्यात यावी किंवा ग्रामपंचायत नावे धनादेश/डी.डी. जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही. ५) आपण तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा वेगवेगळा सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा प्रथम उघडण्यात येईल आपण सर्व नियमास पात्र झाल्या नंतर आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल.

सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा, कोणतीही निविदा स्विकारणेचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत वाखारी यांनी राखुन ठेवला आहे.

**सही/–** — **सही/–**
**ग्रामपंचायत अधिकारी** — **सरपंच**
**ग्रामपंचायत वाखारी, ता.दौंड, जि.पुणे**

# मुंबई मेट्रोमुळे दुग्धजन्य पदार्थांना मोठी बाजारपेठ मिळणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

जनप्रवास : प्रतिनिधी



मुंबई : ग्रामीण भागातील दुग्धजन्य पदार्थ आणि अन्य कृषी उत्पादने मोठ्या बाजारपेठेपर्यंत पोहोचविण्यासाठी 'मुंबई मेट्रो' हे मोठे आणि प्रभावी माध्यम आहे. यामुळे निश्चितच ग्रामीण भागातील उत्पादनांना मुंबईमध्ये हक्काची बाजारपेठ उपलब्ध होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मेट्रो स्टेशन स्थानकावर वारणा सहकारी दूध उत्पादक संघाच्या दुग्धजन्य पदार्थ विक्री स्टॉलच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. दुग्धविकास मंत्री अतुल सावे, विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, वारणा समूहाचे अध्यक्ष आमदार डॉ. विनय कोरे (सावकर), मुंबई महापालिका आयुक्त तथा मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे,तसेच वारणा सहकारी दूध उत्पादक संघाचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबई मेट्रो-३ ही शहराची नवी जीवनवाहिनी आहे. आशियातील सर्वात लांब एकेरी भूमिगत मेट्रो आहे. ही मेट्रो केवळ वाहतुकीची सुविधा नसून आर्थिक विकासालाही चालना देणारे व्यासपीठही आहे. मेट्रो स्थानकांवर उभारण्यात आलेल्या व्यावसायिक उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील उत्पादने थेट शहरी ग्राहकांपर्यंत पोहोचण्याची संधी निर्माण झाली आहे. कोल्हापूर आणि महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी तयार केलेले दर्जेदार दुग्धजन्य पदार्थ आता मुंबईसारख्या बाजारपेठेत या स्टॉलच्या माध्यमातून उपलब्ध होणार आहेत. यामुळे शेतकऱ्यांना अधिक चांगली बाजारपेठ मिळण्याबरोबरच ग्राहकांनाही दर्जेदार उत्पादने सहज उपलब्ध होणार आहेत. मेट्रो स्थानकांवरील अशा उपक्रमांमुळे रोजगारनिर्मिती, व्यापारवृद्धी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळणार आहे.

मेट्रो स्थानकावर सुरू झालेला वारणा स्टॉल हा केवळ व्यावसायिक उपक्रम नसून कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या स्वाभिमानाचे प्रतीक असल्याचे सांगत मुख्यमंत्री फडणवीस यांनी वारणा समूहाच्या या उपक्रमाचे कौतुक केले. वारणा समूहाने दुग्ध व्यवसायाबरोबरच शेतकरी आणि महिलांच्या सक्षमीकरणासाठी केलेले कार्य देशासाठी आदर्श असल्याचे सांगत मुख्यमंत्री फडणवीस यांनी वारणा परिवाराचे अभिनंदन केले.

आमदार कोरे म्हणाले की, वारणा समूहाच्या वतीने सुमारे दीड लाख शेतकरी उत्पादकांकडून दररोज दूध संकलित केले जाते आणि त्याचा मोबदला नियमितपणे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविला जातो. या शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या दुग्धजन्य पदार्थांना मुंबईसारख्या मोठ्या बाजारपेठेत थेट प्रवेश मिळावा, यासाठी मेट्रो स्थानकांवरील स्टॉल महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत. मुंबईच्या ग्राहक वर्गाला दर्जेदार दुग्धजन्य पदार्थ उपलब्ध करून देतानाच ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही बळ देण्याचे काम या स्टॉलच्या माध्यमातून होणार आहे.

## उच्च शिक्षित महिलांनी प्रशासकीय व संशोधन क्षेत्रात पुढे यावे : उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील

जनप्रवास : प्रतिनिधी



मुंबई : राज्यातील उच्च शिक्षण क्षेत्रातील महिला प्राध्यापकांच्या क्षमता विकासास चालना देण्यासाठी आणि त्यांच्यातील नेतृत्व गुणांना प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था (MSFDA), पुणे यांच्या वतीने 'नारीदृष्टी' (Nurturing Visionary Women Leaders for Transformation in Academia) या विशेष पाच दिवसीय निवासी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे ऑनलाईन उद्घाटन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाला उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाचे आयुक्त दिलीप सरदेसाई, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, तंत्रशिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर, सहसचिव संतोष खोरगडे, सहसंचालक डॉ. अर्चना बोऱ्हाडे तसेच विविध क्षेत्रांतील महिला, विद्यार्थी आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.

मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, उच्च शिक्षण क्षेत्रातील महिला प्राध्यापकांनी आता केवळ अध्यापनापुरते मर्यादित न राहता संशोधन, प्रशासन, शैक्षणिक धोरण निर्मिती आणि संस्थात्मक नेतृत्व या क्षेत्रांतही सक्रिय पुढाकार घेऊन महिलांनी या क्षेत्रात पुढे यावे असे आवाहन करून 'नारीदृष्टी'सारखे उपक्रम महिला प्राध्यापकांमध्ये आत्मविश्वास वाढविण्यास आणि शैक्षणिक क्षेत्रात मोठे परिवर्तन घडविण्यास निश्चितच उपयुक्त ठरतील असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात नारीशक्तीला केंद्रस्थानी ठेवून विविध धोरणे आणि उपक्रम प्रभावीपणे राबविले जात आहेत. शिक्षण, विज्ञान, प्रशासन, उद्योग आणि संरक्षण अशा सर्वच क्षेत्रांत महिलांनी आपली क्षमता सिद्ध केली आहे. 'ऑपरेशन सिंदूर' संदर्भातील माहिती देशासमोर मांडण्यासाठी महिलांनी घेतलेली पत्रकार परिषद ही राष्ट्रीय निर्णय प्रक्रियेत महिलांच्या सक्षम भूमिकेचे आणि बदलत्या भारतातील त्यांच्या प्रेरणादायी नेतृत्वाचे उत्तम उदाहरण आहे असेही मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी यावेळी सांगितले.

डॉ. शैलेंद्र देवळाणकर म्हणाले, एकाच दिवशी चार महत्त्वपूर्ण कार्यक्रमांचे उद्घाटन होणे ही चड्रऋ- साठी अभिमानाची बाब आहे. 'नारीदृष्टी' महिला नेतृत्वाला नवी दिशा देईल, तर तीन ऋऊह्न कार्यक्रम प्राध्यापकांना तंत्रज्ञान, अनुभवाधारित अध्यापन आणि परिणामाधारित शिक्षणामध्ये अधिक सक्षम करतील. छएझ २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी हे कार्यक्रम अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहेत.

## राज्यात नव्या प्रादेशिक व उपप्रादेशिक परिवहन कार्यालयांच्या स्थापनेसाठी निकष निश्चित : परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

जनप्रवास : प्रतिनिधी



मुंबई : महाराष्ट्रात वाढती वाहनसंख्या, नागरिकांची वाढती गरज आणि प्रशासनावरील ताण लक्षात घेऊन नवीन प्रादेशिक व उपप्रादेशिक परिवहन कार्यालये स्थापन करण्यासाठी निकष निश्चित करण्यात आले आहेत. नागरिकांना परिवहन विभागाच्या सेवा अधिक जलद, सुलभ आणि त्यांच्या जवळ उपलब्ध करून देण्याचा उद्देश असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक सांगितले. परिवहन विभागाने यासाठी नियुक्त केलेल्या तज्ज्ञ समितीचा अहवाल शासनाकडे पाठविला असून, त्यामधील शिफारसींना तत्त्वत: मान्यता देण्याची प्रक्रिया सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.

राज्यातील दुर्गम व वाढत्या शहरी भागांतील नागरिकांना वाहन नोंदणी, ड्रायव्हिंग लायसन्स, वाहन तपासणी, कर भरणा आणि इतर सेवांसाठी दूरच्या कार्यालयांवर अवलंबून राहावे लागणार नाही; तसेच नवीन कार्यालय स्थापन करण्यासाठी वाहनसंख्या, लोकसंख्या, महसूल, भौगोलिक अंतर आणि उपलब्ध पायाभूत सुविधा यांसारखे निकष निश्चित करण्यात आले आहेत. प्रस्तावित कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात किमान चार तालुके, पाच लाखांहून अधिक वाहने, सात लाखांहून अधिक लोकसंख्या आणि वार्षिक १०० कोटी रुपयांपेक्षा अधिक महसूल असणे आवश्यक राहणार आहे. विद्यमान परिवहन कार्यालयापासून ५० किलोमीटरपेक्षा अधिक अंतर असलेल्या भागांना प्राधान्य देण्यात येणार आहे. ज्या ठिकाणी पूर्ण कार्यालयाची आवश्यकता नसेल.

## मुंबईला जागतिक सर्जनशीलतेचे केंद्र बनविण्यासाठी शासन कटिबद्ध : सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार

जनप्रवास : प्रतिनिधी



मुंबई : मुंबई हे स्वप्नांचे, आनंदाचे आणि सर्जनशीलतेचे शहर असून जगभरातील चित्रपट निर्माते, दिग्दर्शक आणि सर्जनशील कलाकारांनी मुंबई व महाराष्ट्रातील सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ड. आशिष शेलार यांनी केले.

सांस्कृतिक कार्य मंत्री ड.शेलार यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्री डॉ. मुरुगन यांचे आभार मानताना तीन महत्त्वाच्या उपक्रमांचा विशेष उल्लेख केला. 'वेव्ह्ज' या जागतिक ऑडिओ-व्हिज्युअल परिषदेची सुरुवात मुंबईत करण्यात आली असून ती सर्जनशील क्षेत्रासाठी मोठी संधी ठरत आहे. तसेच देशातील पहिले 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी' (आयआयसीटी) मुंबईत सुरू करण्यात आले आहे. याशिवाय मराठी चित्रपटांना जागतिक व्यासपीठ मिळवून देण्यासाठी मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे त्यांनी सांगितले.

मुंबईच्या सर्जनशीलतेचा उल्लेख करताना मंत्री ड. शेलार म्हणाले की, हे शहर नवकल्पना आणि संस्कृतीसाठीही ओळखले जाते. येथील सर्जनशीलता आणि नवोन्मेषाचा अनुभव देश-विदेशातील पाहुण्यांना घेता येईल.

चित्रपटसृष्टीला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनाने महत्त्वाचे निर्णय घेतले असल्याचे सांगून मंत्री ड.शेलार म्हणाले की, महाराष्ट्रातील शासकीय जागांवर चित्रिकरणासाठी निर्मात्यांकडून कोणतेही शुल्क आकारले जात नाही. तसेच विविध विभागांकडून परवानग्या मिळविण्यासाठी 'वन विंडो सिस्टीम' सुरू करण्यात आली असून सर्व परवानग्या मिळविण्याची जबाबदारी शासनाने घेतली आहे. केंद्र शासनाच्या सहकार्याने मुंबईतील आकाशवाणीच्या विस्तीर्ण जागेवर अत्याधुनिक मीडिया हब उभारण्याची योजनाही सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. या सुविधेमुळे मीडिया आणि सर्जनशील उद्योग क्षेत्राला मोठी चालना मिळेल, असे ते म्हणाले.

लघुपट, माहितीपट आणि निमेशन चित्रपट हे सर्जनशीलतेचे आव्हानात्मक आणि प्रभावी माध्यम असल्याचे सांगत मंत्री ड.शेलार यांनी मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव हा जागतिक दर्जाच्या सर्जनशीलतेला नवे व्यासपीठ उपलब्ध करून देईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## रस्ते अपघातातील मृत्यू कमी करण्यासाठी तातडीने उपाययोजना सूचवा : जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

### जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा रस्ता सुरक्षा समितीची बैठक संपन्न

जनप्रवास : प्रतिनिधी



पुणे : : जिल्ह्यातील रस्ते अपघातात नागरिकांचे होणारे मृत्यूंचे प्रमाण कमी करण्यासाठी अपघातग्रस्त (ब्लॅकस्पॉट) प्रत्यक्ष स्थळ पाहणी करावी. सर्व संबंधित विभागाने स्थळ पाहणी दरम्यान सुक्ष्म निरीक्षण नोंदवून अल्प व दिर्घकालीन उपाययोजना सूचवाव्यात, याबाबत लवकरच आढावा बैठक घेवून कार्यवाही करण्याबाबत सूचना दिल्या जातील, अशा सूचना जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा रस्ता सुरक्षा समितीची बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक संदीप गिल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता भरतकुमार बाविस्कर, पुणे शहर वाहतूक शाखेचे उपायुक्त संदीप भाजीभाकरे, पिंपरी-चिंचवडचे प्रादेशिक परिवहन अधिकारी संदेश चव्हाण, पुण्याचे सहायक उपप्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्नील भोसले, पिंपरी-चिंचवडचे राहूल जाधव, बारामतीचे सुरेंद्र निकम, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

श्री. डुडी म्हणाले, पुणे, पिंपरी चिंचवड शहर व ग्रामीण भागातील नागरिकांचे अपघातामुळे होणारे मृत्यू रोखण्याला प्राधान्य देण्यात यावे. पोलीस विभाग, प्रादेशिक परिवहन, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधींनी संयुक्त स्थळ पाहणी करावी. ब्लॅक स्पॉटची संयुक्त पाहणी करून अपघाताची कारणे व आवश्यक उपाययोजना याबाबतचा अहवाल २९ जून २०२६ पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावे. अपघात रोखण्याकरिता स्थळ पाहणी अहवालात सुचविण्यात आलेल्या उपाययोजनांप्रमाणे सर्व संबंधित विभागाने गांर्भीयाने कार्यवाही करुन जिल्हाधिकारी कार्यालयास अहवाल सादर करावा. यामध्ये हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही, याबाबत सर्व संबंधित विभागाने नोंद घ्यावी.

वाहतुकीला शिस्त लागण्यासाठी नियमभंग करणाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करावी. नवले ब्रिज परिसरातील अपघात कमी करण्यासाठी यापूर्वी सुचविण्यात आलेल्या उपाययोजनांप्रमाणे भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने कार्यवाही करावी, याकरिता निधी उपलब्ध करुन देण्यात येईल, असेही श्री. डुडी म्हणाले.

## विधानभवन परिसरातील सुरक्षा, डिजिटल प्रवेशपास व्यवस्थेला प्राधान्य देण्याचे प्रा.राम शिंदे यांचे निर्देश

जनप्रवास : प्रतिनिधी



मुंबई : आगामी पावसाळी अधिवेशन २०२६ सुरळीत, सुरक्षित व नियोजनबद्धरित्या पार पडावे या दृष्टीने सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने कामकाज करावे. पावसाची शक्यता लक्षात घेता सुरक्षित मंडप, सुरक्षा व्यवस्थेसाठी तैनात कर्मचाऱ्यांसाठी अन्न पाकिटे, स्वच्छ आणि सुसज्ज उपहारगृह याबाबत अत्यंतीक दक्षता घेण्यात यावी. विधानभवन परिसरात शिस्त आणि सुरक्षेला प्राधान्य देण्यात येऊन गर्दी नियंत्रित व्हावी यादृष्टीने सुरक्षा यंत्रणेने नियोजन करावे, त्याचप्रमाणे डिजिटल प्रवेशपास व्यवस्था सुरु करावी, असे निर्देश महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी दिले.

विधानभवन येथे २०२६ च्या दुसऱ्या म्हणजे पावसाळी अधिवेशनाच्या अनुषंगाने पूर्वतयारीसंदर्भात बैठक विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत सुरक्षा व्यवस्थेच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या उपाययोजना, वाहनतळ व्यवस्था, अधिवेशन कालावधीतील अनुभवी डॉक्टरांची उपलब्धता, वैद्यकीय सुविधा, उपहारगृहामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवांचा दर्जा, उपहारगृहातील स्वच्छता व खाद्यपदार्थांची तपासणी, विधानभवन परिसरातील स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन, अखंडित पाणीपुरवठा, दूरध्वनी व इंटरनेट सुविधा, रेल्वे आरक्षण तसेच आपत्कालीन व्यवस्था या सर्व बाबींचा सविस्तर आढावा घेण्यात आला. अधिवेशन कालावधीत अनावश्यक गर्दी टाळण्यासाठी व कामकाज सुरळीत पार पडावे यासाठी कार्यालयीन अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रवेशासाठी पर्यायी प्रवेशद्वाराची व्यवस्था करण्यात आली असून प्रवेश नियंत्रण कडक ठेवावे, वाहनतळ व्यवस्था उचित असावी तसेच सुरक्षा, स्वच्छता व आपत्कालीन सेवा पूर्णत: सज्ज ठेवाव्यात, असे स्पष्ट निर्देश सभापती प्रा. राम शिंदे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

## कला विश्व

### घर आहे की रिसॉर्ट? तमन्ना भाटियाच्या आलिशान घरातील जकुजी पाहून फराह खान झाली थक्क



बॉलीवूड कलाकारांचे आलिशान घर आणि त्यांची लाइफस्टाईल जाणून घेण्याची चाहत्यांना नेहमीच उत्सुकता असते. त्यामुळेच चित्रपट निर्माती व कोरिओग्राफर फराह खान ही तिच्या यूट्यूब चॅनेलद्वारे सेलिब्रिटींच्या घरांची खास झलक दाखवत असते. नुकतीच फराह आणि तिचा कूक दिलीप यांनी अभिनेत्री तमन्ना भाटिया हिच्या मुंबईतील आलिशान घराला भेट दिली. लोखंडवाला परिसरातील या लक्झरी फ्लॅटमधील आकर्षक इंटेरियरर, सुंदर सजवलेली बाल्कनी आणि खासगी जकुजी पाहून सर्व जण थक्क झाले आहेत. तमन्नाचे हे घर एखाद्या स्वप्नातील घरापेक्षा कमी नसल्याची चर्चा सध्या सोशल मीडियावर रंगली आहे.

बॉलीवूडची लोकप्रिय अभिनेत्री तमन्ना भाटिया ही तिच्या कुटुंबासह एकाच घरामध्ये राहते. घराबाहेर असणारी 'भाटिया फॅमिली'ची पाटी लक्षवेधी ठरत होती. त्यानंतर फराह आणि दिलीप यांचे तमन्नाने मोठ्या आनंदाने घरामध्ये स्वागत केले. भारतीय संस्कृतीप्रमाणे दरवाजावर सुंदर नक्षीकाम असलेले तोरण लावण्यात आले होते. ऑलिव्ह ग्रीन रंगामध्ये भलामोठा लाकडी दरवाजा असलेल्या घरामध्ये एन्ट्रीपासून डिझाईन इंटेरियर दिसून येत आहे. तमन्नाचे घर हे लोखंडवालामधील सर्वात लक्झरी आणि अतिशय सुंदर घरांपैकी एक असल्याचे फराह म्हणाली आहे. संपूर्ण घर हे पांढऱ्या आणि हिरव्या रंगामध्ये सजवलेले असून, त्यासह असलेल्या गोल्डन लाईटने घराला लक्झरी लूक दिला आहे. भलामोठा सोफा आणि कोपऱ्यामध्ये असणारा फिश टँक लक्षवेधी ठरत होता. गुलाबी रंगाचा डायनिंग टेबल, सॉफ्ट लायटनिंग आणि त्यासमोर असणारी भव्य गॅलरी घराला डिझायनर लूक देत आहे. त्याचबरोबर तमन्ना भाटियाच्या घरामध्ये खास पेंटिंगदेखील लावण्यात आले आहे. तीन फ्रेमचे एकत्रित करून हे सुंदर पेंटिग घराची शोभा वाढवत आहे. पांढऱ्या रंगाच्या भिंतीवरील विविध रंगांनी रेखाटलेले आकर्षक पेंटिंग लक्षवेधी ठरत आहे. त्याबाबत फराहने विचारल्यावर तमन्नाने सांगितले की, हे एकमेव चित्र तिच्या घरामध्ये आहे. एकच 'पीस ऑफ आर्ट' तिने घेतले असल्याचे तमन्नाने सांगितले आहे. या चित्रामध्ये लाल रंगाची साडी नेसलेली स्त्री, माकडाचा खेळ करणारा मदारी, भलामोठा हत्ती, गाय आणि ससा यांसह विविध व्यक्तींच्या छटा रेखाटण्यात आल्या आहेत. हॉलमध्ये लावण्यात आलेले एकमेव चित्र लक्षवेधी ठरत आहे. यासह अभिनेत्री तमन्ना भाटियाच्या घरामध्ये अशी एक गोष्ट आहे, जी अनेक बड्या सेलिब्रिटींच्या घरी पाहायला मिळत नाही. ते म्हणजे बाल्कनीमध्ये असणारे ओपन जकुजी.

### सलमानची मर्जी राखण्यासाठी, ज्येष्ठ अभिनेत्याला 'काला हिरण'च्या निर्मात्यांकडून नोटीस; ५० लाख अन् जाहीर माफीची मागणी




'काला हिरण' चित्रपट हा सलमान खानच्या काळवीट शिकार प्रकरणाशी संबंधित असल्याचा दावा केला जात आहे. या चित्रपटावरून सिनेविश्वामध्ये वाद निर्माण झाला आहे. 'काला हिरण' चित्रपटाच्या निर्मात्यांना भाईजान सलमानने कायदेशीर नोटीस पाठवल्याने चित्रपट वादाच्या भोवऱ्यात अडकला आहे. चित्रपटाची कथा लक्षात येताच अनेक कलाकारांनी या चित्रपटातून एक्झिट घेतली आहे. सलमानसह 'वॉन्टेड' चित्रपटामध्ये काम करणारे ज्येष्ठ अभिनेते गोविंद नामदेव यांनी चित्रपटातून बाहेर पडत असल्याचे जाहीर केले. मात्र, ऐन वेळी माघार घेतल्याने आता 'काला हिरण'च्या निर्मात्यांनी गोविंद नामदेव यांना ५० लाख रुपये भरण्याची कायदेशीर नोटीस पाठवली आहे. त्यावरून पुन्हा एकदा कलाकार व निर्मात्यांमधील वाद उफाळून आला आहे. 'काला हिरण' चित्रपटामध्ये सलमानची कथित मुख्य भूमिका साकारणारा अभिनेता सोनू मिश्रा यानेसुद्धा चित्रपटातून बाहेर पडत असल्याचे जाहीर केले. दोन दिवसांची शूटिंग केल्यानंतर त्याने हा निर्णय जाहीर केला होता. चित्रपटाच्या निर्मात्यांनी फसवणूक केली असून, त्यांचा हेतू लक्षात आल्याने प्रोजेक्टमधून बाहेर पडत असल्याचे सोनूने स्पष्ट केले. तसेच सिनेमाच्या कॉन्ट्रॅक्टमध्ये सलमान खानविरोधात बोलण्याबाबत सांगण्यात आल्याचा धक्कादायक खुलासा सोनूने केला आहे. त्यामुळे 'काला हिरण' चित्रपटावरून वाद निर्माण झाला आहे. याच पार्श्वभूमीवर सलमान खानसह काम करणारे अभिनेते गोविंद नामदेव यांनी चित्रपट सोडत असल्याचे जाहीर केले. त्यामुळे 'काला हिरण' चित्रपटाच्या निर्मात्यांनी अमित जानी यांनी कायदेशीर नोटीस पाठवली आहे. 'काला हिरण' चित्रपटाचा ट्रेलर आऊट झाला असून, त्यामध्ये १९९८ सलमान खानच्या काळवीट शिकार प्रकरणावर कथित चित्रपटाची गोष्ट दाखवण्यात आली आहे. त्यामध्ये प्रमुख भूमिकेचे नाव आयान खान दाखवण्यात आले आहे; तर अभिनेते गोविंद नामदेव यांना विरोधी पक्षातील वकिलांची भूमिका दिली गेली आहे. चित्रपटामध्ये काळवीट शिकार आणि बिश्नोई गँगचा उल्लेख करण्यात आला आहे. अभिनेते गोविंद नामदेव यांनी कॉन्ट्रॅक्ट करून हा चित्रपट पूर्ण करण्याचे आश्वासन दिले होते; मात्र त्यांनी अचानक चित्रपटातून माघार घेत प्रोजेक्ट सोडल्याचे जाहीर केले आहे. त्यामुळे निर्माते अमित जानी यांनी गोविंद नामदेव यांना ५० लाख रुपयांचा दंड भरण्यासह जाहीर माफी मागण्याची नोटीस बजावली आहे. प्रॉडक्शन हाऊसचे नुकसान झाल्याने त्यांनी गोविंद नामदेव यांना ५० लाख रुपयांचा दंड भरण्यास आणि सात दिवसांच्या आत सार्वजनिकपणे जाहीर माफी मागण्यास सांगितले आहे.

* मुख्य संपादक - संजय प्रल्हाद भोकरे * संपादक -सिद्धार्थ संजय भोकरे * सरव्यवस्थापक - सुरेखा खानोरे हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय प्रल्हाद भोकरे यांनी दैनिक जनप्रवास, सर्व्हे नंबर ३११/१/अ/२ कासार अंबोली, तालुका मुळशी, जि.पुणे येथे छापून चिनार हाईटस्, ४ था मजला, प्रभात रोड, गल्ली नं.५, पुणे-४११ ००४ येथे प्रकाशित केले. येथे प्रकाशित केले. RNI NO. MAHMAR/2013/57952. मो. ८६०५६४१११३. पुणे कार्यालय : फोन - ०२०-२५४२४२३२ E-mail : dainikjanpravas@gmail.com